




अण्णा व मामी


विजयच्या लग्नावेळी अण्णा, मामी, वर्षा, मेघा


आमच्या लग्नावेळीचे छायाचित्र


सहकुटुंब सहपरिवार


राजा


मी व लक्ष्मणराव (पति)


घर बांधकामावेळीचे क्षणचित्र


बापू व पद्मजा


डावीकडून शांता, वर्षा, शरद, जोस्न, सुधीर, बाळाबाई


मागे अण्णा व मामी लिलाच्या लग्नामध्ये

# लक्ष उर्मी

उर्मिला लक्ष्मणराव देशपांडे

प्रकाशक :
लेक लाडकी अभियान
१६१/१, साहिल, साई कॉलनी,
शाहुनगर, सातारा - ४१५ ००२
email : varshadesh232@gmail.com
Ph. : 02162-221031 Mob. 9270152108

**लक्ष उर्मी**

उर्मिला लक्ष्मणराव देशपांडे

© सुरक्षित :
लेक लाडकी अभियान

अक्षर जुळणी :
प्राध्यापक श्री. संजीव बोंडे

मुद्रक :
जय कॉम्प्युटर्स, सातारा

मुखपृष्ठ
कैलास जाधव, सातारा

आवृत्ती २९ मे २०१७

किंमत रु. १६०/- रुपये

आपल्या लेकरांना
घडविण्यासाठी झटलेल्या
जगातील समस्त अनामिक
मातांना अर्पण.....

- उर्मिला देशपांडे

# प्रस्तावना

मला २९ मे २००९ ला ७४ वर्ष सुरू झाले. त्यादिवशीव बाळूनी मला नोटबुक दिलं. पण एक महिना बरे नसल्याने मी काहीच लिहू शकले नाही. खरं म्हणजे मला पेन व बुक बाळूनी का दिलं असेल ? मला लिहिण्याची सवय आहे हे त्याला माहीत नाही. मला संजूने पण ७-८ वर्षांपूर्वी अशीच छान वही व पेन दिलं आहे. त्यात मी बरंच पण थोडं थोडं लिहिलं आहे. पण त्यावेळी मला बऱ्याच जबाबदाऱ्या होत्या. त्या पार पाडता पाडता जास्त वेळ मिळाला नाही म्हणण्यापेक्षा मानसिक तयारी व समाधान कमी होतं.

आता मात्र मी पूर्ण समाधानी आहे व पुढच्या वयात लिहावं म्हटलं तरी आठवेल की नाही ? व आठवले तरी बसून लिहिणं होईल की नाही असे वाटले व आज आषाढी एकादशीच्या मुहूर्ताने लिहायला सुरुवात केली. मी काही हे जगाला सांगायला किंवा मुलांना व नातेवाईकांना समजण्यासाठी लिहित नसून मला जे पूर्वीचे दिवस आठवतात ते वेळ जाण्यासाठी कागदपत्रावर उतरवणं हाच उद्देश. कारण काम करवत नाही, फार चालवत नाही. रिकाम्या डोक्यात नाही नाही ते विचार येतात. त्यांना लांब ठेवण्यासाठी हा साधा, सोपा व आवडीचा उपाय.



# मनोगत

मी या वहीत लिहायला घेतले तेव्हा मनात विचार आला, मी हे कशासाठी लिहित आहे ? कुणासाठी लिहित आहे? सर्वजण आपापल्या कामात, हे वाचायला कुणाला सवड आहे ? पण मी हे फक्त माझ्यासाठी लिहित आहे व मी हे सर्व सरस्वतीला सांगत आहे. कारण तिच्यामुळेच मी लिहायला व वाचायला शिकले. त्याचा मला किती उपयोग होतो हे मी तिलाच सांगते. बाळूने माझ्या खोलीत सरस्वतीचा मोठा फोटो लावला आहे, तिला सर्व सांगतानाा माझे मन हलके होते व कुणाशी तरी खूप गप्पा मारल्याचे समाधान मिळते. आता ७४ वर्षे झाली. कुणी सांगावं मी काही वर्षांनी लिहायचे विसरले तर ? आता बोलायला कुणी नाही म्हणून बोलणे खूपच कमी झालं आहे. तेच मी कागदाशी लिहिते, बोलते एवढाच उद्देश. लिहायचे विसरले तर मग तेही बंद होईल. माणसाच्या आयुष्यात काही होऊ शकते. माझ्या आईने दहा मुलांना जन्माला घातले. पण मरायच्या आधी तिला एकही मूल आठवत नव्हते. माणसाला सोसत व गुदमरत जगायला लागलं की माणसाच्या मनावर असा परिणाम होतो तो टाळण्यासाठी मी लिहिते आहे, मन मोकळे करते. मला ७३ वे वर्ष लागले. वाढदिवस खूप थाटात झाला. मेघानी गाण्याचा कार्यक्रम ठेवला. तेव्हा मी किती सुखी आहे व तृप्त आहे हे सांगणारी कविता गानू मॅडम यांनी माझ्यावर लिहून भेट दिली.

सात दशके दोन वर्षे पूर्ण केलीत तुम्ही ।  
दोन दशके आठ वर्षे स्वागतास उभी ।  
कृतार्थ माता सदा करितसे संस्काराची **वर्षा** ।  
तची अपत्ये तिलाच देती कर्तृत्वाचा धडा ।  
ओसंडत जाऊदे घडा हा असाच क्षण अन् क्षणी ।।१।।  
वात्सल्याच्या **मेघा**तून त्या भरती संवेदना ।  
तिच्यात न्हाऊन जाई जेव्हा गरीब दुबळी प्रजा ।  
शरीर थकले तरी मनाला कोंब फुटू लागती ।  
**लक्ष्मणाच्या ऊर्मिलेचा** त्याग नावाजती ।।  
मातृत्वाच्या **रूपामध्ये** तोच नांदतो जगी ।  
त्या त्यागाची तमा न वाटे **संतोषच** जन मनी ।  
स्वास्थ्य मनाचे घेऊन येवो । हर दिन अन हर **निशा** ।  
**रिद्धी** सिद्धी घरात नांदो हीच असे मनिषा ।।२।।

उर्मिला ल. देशपांडे

एकादशीला रोज थोडे तरी लिहायचे ठरवले. पण ठरवलेल्या सर्व गोष्टी होतात असं थोडचं आहे. आज मात्र गुरुपौर्णिमा. माझ्या गुरुजनांनी अक्षरांचे ज्ञान दिले. विचार करण्याची व ती मांडायची किमया दिली, त्यांना आठवून का होईना आज आपण एक तरी पान लिहायचे ठरवले व त्याआधी माझ्या व्यवसायातल्या गुरु ज्यांना मी मानते, त्यांना फोन करून मनाने वंदन केले (सौ. नाडकर्णी यांना) खरंच, आपल्याला अक्षरज्ञान नसते व आपण एकट्याच रहात असतो तर आपण काय केले असते ? दुसऱ्या कोणी काय केले असते, म्हणण्यापेक्षा मीच काय केले असते कारण ही पाळी माझ्या वरचं होती. माझे वडिलांची रिटायरमेंट झाली तेव्हा मी दुसरीत होते. सांगलीत शाळेत नाव घातलं व पहिली पास झाले असणार तोच आम्ही तेरदळला गेलो. आठवत नाही पण त्यावेळी बराच गोंधळ झाला. आंबूचे लग्न (पळून गुपचूप). घरात काय चाललंय कळत नव्हतं. पण शांतता नव्हती एवढं खरं. आण्णा रजेवर असणार. आम्ही काका (बाबू) कडे आलो होतो. फडणिसांचा मोठा वाडा होता. त्यात अर्ध्या भागात काका, काकू, रहात होते. त्यांना मुलं नव्हती. त्यानंतर इंदूचं लग्न झालं. त्यांनी मागणी घालून दुसऱ्याकडून (डॉ. वाघ) केल्यामुळे अण्णांनी झटपट करून टाकलं. कारण आंबुमुळे ते धास्तावले होते. तेव्हा शरद अकरा महिन्यांचा होता. छान कुरळे केस, कमरेत घुंगर लावलेली साखळी, मनगट्या खूप गोड दिसायचा. त्याचं जावळ व मग इंदूचे लग्न झाले. त्यानंतर आण्णांची बदली कवठेमहांकाळल झाली व माझे नाव तेथे दुसरीत घातले असावे. शाळा खूप छान होती. मी संघाला जायची. (महाकालीच्या देवळात) कार्यक्रमात भाग घ्यायची. बाजूला डॉ. वाघ होते. त्यांना ४ मुली व दोन मुलगे होते. बाई जराशा भोळ्या होत्या. त्या मुलींबरोबर मी खूप खेळायची. विटी दांडू, सळी घेऊन पळायची शर्यत, सुई सुई सटक (खरे आखून) त्याशिवाय नाटकं बसवायचो. त्यात छबन म्हणून होती ती जरा मोठी होती. शिकायला सांगलीत राहायची. ती आमची खास गुरु. ती सांगेल ते आम्ही करत असू. पूर्वी एस.टी. बस नव्हत्या. चौगुले म्हणून कंपनी होती. त्यांच्या बस कवठ्याला सांगलीहून ये-जा करायच्या. त्या कंपनीवाल्यांची दोन मुलं होती- राम, गोपाळ. त्यांची व छबनची ओळख होती. ती जरा स्टंट होती. आम्हाला त्या मुलांना काहीतरी म्हणून चिडवायला लावी. त्यात गोपाळ जरा लाजरा होता. एकदा डॉ. घरी नाटकाचा (छोट्या छोट्या) व गाण्याचा कार्यक्रम ठरला. आम्ही मुलांनी पडदा वगैरे बांधला व गोपाळला अध्यक्ष म्हणून बोलावले व प्रथम मला स्वागत म्हणायला बसवले. मी खालची



मुंडी वर न करताच स्वागत म्हटले. बक्षिस समारंभही झाला. बसच्या मालकाचा मुलगा असल्याने त्याने पैसे दिले. आम्हा लहान मुला-मुलींना काहीच कळत नव्हते. ती सांगेल ते करणे. एकदा विजयसिंहना (१-२ वर्षाचा) घेवून सांगली सरकार कवठ्याला आले. विजयसिंह म्हणजे आताच्या राजश्री पटवर्धनचे वडील. त्याला बघण्यात आमचे पूर्ण दोन दिवस गेले. ते कोर्टाच्या आवारात गेस्ट हाऊसमध्ये उतरले आणि त्याची भिंत व आमच्या पेशंटच्या किचनची भिंत जवळजवळ. त्या भिंतीवर बसून आम्ही त्यांची अंघोळ, जेवण, हात धुवायला ३-३ नोकर. खूप मजा वाटायची आणि यावेळी आण्णांची बदली मंगळवेढ्याला झाल्यामुळे आमचे घर त्यांच्या जागेवर आलेल्यांना दिले होते. रात्री झोपायला त्यांच्या घरी जायचो व आम्हाला रहायला पेशंटचे किचनरूम दिल्या होत्या. त्या युवराजांचा पूर्ण दिवसभराचा कार्यक्रम बघण्यात दोन दिवस मजा आली व एरव्हीसुद्धा बस आली की, गोपाळ किंवा रामू एक दिवसाआड एक दिवस रामू व एकदिवस गोपाळ. ते आपला गल्ला पण कोर्टाच्या व्हरांड्यात मोजायचे. त्यामुळे छबन, माणिक व मी भिंतीवर बसून छबन सांगेल ते म्हणायचे. ३० पैसे फार आहेत म्हणून जोर दाखवू नको वगैरे वगैरे. असे आमचे दिवस खूप मजेत जात होते. आंबूच्या व इंदुच्या लग्नामुळे आण्णा-मामींना खूप मनस्ताप झाला. पण ते समजून घेण्याची किंवा त्यात सहभागी होण्याचे आमचे वयच नव्हते. ओढा घराजवळच वाहात होता. घर गावाबाहेर व बाजूलाच हॉस्पिटल छोटेच पण टुमदार. बाजूने झाडी आणि वाहणारा ओढा हे गांव मला खूप आवडायचं. शाळा पण छान होती. मोठी दगडी पाटी व ती सुद्धा शाळेतच मिळायची. त्यावर दिसायला काळी पण पांढरं अक्षर उठणारी मऊ पेन्सिल. मला शाळेतही कार्यक्रमात भाग घ्यायला मिळायचं. इथेचं मी लहान गटात शारदा नाटकांत काम केलं होतं. मला गाणं होतं, 'जा जा आणि घेवून ये पंखा.' ओढ्याच्या काठावर पण जरा गावात म्हणजे आमच्या घरापासून थोडं दूर दत्ताच देऊळ होतं. महाकालीच्या देवळातून शाखा संपवून दत्ताच्या देवळात जावून दंगा करून ओढ्यातच हातपाय धुवून संध्याकाळी मी घरात यायची. मात्र आण्णांना वेळ झालेला अजिबात आवडत नसे. घरात आल्यावर देवाजवळ दिवा लावलेला असायचा. तिथे बसून परवचा वगैरे म्हणून पाढे पाठ करून मग अभ्यास आणि ८-८.३० ला जेवण. मग बिछान्यात दंगामस्ती करत करत केव्हा निद्रादेवीच्या आधीन होत होतो हे कळत नव्हतं. याच गावात दत्तजयंतीदिवशी एक आनंदाची गोष्ट घडली. ती म्हणजे विजयचा जन्म. दत्ताच्या देवळातून घरी येतो तर छोटा दत्त जन्मलेला. विजयसिंह डोकित

असल्याने त्यांचे नाव विजयच ठेवले गेले. अशातच अण्णांची बदली मंगळवेढ्याला झाली. मी सकाळी किंवा संध्याकाळी बाळाचे कपडे धुवायच्या निमित्ताने ओढ्यात जाई. एकूणच ओढ्याचे मला फार आकर्षण होते. गावाच्या भोवती ओढा असल्याने शाळेतून पुन्हा १० मिनिटाच्या सुट्टीतसुद्धा मी ओढ्याला भेटून यायची. पण माझ्या या सुंदर बालपणाला कुणाची दृष्ट लागली? आण्णा रिटायर झाले. आम्हाला माझं आवडतं कवठेमहांकाळ, शाळा, शाखा, मैत्रिणी व मुख्य म्हणजे ओढा हे सर्व सोडून जावं लागलं.

इथं आणखी एक छान गोष्ट घडली. अर्थात आण्णांना पण रिटायर होणार हे माहित असणार. इथंचं राजा व बापूची खूप थाटात मुंज झाली. दवाखान्यावर टुमदार अष्टकोनी मोठा हॉल होता. तिथं मुंज व जेवण. खाली घराजवळ अंगणात तट्टी बांधून स्वयंपाक केला होता व त्यावेळी मामीने मला स्वत:च्या हातांनी आभाळी रंगाचा जरीचे काठ लावून परकर झंपर शिवला होता. तो मला इतका आवडला होता की, तो घालून मी मुंजीच्यावेळी खूप मिरवले. विजयचे बारसे सुद्धा थाटातच झाले होते. आण्णांच्याकडे पैसा फार नव्हता. पण हौस व उत्साह फार. म्हणतात ना हौसेला मोल नाही. पण आण्णांनी आम्हाला कधीच काही कमी पडू दिलं नाही. मामी पण कोंड्याचा मांडा करून संसार करणारी. मग आम्ही मुलं आनंदातच वाढणार ना ! आम्हाला एकमेकांबद्दल खूप माया होती. एकदा शरद हरवला म्हणून मी खूप रडले. अर्थात सगळेच रडत होते. तर हा गावात, जंगलात हुडकून आल्यावर घरातल्या हॉलमध्ये कोपऱ्यात गाढ झोपलेला व त्याच्यावर कुणीतरी बरीच दुपटी वगैरे टाकलेली. तेव्हा काका-काकू घरात होते. काकू बाळंतीण. तिला दुपटं हवं म्हणून घ्यायला कपडे काढते तर शरद जोरात घोरात होता. असे मजेत चाललेले दिवस. पण आण्णा रिटायर झाल्याने आम्हाला कवठेमहांकाळ सोडावे लागले व आम्ही मुडलगीस आलो. पूर्ण कानडी गाव. मला सांगली, कवठे वगैरे मराठी गांव व मराठी शाळेची सवय, घरात फक्त आण्णा, मामी व राजा बरोबर कानडी. बाकी आम्ही बापू, लीला सर्व मराठी बोलायचो. मुडलगीला आल्यावर बापूला शाळेत घातलं. मला पण शाळेत घातलं. पण शाळेत मी जाईचना. मला अक्षर काढणे जमेना व मुख्य शाळा आवडेना कारण मारुतीच्या देवळाच्या व्हरांड्यात शाळा भरायची. तिथं खूप धुरळा असायचा व फ्रॉक घाण व्हायचा. मी शाळेला जाणे बंद केले. घरातच



बसायची. मामीला मदत करायची व दुपारच्या वेळी कुंटभिमाक्का म्हणून मैत्रीण होती तिच्याकडे जायची. तिचे आजोबा घरातच पुस्तकं विकण्याचा बिझनेस करायचे. ती लंगडी होती म्हणून तिला कुंट भिमाक्का म्हणायचे. मला खूप वाईट वाटायचे. मग मी तिला नुसतचं भिमाक्का म्हणायची. तिचं छोटसं घर मला खूप आवडायचं. त्याला कारण पुस्तकं. तिचे आजोबा मराठी शिकले होते व ते मराठी पुस्तकं पण आणायचे व मला वाचायला द्यायचे व माझ्यावर खूप प्रेम करायचे. पूर्वी बिन्नी म्हणून एक क्लास असायचा. त्या वर्गातच अक्षर, बाराखड्या व पाढे शिकवत व मग पहिली. मी तर दुसरीत होते. त्यामुळे मला चांगले वाचता येत होते व वाचायच्या नादाने व पुस्तकाच्या आवडीने शाळेत जात नसले तरी मला ज्ञान मिळत होते. ते आजोबा माझा अभ्यासही घ्यायचे. कारण ते पूर्वी शिक्षक होते. असेच कंटाळवाणे पण त्यातच समाधान मानत दिवस जात होते. आण्णांनी इथं प्रॅक्टीस सुरू केली. ते परत स्वत:च्या दवाखान्यात रमू लागले. पण आण्णांना माझे घरी बसणे व बापूचे शिक्षणही बरे होईल का याची चिंता सतावत असणार. त्यामुळे आम्हा सर्वांचे एकूणच हाल होवू लागले. महायुद्ध संपलं असलं तरी त्याच्या महागाईच्या झळा संपल्या नव्हत्या. त्यात खेड्यात त्याची जास्त जाणीव होऊ लागली. लाल रॉकेल, साखर नाही त्यामुळे गुळाचा चहा व जेवणात कण्या, दूध दुभतं कमी व त्यात घरात माणसं राजा, बापू, लीला, शरद, विजय, काका, काकू, आण्णा, मामी. काका काही मिळवत नव्हते. (त्यांची मुलगी बाळी) त्यामुळे आपल्या मुलांचे हाल होवू नयेत व शिक्षणही व्यवस्थित व्हावे म्हणून जवळच असलेल्या तेरदळ या तालुक्याच्या गावी दोन खोल्या, अंगण व ब्राह्मण वस्ती असलेल्या ठिकाणी वेगळे ठेवले व तिथल्या शाळेत आमची नावे घातली. शाळा पण मराठी होती. इंदू व मामा पण तिथचं रहात होते (वेगळे) मामा कोर्टात नाझर होते. घर पण छान होते. शाळा तितकीशी आठवत नाही पण शाळा मोठी होती. मी व बापू शाळेत जावू लागलो. लीला पण कधी कधी यायची. शरद विजय घरात . विजय एक किंवा दीड वर्षाचा असेल पण चालत होता. (भिंत धरून) मला वाटतं याच सुमारास आंबूला मुलगी झाली शोभा, पहिला प्रकाश. मग तिची सारखी पत्रे आण्णांना येऊ लागली व आण्णांनी मी घरात बसते हे कळलेलं असणार. कवठ्यात असतानाच त्यांचे येणे जाणे चालू झाले होते. डॉक्टर हेरेकरांनी मध्यस्ती करून राग शांत केला होता. त्यामुळे त्या इयत्तेतील परीक्षा संपल्यावर मला बेळगावला पाठवले. मी शाळेत जात नव्हते. तेव्हाच स्वातंत्र्य मिळाले होते. आमचे बिऱ्हाड बहुतेक मध्येच म्हणजे दिवाळी नंतर केले असावे. झाले ऽऽ मी परत बेळगावला,

आण्णा मुडलगीला व छोटी कंपनी व मामी तेरदाळला असे आमचे कुटुंब तीन ठिकाणी पांगले. सर्वात दु:ख मला झाले. अर्थात मग आंबू व मामांची सवय होती. बेळगावला एकदोनदा राहिले होते. पण भावंडांना सोडून व आईवडिलांना सोडून जायचे खूप दु:ख झाले. जुगळकर म्हणून एक मास्तर मला बेळगावला घेवून गेले. टिळकवाडीत एका घरात ते रहात होते. (त्यांच्या मामाकडे) संध्याकाळी दत्ता केशकामत मला आंबूकडे घेवून गेले. त्याच्या सायकलवरून आंबूचे घर यावेळी रेघे कंपाऊंडमध्ये गोंधळी गल्लीत होते. पहिल्यांदा मी गेले तेव्हा भांदुरगल्लीत रहात होते. महिना असेल एप्रिल मेचा. माझे नाव जूनमध्ये शाळा नं. ३ (मुलींची) समादेवी गल्ली येथे घातलं गेलं. नक्की कितवीत होते आठवत नाही ३ री किंवा ५ वी त होते एवढे खरं. शाळा तशी लांब नव्हती. पण चौथी पर्यंतच होती. बाजूला समदेवीचे देऊळ व मोठे अंगण होते. शाळा सुटली की दप्तर देवळाच्या पायरीवर ठेवून भरपूर खेळून मग मी घरी जात असे. कारण घरी खेळायला कुणी नसे. लंगडी, खो-खो, उभा खो-खो व एकट दुकटं असले खेळ खूप खेळायचो. दोरीच्या उड्या पण मारायची. दिवस बरा जायचा. पण घरात आलं की आण्णा, मामी व भावंडांची आठवण यायची. रडायला यायचे. मग मी बाथरुममध्ये अगर व्हरांड्यात रडून यायची. खाताना पण घशात अडकल्यासारखे व्हायचे. खायला प्यायला कमी नव्हते. तसे आंबू मामा प्रेमाने वागायचे. पण कळपातून कोकरू लांब राहिलं की कसं त्या कोकराला एकटं एकटं वाटतं तसचं माझं होत होतं. घरी लहान मुलं असल्याने व मला मुलांची आवड असल्याने मन रमायचं. थोडे दिवस तसे काम वगैरे नसायचं. पण हळूहळू कामं पण पडू लागली. तसं मामी कधी चुली जवळच काम सांगत नसे . त्यामुळे मला मुलांना खेळवणं, पाटपाणी घेणं असलं जमायचं. पण मुलं आजारी असली की मला बरचं करायला लागायचं. मग अरुणाचा जन्म झाला. ती लहान असताना ( १ महिन्याची) आंबूला टायफाईड झाला त्यामुळे बाळाला दूध घालण्यापासून मलाच करावे लागले.

अशी मध्ये मध्ये शाळा चुकायची. पण तरी मी लवकर उठून अभ्यास करायची. पण शाळेत गैरहजर रहावं लागे. आंबू आजारी असल्याने तिने मला पेज करायला सांगितली. पेज म्हणजे मला माहित नव्हतं. तिने थोडे तांदूळ व भरपूर पाणी घालून शिजवायला सांगितलं. त्याप्रमाणे मी पेज केली. झाली का दाखवायला चिमट्याने पातेले धरून बिछान्याजवळ नेले व सर्व पेज बिछान्यात पडली. म्हणजे कामं करायला व चुकली की शिव्या खायला इथून सुरुवात झाली म्हणायला हरकत नाही.



घरात एक बाबू नावाचा मुसलमान नोकर होता. तो प्रकाशला सांभाळायला आला. म्हणजे माझ्यानंतरच तो प्रकाशला सांभाळायला, ४८ सालापासूनच आला. तो प्रकाशला भरवणं, झोपवणं सगळचं करायचा. घरातली पण झाडणं, बिछाने घालणे, बिछाने काढणे याही गोष्टी करायचा. एकूण काय वरची कामे करायचा. आंबूला स्वयंपाकाची तेवढी आवड नव्हती. करायची खूप छान. पण तिची तरी काय चूक. नेहमी गरोदर, बाळंतपण, लहान मुलं व आजारपण. त्यामुळे मामा नावाच्या माणसाला म्हणजे त्याला आम्ही सर्व मामा म्हणत होतो, गोव्याकडचा होता. त्याला स्वयंपाकाला ठेवले म्हणजे घरातच रहायचा. मला तो नर्सबाई म्हणायचा. कारण मी बांगड्या घालत नव्हते. प्रकृतीने छान गोल, गुबगुबीत हात व बांगड्या नाही. त्यामुळे मामा चिडवायचा. बांगड्या न घालण्याला कारण होते. एकदोनदा बांगड्या घेवून दिल्या. (काचेच्या) व त्या लगेच फुटल्या. मग आंबू रागवायची. त्यामुळे मी बांगड्या घालायचे सोडून दिले. या मामाचे जेवण अफाट होते. करायचे भरपूर खायचे भरपूर, मी, मामा व आंबू जेवढं खाऊ तेवढं त्याला एकट्याला लागायचे. वर्षाचा भाताचा तट्टया ६ महिन्यात संपला, तेव्हा मात्र आंबूनी त्याला काढून टाकले. तो असेपर्यंत मजा होती. उठल्या उठल्या नाष्टा व चहा मिळे. त्याच्या हातालाही चव होती. माझी प्रकृती पुढच्या हालअपेष्टा सहन करण्यासाठी चांगली तयार झाली असे म्हणायला हरकत नाही. मामा गेल्यावर परत स्वयंपाकाला कुणालाही ठेवले नाही. मध्ये मध्ये एक दोन बायका भाकरी पोळी करायला होत्या पण पुढे नाही. मामा (आंबूचे मिस्टर) सकाळी ९ ला मुस्लिम को-बँकेत जायचे. तिथं ते मॅनेजर म्हणून काम करायचे. त्यांना नोकरी करणं आवडत नव्हतं. पण ते खूप हुषार होते. त्यामुळे त्या लोकांनी जुलमानीच ती नोकरी करायला भाग पाडलं होतं. ती बँक सकाळी ९.३० ला सुरु व्हायची. त्यामुळे आमचा नाष्टा नऊला व्हायचा. अर्थात ताजे काहीतरी - कायलोळी, तवसोळी, थालीपीठ, भाकरी, चपाती, उपमा, पोहे काही पण भरपूर खाऊन शाळेला जायचे व दीड-दोनला जेवण. त्यामुळे मी शाळेतून २ वाजता जेवायला येत असे. स्वयंपाकी मामा असेपर्यंत मजा होती. आरामात उठायचं, स्वत:चे आवरायचे, थोडं काही असेल ते काम करून नाष्टा करून अकरा वाजता शाळा व दुपारी येवून जेवण करायचं. मामा थांबलेलाच असायचा वाट पाहात. मग मी परत पळत २.३० ला शाळा गाठायची. पण मामा गेल्यावर मला पण काम करावे लागायचे. नाष्ट्याची तयारी करणे, कुकर लावणे, चहा करणे ही कामे मला हळूहळू

जमू लागली. मी पाचवीत गेले. मला खास आठवत नाही कारण स्वातंत्र्य मिळलं ४७ ला ते तेंव्हा मी घरातच होते. मुडलगीला म्हणजे मी ४८ ला बेळगावला गेले. पहिला स्वातंत्र्यदिन तिथं साजरा केला. १४ ऑगस्ट घरात रेडिओ आणला. सकाळी ६-७ वाजता लतानं रेडिओवर गाणं म्हंटलं. हे सगळं आठवतं. पण नाव कोणत्या इयत्तेत घातलं ते आठवत नाही. एक वर्ष बाई बेटगेरी होत्या. म्हणजे तिसरीतच असणार. चौथीला कोरगांवकरबाई होत्या. थोड्या दिवसांनी त्यांची बदली झाली. त्या खूप छान शिकवायच्या. त्यांची बदली एक नंबर शाळेत झाली. त्यांनी आम्हा मुलींना पाचवीला त्या शाळेत यायला सांगितले. आम्ही बऱ्याच मुली कोरगावकर बाईंनी सांगितल्याप्रमाणे एक नंबर शाळा मुलींची मारुती गल्ली येथे जाऊ लागलो व सांगितल्यांप्रमाणे त्या बाईंनीच आमचा वर्गही मागून घेतला. शाळा बरीच लांब पडायची. मधल्या सुट्टीत पळत येऊन जेवण करून परत पळत शाळा गाठायची. पण अभ्यास चांगला चालला होता. मामा बँकेतच होते. घरात बाबू असायचा. तो ६ महिन्यांनी वर्षांनी भांडून, रुसून गावाला जायचा व परत आपणच यायचा. पण असला की खूप प्रेमाने सर्व करायचा. माझ्यावर पण कामाचा ताण पडायचाच. शेगडी (कोळशाची) वर स्वयंपाक असायचा. मी ५-६ कप चहा करायला ठेवला. सकाळी उठल्या उठल्या, मामांना, बिछान्यात चहा लागायचा. त्यामुळे चहा मीच करायचे. चहा उकळला, तो उतरवताना सगळा पायावर पडला. मला आंबू किंवा मामा रागावतील या भीतीने मी ओरडलेसुद्धा नाही. पाय धरून गप्प बसले. डोळ्यातून पाणी वाहात होते. मामा मला शांती शांती हाका मारतात पण मला ओ म्हणता येईना. शेवटी ते रागाने उठून आले तर चहा चोथ्यासकट पायावर पडलेला व मी रडते आहे. त्यांना वाईट वाटले. पण त्यांचं वाक्य अजून आठवतं, ''अगं, ६-७ कप उकळता चहा पायावर पडला तर, निदान जोरात ओरडशील की नाही, माणूस आहेस की कोण? एवढी सहनशक्ती तुझ्यात.'' पण पुढच्या सर्व आयुष्यात या सहनशक्तीमुळेच मी यशस्वी झाले व मी अजात शत्रू म्हणतात तसे मला एकही शत्रू नाही. मला कुणी माणूस वाईट दिसत नाही. कुणी वाईट वागलंच तर त्याला काही दु:ख असेल, त्रास असेल म्हणून तो तसा वागला असेल. मी कधी वर्गात कुणाची गट्टी फू वगैरे करत नसे. सर्वांशी बोलायची, एकदा मात्र केळकर बागेतल्या बोरकर नावाच्या मैत्रिणीशी मी गट्टी फू केली, कारण तिनं मला मी पाचवीत नापास झाले असं सांगितलं म्हणून. बिचारीची उगीच गट्टी केली. कारण मी खरंच नापास झाले होते व मला वाटले ती माझी कुचेष्टा करते आहे. मी शाळेत गेले तर मी खरंच नापास. मला खूप वाईट वाटले. मी घरात आल्यावर सांगितले तर



मामा म्हणाले चल बघूया. मी शाळेत गेल्यावर ते १२ वाजता बँकेतून शाळेत आले. सर्व टीचर खूपच घाबरल्या. कारण त्यांना वाटले नवा साहेब आला. हेडबाई उठल्या. त्यांनी आपली खुर्ची बसायला दिली. मग मामांच्या लक्षात आलं व त्यांनी आपण कुणी साहेब नसल्याचं व पालक असल्याचं सांगितलं. मग कुणाचे पालक? मला बोलावलं, मी तर घाबरून गार. मग रिझल्टशीट काढून आणून माझे मार्क पाहून झाले. हेडबाई म्हणाल्या, हिला कसं काय नापास केलं. ही सर्व विषयात पास आहे व गणितात ३५ ऐवजी ३२ मार्क आहेत. ती प्रमोट होवू शकते. क्लास टीचर कोरगावकरना बोलावलं. त्यांना विचारल्यावर त्या म्हणाल्या, मी प्रमोट नाही करणार. हेडबाई म्हणाल्या, तुम्ही किंवा मी काय करणार? एका विषयात फेल असेल तर प्रमोट करण्याचा नियमच आहे व मला प्रमोट केले म्हणजे सहावीत घातले. कोरगांवकर बाईंना राग आला व त्यांनी आपण घेतलेला सहावीचा वर्ग नाकारून दुसरा वर्ग घेतला. आमचा वर्ग फडणीसबाईंनी घेतला. मामांनी बाईंना माझे गणित सुधारण्यासाठी क्लास लावायचं कबूल केलं व त्याप्रमाणे बोरकर बाईंच्याकडे क्लासला पाठवलं व माझं गणित उत्तम झालं व माझ्यावर इतकं प्रेम करणाऱ्या कोरगावकरबाई मात्र माझ्याशी बोलायच्या बंद झाल्या. त्यांचं रागावण्याचं कारण होतं, मी २-३ महिने शाळा चुकवली याचं. पण मी घरी बसून अभ्यास करतच होते व शाळा का चुकवली याचं कारण त्यांनी विचारलं असतं तर त्या रागावल्या नसत्या. आता मी २-३ महिने शाळा का चुकवली त्याला कारण तसचं गंभीर होतं. एक दिवस रात्री ११ च्या सुमारास राडवर लग्नाची वरात वाजत आली व आंबूनी मला उठवलं. खूप मोठी वरात आली आहे, बघूया चल. एवढं का उठवलं तर तिला खाली अंधारात जाऊन दार उघडायला भीती. मी मात्र प्रथम पासून खूप धीट, घाबरणे, वगैरे नाही. घरात लाईटचं फिटींग होऊन दोन दिवसापूर्वी लाईट आलेले. मी उठले. व्हरांड्यातला लाईट लावला. आंबूपण आली. एल आकाराचा जिना उतरून बाहेरचे दार उघडायचे. पहिल्या ५-६ पायऱ्या उतरले व वळून खाली चौकात जायला पायऱ्या उतरत असताना मला तिथं कुणी उभं आहे असं दिसलं व मी माझा उतरण्याचा वेग कमी केला. आंबू लवकर दार उघडायला सांगत होती पण माझं लक्ष त्या माणसाकडे. हळूहळू त्याच्याजवळच्या पायरीवर गेले. तर अंधार बराच होता. पण ५-६ फूट उंच माणूस व लाल डोळे असा माणूस दिसू लागला. मला वाटलं नारायण (आंबूचा मामा) माझी मजा करतोय. म्हणून त्याच्या छातीजवळ होत नेऊ लागले. मला लक्षात आलं हा नारायण नाही. कारण तो इतका उंच नाही व एवढा शांत रहाणार नाही. माझा हात छातीला लागणार

इतक्यात ती व्यक्ती जोरात हलली व मी घाबरून इतक्या जोरात ओरडत वर येत आंबूच्या अंगावर पडले. ती पण पडली. बाहेर काठ्या घेऊन लोक गोळा झाले. मामा उठले. मी एवढी ओरडले की रस्त्यापलिकडचे लोक पण आले. घरापासून रस्ताच १५-२० फूटाच्यापेक्षा जास्त. पाहातात तर कुणीच नाही. मग मला कोण दिसलं. रेघेची बरीच ३-४ कुटुंब होती. ते म्हणाले, या आवारात ब्रह्म आहे. तो रात्री घुंगराची काठी घेवून फिरतो. तोच शांताला दिसला. शांता भाग्यवान त्याने तिला दर्शन दिले कारण रेघे कुटुंबातल्या १-२ माणसांनीच त्याला पाहिला होता. माझ्या या भाग्यामुळे मी मात्र २-३ महिने आजारी पडले. कारण जोरात ओरडल्याने हार्टचा आकार मोठा होऊन छातीत दुखत होतं व जेवण ही निम्म्यापेक्षा कमी.

डॉ. नी काम करणं, अभ्यास करणं, थंडीत फिरणं सर्व बंद करायला सांगितल्यामुळे माझी चांगलीच पंचायत झाली. काम नाही करायचं त्यामुळे आंबूवर कामाचा ताण पडायला लागला. मामांनी मला मुडलगीत विश्रांतीसाठी सोडायचं ठरवलं. आम्ही सर्वजणच मुडलगीत आठ दिवस राहिलो. मला सोडून आंबू व मामा निघाले पण मी तिथं राहायलाच तयार नाही. परत त्यांच्याच बरोबर बेळगावला आले. औषध सुरू. शाळा बंद. एक-दोन महिन्यांनी मी मधेमधे शाळेला जावू लागले. शाळेच्या वाटेवरच नाईक डॉक्टरांचा दवाखाना होता. ते खूप रागीट होते. त्यांनी एक दिवस रस्त्यातच मला गाठलं व रागावले. मग परीक्षेच्या वेळी मात्र मला जायला परवानगी मिळाली. आणि सर्व गोंधळामुळे मी पाचवीत गणितात नापास होवून कोरगावकरबाईंचा राग ओढवून घेतला. एकूण काय नकटीच्या लग्नाला विघ्नं फार तसं माझ्या शिक्षणात प्रत्येक वर्षाला संकट. सांगलीत बिगारीत नाव लावलं. पूर्वी सहा वर्षे पूर्ण झाल्यावर बिगरी का बिन्नी असं नाव होतं त्या वर्गात नाव घालायच. त्या वर्गात मुळाक्षर, बाराखड्या, पाढे व थोडी जोडाक्षरे शिकवायचे मग पहिली. सांगलीतली परीक्षा मला आठवतच नाही. कारण आंबू व इंदूच्या लग्नाचा गोंधळ. कवठ्यात नाव बहुदा पहिलीत लागलं असणार. तिथं मात्र परीक्षा होईपर्यंत होतो. मग मी दुसरीत गेले. मग अण्णा रिटायर्ड झाले. एकूणच काय वाऱ्यावरच्या वरातीसारखी शाळा एकदा बेळगावात स्थिर झाली पण एक वर्ष आंबू आजारी व अरुणा छोटी म्हणून एक महिना शाळा चुकली. व आता पाचवीत माझ्यामुळे. सहावी-सातवीला मात्र मला चांगल्या प्रेमळ बाई भेटल्या. फडणीस, जरा वयस्क, दिसायला जरा कुरुप पण नेहमी हसतमुख व त्या कुरुप दिसण्यात सुंदर प्रेमळ मन



होतं. पण त्यांच्या नवऱ्याला ते दिसलं नसावं. त्यांना नवऱ्यानं सोडलं होतं.

पण फडणीसबाई खूप स्वाभिमानी होत्या. त्यामुळे त्या स्वत:च्या पायावर उभं राहाण्यासाठी शिकून शिक्षिकेची नोकरी करत होत्या. मला घरातलं सगळ आवरून शाळेत जायला खूप वेळ व्हायचा. ज्यांना वेळ होईल त्यांना सर्व मुली उभं राहून नमस्ते करायची शिक्षा बाईंनी सुरू केली होती. पण मला रोजच नमस्तेची शिक्षा भोगावी लागायची. कारण लवकर शाळेला येणं माझ्या हातात नव्हतं. एक आठवडा झाल्यावर बाईंनी मला जवळ बोलावून प्रेमाने वेळ होण्याचं कारण विचारलं. तेव्हा त्यांनी माझी अडचण ओळखली. त्यानंतर मला लवकर येण्याचा प्रयत्न करायला सांगून नमस्तेची शिक्षा बंद झाली. उलट माझ्याकडे जास्त लक्ष देवू लागल्या. मी रोज त्यांच्या सोबतच घरी जायची. कारण त्या गोंधळी गल्लीच्या कोपऱ्यावरच आशा बिल्डिंगच्या मागे राहायच्या. भावाच्या घरात- भावजय व मुलांसोबत. त्यांची व माझी चांगली गट्टी जमली. याचवेळी प्रकाशला शिकवणीसाठी टीचरचा शोध चालला होता. मी यांचं नाव सांगितलं. मला घरात खूपच काम पडायचं. अभ्यासाला वेळ मिळतच नसे. बाईच म्हणाल्या प्रकाशबरोबर शांताला पण पाठवा सोबतही होईल. मामा व आंबू लगेच तयार झाले. माझ्या सहावी-सातवी ही दोन वर्ष त्यांच्या शिकवणीतच अभ्यास होऊ लागला. त्या बाईंना वाळूचे तेल काढणाऱ्या बाई म्हणून नाव होतं. मला वाटतं, मुलांशी प्रेमानं वागून, त्यांच्या अडचणी समजावून घेवून ज्या टीचर त्यांना मार्गदर्शन करतात. त्यांना ही उपाधी का देवू नये?

मी पहिल्या झटक्यात सातवी पास होईन असं वाटतचं नव्हतं. कारण परीक्षा बोर्डाची व खूप कडक घेतली जायची. त्यात शिवणमध्ये रफू, ठिगळ, मुरड, धावदोरा, टीप तसेच चड्डी, ब्लाऊज, झबले बेतणे असा अभ्यासक्रम. पण बाईंनी माझा आत्मविश्वास इतका वाढवला की मी पहिल्या झटक्यातच सातवी पास झाले.

घरातली काम व अभ्यास करून मी पास झाल्यावर माझ्यापेक्षा त्या बाईंनाच खूप आनंद झाला. मग मला समजले की कोरगावकर बाईंनी यांच्याबरोबर मी पहिल्या वर्षी पास होणार नाही, म्हणून पैज मारली होती. पण जेव्हा त्यांना माझ्या अडचणी समजल्या तेव्हा कोरगांवकर बाईंनाही वाईट वाटले. सातवीचे पेढे

प्रथम कोरगावंकरबाईंना देवून मला नमस्कार करायला फडणीसबाईंनी सांगितले. मी पण तसे केले तेव्हा त्यांच्या डोळ्यात पाणी आले. ''मग काय मुडलगीची म्हैस पास झाली'' मला कोरगांवकर बाई मुडलगिची म्हैस म्हणायच्या. कारण मी भूगोलाचा प्रश्न विचारला असताना,'मुडलगीला म्हशींचा बाजार भरतो' असे सांगितले होते.

अशा प्रेमळ व आदर्श टीचरना कुणी विसरेल का? पुढे मी ट्रेनिंगला असताना कोरगांवकरांना आदर्श शिक्षिकेचा पुरस्कार मिळाला. मी मुद्दाम त्या कार्यक्रमास जावून त्यांचं अभिनंदन केले. मी ट्रेनिंगला जाते म्हणून त्यांनाही खूप आनंद झाला. फडणीसबाई मात्र माझ्या लग्नानंतरसुद्धा भेटायच्या गोंधळी गल्लीत. मी खूप प्रेमाने त्यांना घरी बोलवायची. माझा संसार बघायला यायची त्यांची खूप इच्छा होती पण त्यांच्या भाचीने मुस्लिम मुलाशी लग्न (जांबोटिंला) केले व त्या धक्क्याने त्यांचा भाऊ वारला. मग त्यापण जांबोटिंलाच राहायला गेल्या. त्यामुळे परत त्यांची व माझी भेट झालीच नाही. एकूण काय मुडलगीला एकदा शांताबाई घरात बसल्या होत्या. त्या सातवी तरी झाल्या खरं म्हणजे आण्णा म्हणायचे घरात बस व कामं शिक. एक भटजी बघून लग्न करून देतो. मी पण म्हणायची, ''बरं झालं रोज कुणाकडे तरी जेवायला जायचं, स्वयंपाक करायलाच नको.''

असो. एकूण काय घरांत बसून शाळा न शिकता भटजीची बायको होणारी शांता सातवी झाली आण्णा, मामींना आनंद झाला. कारण त्या दिवसांत सातवीला ही खूप महत्त्व होतं. आता बारावी झाल्यावर जो टीचर्स ट्रेनिंगचा कोर्स घ्यायला डोनेशन द्यायला लागतं ते त्या वेळी सातवीच्या सर्टिफिकेटवर मिळत होतं. न डोनेशन देता व फि होती ३०/-रुपये. आतासारखे शाळेत जायला ॲडमिशन वगैरे लागत नसे. कुठल्याही महिन्यात शाळेत ॲडमिशन मिळत असे. आता माझेच पहा... १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. तेव्हा मी घरांत बसले होते पण सप्टेंबर-ऑक्टोंबर तेरदळला घर केले. तेथील शाळेत नाव दाखल केले. अर्थात पहिला कवठेमहांकाळचा दाखला होता. मला वाटत, मी लगेचच परत एक-दोन महिन्यातच बेळगावला परत तेरदळचा दाखला घेवून बेळगावला नाव दाखल केलं. तसं तेरदळच घर जानेवारीनंतर काढून (१९४८) सर्वजण मुडलगीतच राहू



लागले. माझी लहान भावंडे परत सगळी कानडी शाळेत जावू लागली. त्यांचे भाग्य थोर त्यांना आई-वडिलांजवळ रहाता आलं. मी मात्र आई-वडिलांच्या प्रेमाला तेव्हापासूनच बऱ्यापैकी दुरावले. तेरदळचे घर गांधींजींच्या हत्येनंतर काढावे लागले. कारण पूर्ण भारत बंद. दंग्याची लाट उसळली, सगळीकडे जुने हेवेदावे उकरुन खून व जाळपोळी सुरु झाल्या. व तेरदळमध्ये ब्राम्हण पुरुषांना आंत खोलीत घालून पेटवले. सर्वजण तडफडून मेले. त्यावेळी मी बेळगावला होते. शाळेत जात होते पण शाळांना सुट्टी होती. मामांचे गाव तांदुळवाडी, तिथे पण खूप जाळपोळ झाली. बायकांना त्रास दिला. घरातले सामान बाहेर काढून होम केला. त्यातलं लग्नाचं सामान, तूप या वस्तू पण टाकल्या. मामा शांतता राखायला जात होते. कवठ्याहून पण माणिक, छबनचे पत्र आले होते. तेथे त्यांचे घर पेटवले व त्यांना आम्ही रहात असलेल्या किचनमध्ये रहावं लागले.

एकूण १९४८ सालच्या सुरवातीपासूनच भारतात अशांतता सुरू झाली होती. ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले जानेवारीत एका गोडसे नावाच्या ब्राह्मणाने गांधीजींचा गोळ्या घालून खून केला व याच कारणाने सर्व देशात अशांतता सुरू झाली. सर्व देशाला त्याचा त्रास भोगावा लागला. त्यावेळी टी.व्ही. नसल्याने व आमच्या घरात रेडिओ नसल्याने आम्ही घरातले सर्वजण बेळवी चाळीत मामांच्या चुलत भावाच्या घरी गांधींजींच्या अंत्ययात्रेची कॉमेंट्री ऐकायला गेलो होतो. गांधी गेले तर खरोखर लोक रडत होते. असा महान नेता आत्ता कुठे मिळेल का? त्यांचा खून खटला सुरू झाला. मला वाटते जवळजवळ एक दीड वर्ष चालला असेल. 'लोकशक्ती' नावाचा पेपर घरांत यायचा व मी तो खटला नेहमी पूर्ण वाचायची. तेव्हापासूनच मला डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचायची ती सुरवात झाली. सावरकर तेव्हापासून मला आवडेनासे झाले. कारण त्यांनी आपटे व गोडसे यांना यशस्वी होण्याचा आशीर्वाद दिला. अर्थात, तेव्हा मला राजकारण खूप कळत होतं असं नाही. पण न कळतच मनामध्ये कॉंग्रेसविषयी प्रेम व संघाविषयी राग मनात घर करू लागला एवढं खरं.

खरं म्हणजे मी प्रथम शाखेत जात होते. शाखा मला खूप आवडायची.'नमस्ते सदा वत्सले' ही प्रार्थना मी रोज म्हणायची. सावरकरांच्या गोष्टी पण ऐकायची पण ज्याने देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यायला एवढे परिश्रम

केले त्या नेत्याला असे मारणे मला त्या लहान वयात आवडले नाही. संघाचे लोक म्हणायचे, ''त्यांच्यामुळेच पाकिस्तान निर्माण झाला.'' वगैरे...वगैरे... मला काय कळणार तेव्हा? पुढे गोडसेला फाशीची सजा मिळाली. मला आठवत नाही पण आपटेलाही शिक्षा झाली. माझी आई (मामी) सांगायची, मी लहानपणी खूप हट्टी हो ती व खूप रडायची, खूप चिडायची. अर्थात २-४ वर्षांची असताना मला वाटत, त्यावेळी आंबू व इंदू शहापूरला (बेळगावजवळचे) काकाकडे शिकायला होत्या. त्या दोन्ही मुली व त्यांच्या पाठीवर झालेला राजा मंद बुद्धीचा आणि त्याच्या पाठीवर मी चार-पाच वर्षांनी झाले. ती परत मुलगीच. माझ्या पाठीवर दोन वर्षांनी मुलगा झाला बापू. बापू लहान मुलगा म्हणून व राजा अर्धवट म्हणून त्या दोघांकडे जास्त लक्ष दिले जाई व बहुतेक माझ्याकडे त्यांचे दुर्लक्ष होत असणार म्हणून आपल्याकडे लक्ष वेधून घ्यायला मी हट्टी व रडवी झाली असणार. मलासुद्धा थोडे आठवते मला एकदा विहिरीत टाकतो म्हणून आण्णांनी विहिरीत वाकवलेले. मी घाबरून गप्प बसले. त्यानंतर चार वर्षांची असताना काकाकडे शहापूरला आलो. हट्ट केला म्हणून मला खोलीत कोंडून ठेवले व रागाने मी काकूची चांगली मोठी बरणी फोडली. मग मात्र घाबरून सर्वांनी मला बाहेर काढले. बाबूकाका मात्र माझ्यावर खूप प्रेम करायचे. शहापूरला आले की मला एक ढबू पैशाचा एक द्रोणभर शिरु मारवाड्याकडचा कुंदा आणून द्यायचे. खूप सुंदर खुसखुशीत शंकरपाळीपण द्यायचे. मला पलंगाच्या खाली बसून खायला सांगायचे. व आपणच सर्वांना सांगायचे, ''दोन पायाचं मांजर कॉटखाली बसून कुंदा खातंय.'' मग दोन वर्षाचा बापू यायचा बघायला. त्याला पण मी द्यायची. त्यावेळी लिला छोटं बाळ होती. का कोण जाणं पण लिलाच्या जन्मानंतर माझा हट्ट कमी झाला व मी तिच्यावर खूप प्रेम करायची. पूर्ण आयुष्यात सर्वांत प्रेम कुणावर केलं तर लिलावर. व तिनं माझ्यावर. कधी भांडण नाही, रुसणं नाही. अगदी कळायला लागून लग्नं झाली, तरी कधीच आम्ही एकमेकांवर रागावलो नाही. त्याच कारण मात्र अजूनी कळत नाही.

माणूस आपल्या मनांत एखादी गोष्ट करायची ठरवतो पण ठरवलेले सर्व घडायला मात्र शेवटी आपल्या नशिबांतच असावं लागतं. मी सातवी पास झाल्यावर सर्व मैत्रीणीसोबत महिला विद्यालयामध्ये आनंदाने जावू लागले. मला



मोजक्या पण अगदी जिवलग मैत्रीणी होत्या. नलिनी ढवळे, शालन शिंदे, उचगांवकर, परब या जास्त आवडत्या. ललिता जोशीबरोबर मैत्री होती पण बाकीच्यांशी तिचं पटायचं नाही. तिला चिक्कू म्हणून मुली चिडवायच्या. कारण पेन्सिल किंवा शिसपेन्सील ती कायम त्याचा छोटा तुकडा वापरायची. पूर्ण कधीच नसणार. पण मी मात्र सर्वांशीच जमवून घेऊन वागायची. कारण जमवून घेण्याचं घरात चांगलंच ट्रेनिंग मिळायच. असो. सर्वजणी शाळेत गेलो. एकाच वर्गात राहाणार होतो. मी पण खूप आनंदात होते. कारण घर व शाळा अंतर कमी होतं. त्या शाळेच्या हेडबाई तिनईकर, समोरच्या रोडवर त्यांच घर. पण हा आनंद माझा फार काळ टिकला नाही. मामांनी मला टीचर ट्रेनिंगला घालायचं ठरवलं. मी अक्षरश: रडले. त्याला दोन-तीन कारणं होती. एक मैत्रीणी दुरावणार, सिस्टर व्हायचं बंद व तिसरं म्हणजे लहानपणापासून म्हणजे शाळेत नाव घालायच्या आधीपासून मला इंग्लिश शिकायचं होतं तेही बंद होणार. खरं म्हणजे त्या कोर्सला माझं वय कमी पडत होतं. पण मामांनी मित्राची ओळख काढून वशिला लावून माझी स्पेशल केस म्हणून वडगांवच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये ॲडमिशन घेवून माझं मनातलं स्वप्न पूर्ण बदलून टाकलं. सिस्टर न होता मी आता टीचर होणार होते. अर्थात मामांचा उद्देश वाईट नव्हता. त्यांच्या बऱ्याच ओळखी होत्या. त्यामुळे ट्रेनिंग संपताच मला नोकरी लावायची व आण्णांच्या संसाराला माझा थोडा हातभार लागेल. असा हेतू मनात ठेवूनच त्यांनी मला या कोर्सला पाठवले.

झाऽऽलं.... आमचा आता खरा वनवास सुरू झाला. वयाने मोठी झाल्यामुळे घरात काम भरपूर. आंबूची बाळंतपणं, गरोदरपणं अर्थात मामी बाळंतपणाला यायची. पण एक दिड महिन्यानंतर कुणी नसणार. घरांत लहान मुलं व त्यातच बाबूचे रागावून,रुसून जाण्याचे प्रमाण वाढलेले. कारण त्याचे लग्नाचे वय होवून गेलेले. तो नेहमी मोठ्यांची मुलगी आपली बायको होणार, अशी स्वप्नं पहायचा. मला सांगायचा बँकेचे डायरेक्टर नासवालेची मुलगी मला देणार; धारवाडकरांची मेहुणी माझ्याशी लग्न करणार. मी मात्र गप्प ऐकून घ्यायची. बिचारा छान स्वप्न रंगवतो. त्याला कशाला नर्व्हस करायचा. पण त्याचं त्यालाच हे घडणार नाही, असं वाटलं की तो काहीतरी भांडण काढायचा व कलादागिला निघून जायचा. परत १५-२० दिवसांनी येऊन दरवाजात लपून उभा राहायचा. प्रकाश व

शोभा, बाबू आला म्हणून टाळ्या वाजवत आनंदाने आत यायची. तो नसला की मला खूप काम पडायचं. असला व तेही सरळ असला तर मला खूप मदत करायचा. पण चुकून मी त्याच्याविरुद्ध थोडं जरी बोललं की, माझ्याशी बोलणं सोडायचा, मग मुद्दाम माझी चहाडी आंबूला सांगून आमच्यात भांडण लावायचा. माझा बिछाना घालायचा नाही, बिछाना काढायचा नाही. असा त्रास द्यायचा. मी पण लहानच होते. मग मी मामांना सांगायची व कधीकधी त्यांचं वागणं त्यांच्या लक्षात यायचं. मग ते त्याला रागावयाचे. ''काय रे... बाबू, शांताबाईका बिछाना क्यो नही डाला?'' मामा त्याच्याशी हिंदी बोलायचे. मी व आंबू कानडी बोलायचो. मुलं मात्र मराठी बोलायचीत. एकूण काय आमच्या घरात अशा तीन भाषा चालायच्या व त्या बाबूशी शक्यतो जमवून घेवून मला रहावं लागायचं. कारण तो गेला तर मलाच त्रास होतो. हे मला कळू लागलं. मग मी त्याच्याशी गोड बोलून कामे करवून घ्यायला आपोआपच शिकले. अनुभव हाच शिक्षक.

माझे ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले. सकाळी साताला सुरू व्हायचं व बाराला सुटायचं. सातला प्रार्थनेला सर्वांनी हजर राहावं लागायचं. मुलांचे हॉस्टेल होतं. मुलींच होतं कां ते आठवत नाही. मुली बहुदा रुम करून राहायच्या. कॉलेज वडगावच्या राजवाड्याच्या काही भागात चालायचं. वाडा खूप मोठा होता. त्यातल्या मेन हॉल आम्हाला प्रार्थनेला वापरायला परवानगी होती. तिथंच प्रार्थना, ड्रॉईंगचा पिरेड व कधीकधी सामुदायिक सुतकताई तिथेच होई. तिथचं वडगावकरांच देवघर होतं. खूप छान होतं. तिथे भटजी रोज सकाळी पुजेला येत असत. दोन्ही बाजूला जिने होते. ते पाहिले तरी भिती वाटायची. दगडी पायऱ्या खूप उंच जिना. मुली तशा कमीच होत्या. त्यामुळे मुलींचा वर्ग बाहेरच्या बाजूला गॅरेजमध्ये सेप्रेट असायचा. मुलं बरीच होती. त्यांचा अ व ब अशा दोन खोल्यात क्लास चालायचा. एक शिक्षकांची खोली व एक ऑफिसची खोली अशा ५-६ खोल्या ओळीने होत्या व राजवाड्याच्या मागच्या भागात माडीवर मुलांचे होस्टेल व खाली पूर्ण भाग मुलोद्योग म्हणजे आम्हाला हा विषय होता. कापसातली सरकी काढण्यापासून ते सूत कातून कपडा विणेपर्यंतच्या सर्व क्रिया आम्हाला शिकवत व करवून घेत. व त्याच्यावर गणित व माहितीपर पेपरही असायचा. मला तर हा विषय आवडत नसे व त्यासाठी १२च्या नंतर गटागटाने राहावे लागे. गणित व



माहिती सर्वांना एकत्रच घेत असत. हा विषय किचकट व महत्त्वाचा होता. सर्वांनाच अवघड जायचा. पण मला जास्त अवघड जायचा. कारण माझं वय लहान असल्यामुळे मला कविता, निबंध, इतिहास, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र हे विषय खूप आवडायचे. मुलोद्योग मात्र मला अजिबात आवडत नसे. त्या विषयामुळे मला कधी कधी गांधींजींचा राग येई. कारण जीवन शिक्षण हे त्यांचं ध्येय व त्यामुळे हा विषय. असो.

सकाळी पाचला उठून स्वत:चे सगळे आवारायचे. घरातली थोडी कामं करायची व सहा वाजून पंधरा मिनिटांनी घर सोडायची ते धावत पळत सातला कॉलेज गाठायचं. चालतच जावे लागे. कारण बस सातनंतर सुरू व्हायच्या. बेळगावातून जाणारे आम्ही फार तर १०-१२ जण होतो. टिळकवाडीतून माळावरून येणाऱ्यांना जवळच पडे. शहापूरही तसे जवळ व सर्वांत लांब मला पडायचे. कारण गोंधळीगल्ली म्हणजे पूर्वी जवळजवळ शेवटची गल्ली. मग हॉस्पिटल व स्मशान पुढे. आता गाव वाढले आहे. त्यामुळे मला खूप लवकर बाहेर पडाव लागे. पाटील गल्लीजवळ मला जाधव भेटायची, मग कपिलेश्वर रोडला प्रेमा सामंत भेटायची, फुलबाग गल्लीच्या कोपऱ्यावर शिंदे भेटायची. महादेव गल्लीच्या कोपऱ्यावर प्रथम कमल गाडगीळ व घाटगे-पाटील गल्लीत असे शक्यतो एकमेकांना गाठत मिळून जायचो. पण सर्वांत प्रथम मला मात्र वेळेवर जावे लागे. जातांना भाज्यांची तयारी करून कुकर ठेवून जावं लागे. नाश्त्याची पण थोडी तयारी करावी लागे. मला एवढ्या लवकर खाणे जात नसे. नुस्ता चहा व बटर किंवा बिस्किट खावून जात असे. मग ९.३० ला सुट्टी व्हायची. तिथं वाड्याच्या आवारात दोन रुममध्ये एक बाई राहात होत्या. त्यांच्याकडे आम्ही काहीजण चहा घेत असू. चहा खूप छान करून द्यायच्या. मग १२ ला कॉलेज सुटल्यावर परत भरभर चालत सुटायच ते एकच्या सुमारास घर गाठायचं. भूक खूप लागलेली असायची. एखादेवेळी आंबूनी आमटी फोडणी घातली नसेलतर खूप रागाने (मनातून हं) आमटी करून जेवण करून, स्वयंपाकघर आवरायचं व परत अर्धा तास बसून किंवा मुलांशी खेळून २.३०ला गणपत गल्लीत दोन नंबर शाळेत लेसन घ्यायला व निरीक्षण करायला पोचावे लागे. दोन-सव्वा दोनला चालत परत जायचं.

ट्रेनिंग कॉलेजमध्ये असताना एक मात्र माझ्या लहान असण्याचा फायदा व्हायचा. स्वागत, ईशस्तवन, नाच याच्यात भाग घ्यायला मिळायचा. कारण ट्रेनिंगला जी मुलं होती ती २-३ मुलांचे बापच असायचे व मुली म्हणजे मोठ्या बायका. त्यात गाडगीळ व घाटगे या तर मी शाळेत जायची तिथ टीचर होत्या. एकूण काय कुणाची १० वर्षे, कुणाची ८ वर्षे अशी नोकरी झालेली असायची. कारण पूर्वी सातवी पास झालं की नोकरी मिळायची. ट्रेंड लोक मिळत नसत. मग सरकार त्या शिक्षकांना ट्रेनिंग कॉलेजसाठी निवडे व पूर्ण पगार व नोकरीवर हक्कही असे. पहा किती नशीबवान शिक्षक होते. आता हजारो ट्रेंड लोक बेकार फिरतात. माझ्या वर्गात खूप मजा व्हायची. एखादे प्रश्नाचे उत्तर मी दिले व घाटगेबाईंचे चुकले की त्यांना खूप अपमान वाटायचा. कारण सुरवातीला त्यांची मी विद्यार्थिनीच वाटायची व मला टीचर वाटायच्या. मी पण उत्तर येत असलं तरी त्यांना काय वाटेल म्हणून द्यायची नाही. पण पाच-सहा महिन्यात आमच्यात खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले व त्या टीचर न रहाता माझ्या मैत्रिण झाल्या. गाडगीळ टीचर तर माझ्या खूप आवडत्या मैत्रिणीत जमा झाल्या. त्या खूप विनोदी होत्या व त्या व मी खूप हसायचो. म्हणून ती किंवा मी कॉलेजला नाही गेलो तर शेट्ये सर विचारायचे ''आज हसणारी मैत्रीण आली नाही वाटतं.'' वर्गात बसताना ती माझ्या मागे बसायची व मी तिच्यापुढे. कां तरतिला माझ्या लांबसडक मागे घातलेल्या दोन वेण्या पाहायला आवडायच्या. त्यावेळी आपले केस खूप लांब आहेत, वेण्या बाहेर काढाव्या, असले नखरे करायचं कळतचं नव्हतं. मी लता मंगेशकर सारख्याच वेण्या घालायची व पदरही तसाच म्हणजे वेण्या आत. पण गाडगीळ मात्र मला पदर खोचायला लावायची पण वेण्या आतच. कारण मला काम करताना त्रास व्हायचा व मामांना केस कशात आला तर राग यायचा.

आज मी निर्मला काळेला फोन केला व तिच्याशी गप्पा मारल्यानंतर ट्रेनिंग कॉलेजच्या खूप आठवणी जाग्या झाल्या. कारण त्या पण माझ्याबरोबर शिकत होत्या. त्या मॅट्रीक झाल्यामुळे त्यांना दोन वर्षे व आम्हाला तीन वर्षाचा कोर्स होता. त्याप्रमाणे इंदू दाणी व शांता वाघ या पण माझ्या खूप जवळच्या मैत्रिणी. खरं म्हणजे इंदू दाणी गल्लीलाच असायची व शांता वाघ, किशोर पै च्या परसातल्या दोन खोल्यात रहायची. इंदू दाणीकडे गेलेलं मामांना आवडत नसे. कारण त्यांचा



नवरा व मामा एकाच गल्लीत राहायचे. शहापूरच्या सराफ गल्लीत ते त्याला ओळखत होते. त्यांनी इंदूताईला सोडले होते. त्यांना एक मुलगाही होता. इंदूताई दिसायला अतिशय सुंदर होती. नवरा पण चांगला असावा. कारण त्याचा फोटो घरांत होता व त्या जाताना फोटोला नमस्कार करायच्या. मी म्हणायची, ''तो तुम्हाला त्रास देतो तर तुम्ही का नमस्कार करता?'' त्या म्हणायच्या, '' शांता तू लहान आहेस, मग कळेल.'' एक दोनदा मला मामांनी त्यांच्याबरोबर पाहिलं व माहिती विचारली व म्हणाले, '' त्यांच्या घरी जास्त जायचं नाही.'' पण खरं सांगू का मला त्या खूप आवडायच्या. मी चोरुन त्यांच्या घरी कॉलेजला जाताना येताना जावून बसायची. मला त्यांच्या घरात बसायला एकच खोली होती. बिचारा मुलगाही लहान पण गोड होता. केशव त्याच नाव. माझं दु:ख हलक करायला इंदूताई व त्यांच दु:ख हलक करायला मी. आमच्या वयांत अंतर होतं पण मैत्री करायला वयाचं, जातीचं, लिंगाचं कसलंच बंधन नसतं. एकेकदा सांगून त्यांच्या घरी अभ्यासाला जायची व बऱ्याचवेळी चोरून जायची. त्यांच माहेर चंदगडचं. तिथून त्यांना जेवणाचा डबा बऱ्याचवेळा यायचा. मग त्या माझ्यासाठी अळवा गाठीची भाजी, भाकरी, पातोळ्या काढून ठेवायच्या. माझीही कहाणी त्यांना माहित होती. एकेकदा कॉलेजमधून येताना त्यांच्या घरी खाऊन यायची. त्या कोकणी लोकांच्या चाळीतल्या खोलीत राहायच्या. व मला सर्व ओळखायचे. इंदूताई ताकीद द्यायच्या, ''शांता आलेलं कुणी सांगायचं नाही.''

पास झाल्यावर त्यांना कॅंटोनमेंट बोर्डाच्या शाळेत नोकरी मिळाली. व मला स्कूल बोर्डात. आम्ही एकमेकींना भेटत असू. केशवला खूप शिकवलं. तो मुंबईत नोकरीस लागला. मी वरचेवर त्यांना भेटायची. एक दिवस अचानक त्या गेल्याचं समजलं. खूप दु:ख झालं. केशवपण सहा महिन्यातच गेला. त्याची बायको व मुलगा मुंबईतच राहातात एवढचं समजलं. त्या स्वाभिमानाने शिकून, मिळवून मुलाला मोठं करण्यात यशस्वी झाल्या. परत नवऱ्याकडे गेल्या नाहीत. कारण एवढा सुंदर मुलगा व बायकोला सोडून एका बाईच्या नादाला लागलेल्या माणसाकडे उष्ट खायला जायचं का? असं त्या म्हणायच्या. त्यांना २-३ भाऊ-बहिणी होत्या. कॉलेजमध्ये अशा नवऱ्यानं सोडलेल्या, नवरा लहान वयात गेलेल्या किंवा लग्न न करताच राहिलेल्या अशाच बायकांचा जास्त भरणा होता. कारण पूर्वी

आया कोर्स, नर्सेसचा कोर्स, टीचर कोर्स हा अशाच बायका घ्यायच्या व स्वत:च्या पायावर लवकर उभं राहाता यावं व स्वावलंबी बनावं म्हणून कुणाच्या तरी आधाराने पैशाची व रहाण्याची सोय करून हे कोर्स करायच्या व कोर्स संपला की लगेच नोकऱ्या ही मिळायच्या. त्यामुळे कॉलेजमधले वातावरण खूप उत्साह व आनंदाने भरलेलेच असायचे असे नाही. प्रत्येकाची एक स्वतंत्र रडकथा असायची. त्यात जे पुरूष होते, कारण त्यांन मुलं म्हणता येणार नाही. त्यांना मुलं म्हटलं तर शिकणाऱ्या मुलांना काय म्हणायचं? असे १०-१० वर्षे सर्व्हीस करून ३-४ मुलांचे बापपण ट्रेनिंग कॉलेजला आलेले. माझ्यासारख्या ७-८ मुलींच फक्त अशा बाहेरून आलेल्या होतो. सर म्हणायचे, ''इथं असल्या कोर्सला कशाला आलात? तुम्ही कंटाळून जाल.'' बाकी कसला कंटाळा येत नसला तरी सुत काढणे व कपडा विणणे. यामध्ये काय ज्या क्रिया होत्या त्याने मात्र वैतागायला व्हायचं. प्रथम कापसातला कचरा काढून तो साफ करायचा, मग सळी व फळी घेऊन सरकी काढायची मग घनुकलिने कापूस पिंजायचा मग परत सळी व फळी घेवून पेळू काढायचे. व मग चरख्यावर अथवा टाकळीवर सूत काढायचे. मग सुताच्या लड्या करायच्या, मग ते आकाशदिव्यासारखं काढायचं काही होतं. नाव आठवत नाही. त्याच्यावर सूत घेवून ते खळ लावून वाळवायचं. मग बीम भरायचा. (मागाला जी गोलाकार रुळ असतो) व मग वया ओवून घ्यायच्या मग घोट्यात धागा ओवून सटक फटक इकडून तिकडे तिकडून इकडे घोटा फिरवत कापड विणायचे. धागा तुटला तर परत लाइनीतून ओऊन जोडून घ्यायचा. हे एवढं रामायण व त्याशिवाय त्याच्यावर गणितं म्हणजे कोणतं कापड विणायला किती नंबरचे किती सुत लागले अस काढाव लागे. ५ पातळं, लुगडं, खण यांच आम्ही पालुख असं लक्षात ठेवायचो व कोशधो म्हणजे कोट, शर्ट व धोतर हे सर्व शिकूनसुद्धा मला कळालं नाही तर मी सांगून तुम्हाला काय कळणार? पण मी पाच मीटर कापड विणले व त्याचे दोन टॉवेल झाले व खूप वर्षे टिकले सुद्धा. अर्थात या विषयांत जी हॉस्टेलवर राहणारी मुलं (मोठी) मला खूप मदत करायची. कारण कपडा विणायला दुपारी थांबाव लागायचं. मग ही मुलं (शिक्षक) मला संध्याकाळ व्हायच्या आत घरी जायला सांगायची व राहिलेलं काम आपण स्वत: करायची. मजेत केव्हातरी त्यांना चहा द्यायची. पण अगदी लहान बहिणभावानी वागावं, काळजी घ्यावी तसे हे भाऊ,



वर्गबंधू होते. बऱ्याचवेळा जाताना किंवा येताना एकटी दिसले तर मला नंदगडकरबाई कारमधून घेवून यायच्या. त्यांचं घर आमच्या मागच्या बाजूला होतं. त्या माहेरी रहायच्या. त्यांना एक मुलगी होती. बाईंनी सोडायला व कधी कधी घेऊन जायला गाडी आली की त्या मला बोलवत. टिळकवाडीत इंदिरा संत रहायच्या. त्यांना सोडून मला सोडून त्या घरी जायच्या. पण असं क्वचितचं घडायचं. एरव्ही इंदू दाणीची कथा ऐकत चालत यायचं.

एक तारखेपासून लिहायला मिळालं नाही. कारण चि. सुधीरचा पाय दुखावला होता. त्यामुळे मी रसायनिस गेले व तिथंच १५ दिवस राहाणार त्यामुळे नोटबुक सोबत होतं पण लिहिणं जमलं नाही. टी.व्ही बघण्यात बराच वेळ गेला. असो

इंदू दाणी बरोबरच माझी खास मैत्रीण शांता वाघ. ती सुप्याची, तिचे वडील वारले होते. आई सुप्यात लहान बहिणीला घेवून रहायची व शांता, बबनभाऊ व आणखी एक बहिण इथं शिकायला रहात होते. शांताचं वय जास्त होतं. शाळा सोडून ५-६ वर्षे झाली असतील. २५-२६ वर्षांची होती. ती पण आमच्याबरोबर ट्रेनिंगला यायची. तिला व दाणीला अभ्यास जरा जड वाटायचा. कारण शिक्षणात खंड पडला होता ना. शांता स्वभावाने खूप गरीब व कष्ट करणारी होती. पण तिला शिक्षणापेक्षा लग्न करुन संसार करणे आवडत होते. शेवटच्या वर्षाला असताना परीक्षाजवळ आल्या होत्या. व लेसनच्या तर सुरु (पाठाच्या) झाल्या होत्या. तसल्या गडबडीत गुणाजीबाईंनी एक स्थळ आणलेलं व गडबड करून लग्नही ठरवले. हीचं वागणं खूपच बावळटपणाचं होतं. तो पिक्चरचा एजंट होता. बराच उंच व स्मार्ट होता. सावळा होता. बेळगांवला तो 'पतिता' सिनेमा घेवून आला होता. मला व दाणीला तो पसंत नव्हता. तसं शांताला सांगितल पण ती त्याच्यावर भाळली. ऐकायला तयार नाही. झालं. लग्नाचा मुहूर्त ठरला. मी लहान होते पण मी प्रथमपासूनच माणसांना लगेच ओळखायची. सुप्याला लग्न होतं व त्याच्या आदल्या दिवशी माझी पाठाची परीक्षा होती. मी व दाणी त्यांच्या सोबत गेलो नाही. पण आम्ही दोघी आल्याशिवाय ती लग्न करणार नाही म्हणून रडत बसली. मग तिचे मामा आमच्या घरी रात्री बोलवायला आले व ते आम्हाला घेवून गेले. लग्न खुप छान झालं सुपा गांव तर फारच सुंदर होतं, कारण ते आता नाही तिथे काळी व पांढऱ्या

नदिचा संगम आहे. नदी  खुप खोल व खरच पाण्याचा रंग काळा वाघच्या परसातच नदी असल्यामुळे आम्ही तिन्ही वेळा जायचो नदिच्या रोडला जाताना दुतर्फी सुंदर अबोलीचया फुलांची झाडं इतर फुल तर खुपच पण मला सर्वात अबोली फार आवडते. बेळगांवहून मी, इंदू दाणी, प्रभाकर कुलकर्णी व बबन (शांताचा भाऊ) मामा मामी असे बरेच जण होतो. त्यात प्रभा कर खुप वांड होता तो बबनचा मित्र, पण दोघात खुपच फरक होता. शांताचं लग्न झाल तो गोव्याला सासरी गेली मग आम्ही बेळगांवला आलो शांताची परिक्षा राहिलीच. मी परत अभ्यासाला लागले. माझा परत एक लेसन (पाठ) द्यायचा होता त्याची तयारी खुप करायची होती तयारी करुन लेसनच्या चार कॉप्या लिहून तयार झाल्या, शांता मुंबईला जाण्यासाठी बेळगांवला आली. तिला दाखवावं म्हणून तिच्या घरी जात असताना उगाचच माझ्या कंग्राळकर नावाच्या मैत्रीणीला काय लहर आली व तीने माझ्या अंगावर पाणी उडवले मी चूकूवायला गेले पण काढलेले टाचण पूर्ण भिजले. मला तर रडूच आले. मी शांताकडे जाऊन रडलेच. नशीव तिचा नवरा बाहेर गेला होता. शांताने माझी समजूत घातली एक न भिजलेली कॉपी ठेवून मी भावाकडून रात्री कॉपी काढून ठेवते तू शांत झोप म्हणाली व त्या प्रमाणे ४ कॉप्या सकाळी ९ ला तयार होत्या. त्याला प्रभाकरने पण मदत केली होती. हा प्रभाकर मला आजीबात आवडत नव्हता तो दिसायला जितका सुंदर होता तितकाच तो गुणांनी बाद होता. शिक्षणात मागे व वांड पणात पुढे असायचा. आमच्या घरा जवळ गवळी गल्लीच्या कोपऱ्यात राहायला होता. मामांना तो फार आवडायचा. अर्थात माझ्या टाचण्याच्या कॉप्या त्यांने काढल्या हे मला आवडलं नाही. पण ती वेळ भांडणाची नव्हती मी गप्पच बसले नुसत बबनला म्हणाले, त्याची मदत कशाला घेतलीस? माझी लेसनची परिक्षा संपली त्यामुळे वाघ म्हणाली आपण सर्वजण पिक्चरला जाऊया. मी तिला सांगितलं, प्रभाकर येणार असेल तर मी येणार नाही व मला घरी विचारावे ही लागेल. इंदू दाणी किंवा वाघ यांना घरात परवानगी लागत नव्हती व मला मात्र परवानगीच्या दिव्यातून बाहेर पडावे लागे. आणि आधिच पतिता पिक्चर पाहिला होता अर्थात तो वाघच्या नवऱ्यानंच आणला होता. त्या दिवशी तर आंबू मला सोडतच नव्हती मला म्हणाली घरी पाहूणे येणार आहेत सांग कोडबाळी करायला घेतली. पण दाणी, वाघ व कंपनी घरात ठाण



मांडूण बसली त्यामुळे आंबूचा नाईलाज झाला व मला सिनेमाला जावे लागले सिनेमा खुप छान होता आणि परत ८ ते १५ दिवस कसे सोडतील पण आंबू व मामा खुप खुष होते. कारण माझा पाठ चांगला होता व दोन्हीतही मला चांगले मार्क मिळाले होते दोन लेसन असायचे एक सरळ व एक चक्रीय म्हणजे व्यवसायातून तीन चार विषय शिकवायचे आणि त्यामुळे मी पण खुश होते मामांची परवानगी मिळाली ९ ते १२ ला 'एक थी लडकी' रेक्सला आला होता तो पाहिला व मी एवढं सांगूनही प्रभाकर व बबनचा ग्रुप सिनेमाला आलाच. मला घरापर्यंत पोहचवायला दाणी व प्रभाकर आले. मामा बाहेर उभे होते त्यामुळे दुसऱ्या दिवसा पासून मामांनी माझी चेष्टा करायला सुरवात केली. प्रभाकरने गल्लीच्या दुकानात आम्ही सिनेमाला गेल्याचे सांगितले. दुकान दारांनी बाबुला सांगितले एकून काय सिनेमा गल्लीभर गाजला व त्या दिवसा पासून प्रभाकरशी पूर्ण बोलणे बंद केले तरीपण तो मामांच्याकडे यायचा संक्रात व दसरा असला की मुद्दाम यायचा सर्वांना सोने द्यायचा तिळगूळ द्यायचा मी मात्र त्याच्याशी बोलणं बंद केलं तो खोटे  बोलायचा खुप पण घरी आल्यावर मात्र मामांच्या आग्रहाखातर मनात नसताना ही मला त्याच्याकडून तीळगुळ घ्यावा व द्यावा लागायचा. शांता वाघ मुंबईला गेल्यामुळे माझे एक घर कमीच झाले तीची बहिण होती, तीचे लव्ह मॅरेज झालेलं वर्टी त्यांचे आडनांव. त्यांच्या घरी हा प्रभाकर जायचा कधी तरी इंदू दाणी कडे पण यायचा पैसे मागायच, त्याला सुधारण्यासाठीच त्याच्या आईवडिलांनी त्याला बहिणीकडे ठेवल होत पण त्याच्यात काही सुधारणा झाली नाही मी वर्टिना पण तो मुलगा बरा नाही असे सांगत होते पण त्यांना पटत नव्हतं पण सात महिन्यात त्यांच्या नावावर बरिच उधारी करुन त्यांच्या कडून डझनावार पैसे घेऊन जेंव्हा त्यांनी गंडवल तेंव्हा त्यांना पटलं. मग इंदूदाणी व वर्टी यांनी त्याचं येण बंद केलं पुढ पुढे तो कुठ गेला, त्याच काय झाल त्याच काय कळलेच नाही. मध्ये मध्ये गल्लीतल्या दुकानात दिसायचा नंतर तो बेपत्ता झाला पण त्याचे गुण कितीही वाईट असले तरी त्याचे अक्षर सुंदर होते त्या सुंदर अक्षरात त्यांनी माझ्या टाचणाच्या प्रति तयार करुन दिल्या व त्या लेसनला मला छान मार्क मिळाले हे मात्र मी विसरु शकले नाही. आपल्या आयुष्यात अशी किती तरी माणसं येतात, त्यात काही वाईट व चांगली दोन्ही असतात. पण हा प्रभाकर कुलकर्णी वाईट होता, मला आवडता नव्हता पण तो

माझ्या लक्षात मात्र चांगल्या कारणाने राहिला, कारण तो खरच वाईट नव्हता पण त्याचे वय व त्याला समजून घेण्यात झालेली पालकांची चूक यामुळे एक सुंदर दिसणारा, सुंदर अक्षर काढणारा, छान गाणं म्हणणारा मुलगा फुकट गेला असेच वाटते.

बऱ्याच दिवसात लिहिणे जमले नाही. कारण नोटबुक घरात व मी फिरतीवर. असो, आज मन खुपच अस्वस्थ झाले व त्याला कारण ही तसंच घडलं. आज आमचा जुना टीव्ही बंद पडला म्हणून देऊन टाकला व मला खुप वाईट वाटले. खरं म्हणजे ते यंत्र बाद होणार, बंद पडणार हे मला सर्व समजतं पण माझा स्वभाव जरा कोणत्याही गोष्टीत गुंतण्याचा आहे. मात्र ते घर असो, मांजर असो, वा टीव्ही असो ज्या वस्तूनी माझे मनोरंजन केले माझ्या सुख दु:खात साथ दिली ती निर्जीव वस्तू असेल तरी सजीवापेक्षाही त्यांनी मला साथ दिली, हे मी कधीच विसरणार नाही. १२ वर्षात मी व बाळू राहत असताना तो टीव्हीच माझा खरा सोबती होता. बाळू लवकर नाही आला तर मनातल्या वाईट विचारांना बाजूला सारुन माझे मन स्वत:मध्ये गुंतवत होता मग का नाही मी त्याच्यावर प्रेम करणार ?

असो, या टीव्ही वरुन मला जुनी गोष्ट आठवली. पूर्वी टीव्ही नव्हता पण १९४८ च्या १४ ऑगस्टला बेळगांवला अंबूच्या घरी रेडीओ आणला व त्याची पूजा वगैरे करुन १५ ऑगस्टला सुरु केला, त्याच्यावर पण मी खुप प्रेम करायचे. मला गाण्याची व त्यातल्या त्यात हिंदी भाषेची आवड मला त्याच्यामुळे निर्माण झाली आणि हिंदी सुधारण्यासाठी परिक्षा (प्रविण) दिल्या व त्याच काळात मी हिंदीमध्ये 'प्रियतम' नावाची एक रुपक कथा रेडीओवर लिहिली. ती आमचे हिंदीचे सरांना खुप आवडली. अर्थात क्लासचं मासिक निघणार होतं म्हणूनच मी ती लिहिली होती. कथा क्लासच्या मासिकात तर छापलीच पण, सरांनी एका हिंदी वार्षिक अंकातही तो लेख दिला व मला म्हणाले,'असे वरचेवर लिहित जा. पण कुठलं काय, नोकरी व घरची चाकरी यातच बुडले.'

तारीख ५-६ ला माझी प्रकृती बरी नसल्याने काही लिहू शकले नाही. पण टिव्ही बद्दल वाईट वाटल्याचे लिहिले व गंमत म्हणजे ५ तारखेला बाळू रिध्दीला म्हणाला, 'बहुतेक टीव्ही दिला म्हणून आजी आजारी पडली,' सहज म्हणाला, पण मला वाईट वाटले. हे तरी मी कोणाला सांगणार? असो. प्रभाकर कुलकर्णी वाह्यात



निघाला, वाघ शांताचे लग्न झाले. या सर्वांचे दोन दिवस जरा दु:ख झाले. पण मला दु:ख करायला वेळच नव्हता. कारण लेसनची परिक्षा संपली होती व त्यात चांगल्या तऱ्हेने पासही झाले होते. आता लेखी परिक्षाची तयारी खुपच मोठी होती कारण मी सातवी पास होऊन गेले होते व या कॉलेजला लावलेली सर्व पुस्तके ११ वी ची होती. म्हणजे तेंव्हाचं मॅट्रीक. विषयही बरेच होते मराठी. इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, गणित, आरोग्यशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षण शास्त्र, आणि माझा अतिशय न आवडता विषय मुलोद्योग, म्हणजे  जीवन शिक्षण. आता ह्या एवढ्या विषयांचा अभ्यास करायचा व तेही घरातील कामे करुनच; त्यातून सुटका नाही. मग कुठली वाघ आणि कुठला प्रभाकर, मी व दाणी अभ्यासाला लागलो. दाणीला चंदगडहून डबा यायचा. तीची लहान बहिण पण कामासाठी आली होती. पण माझं कसचं काय. अंबूला कामाचा कंटाळा व मला ठेवलेले काम पहायचा कंटाळा. त्यामुळे झक मारत कामे आवरुनच बाकी अभ्यास वगैरे .म्हणता म्हणता परिक्षा आली. अर्थात बोर्डाचीच परिक्षा होती. हा कोर्स करित असतानाच मी हिंदी पुण्याच्या 'प्रबोध' म्हणजे तीन परिक्षा दिल्या होत्या. ट्रेनिंगची परिक्षा संपताच मी हिंदीचा 'प्रविणचा' क्लास सुरु केला, त्या क्लासची १५-२० रुपये फी भरावी लागू नये म्हणून पहिल्या व दुसऱ्या परिक्षेच्या मुलांना एक तास शिकवायला जाऊ लागले. त्यामुळे मला पुस्तकेही अभ्यासाला लायब्ररीतून मिळत होती. म्हणजे तो 'प्रविण' बीन खर्चानेच होणार होते 'प्रविण'च्या परिक्षेला नऊ पुस्तके होती. 'प्रविण'चा अभ्यास मात्र मी मनापासून करीत होते. 'नूरजहाँ' नाटक होते. नेहरुंचे 'भारत की समस्या', 'प्रेमचंदजीची' 'गबन' कादंबरी, सहा एकांकिका व 'गीत गंगा' नावाचे जुने हिंदी काव्याचे पुस्तक, त्यात कबीराचे दोहे वगैरे होते, शिकवणं व शिकणं दोन्ही चालू होतं. त्याच वेळी मी 'संभाषण योग्यता' ह्या परिक्षेला ही बसले. म्हणजे हिंदीतून पूर्ण तोंडी गप्पा मारायच्या व दिलेल्या एखाद्या विषयावर भाषण करायचे परिक्षक पुण्याचे आले होते. मला भाषणासाठी 'भाषावार प्रांत रचना' हा विषय दिला होता.हिंदीतून मी त्यांना भाषावार प्रांत रचना करण अयोग्य कसं हे पटवून दिला मी दोन्ही परिक्षेत म्हणजे 'प्रविण' व 'संभाषण योग्यता' यात पास झाले. मात्र मी ट्रेनिंगला 'मूलोद्योग' विषयात नापास झाले.

बाकी सगळयात पास होते; पण वर्ष वाया जाणार होतं. त्यामुळे वाईट वाटलं मग मी कुलकर्णी नावाच्या सराकडे मुलोदयोगाच्या क्लासला जावू लागले. बऱ्याच जणांचा हा विषय राहिला होता. त्यातही मी प्रॅक्टीकलला पास होते, पण पेपर दयावा लागणार होता त्यामुळे लेखी परीक्षेच्या तयारीसाठी आम्ही बरेचजण क्लासला जात होतो. संध्याकाळी मुलोदयोगाचा क्लास व सकाळी हिंदी क्लासला शिकवायला व पंडित परीक्षेचा अभ्यास ही सुरु केला पुस्तकं लायब्ररीतून मिळायची, त्यामुळे खर्चाचा प्रश्न नव्हता. नुसती फॉर्म फी भरायची. ही परिक्षा जर मी पास झाले तर मला स्वतंत्र क्लास हिंदीचा चालवायला परवानगी होती, त्यावेळी नोकर वर्ग हिंदी क्लासला यायचा व परिक्षा द्यायचा. कारण हे कंपलसरी होतं. याच दरम्यान एक घटना घडली. मी, बापू, लिला, शरद असे चौघांना आण्णांनी वेगळे घर करुनं नार्वेकर गल्लीत ठेवले. थोडे दिवस जोशी म्हणजे माझी मैत्रीणच त्यांच्या घरात माडिवर राहिलो. ती व मी दोन्ही 'पंडित'चा अभ्यास करत होतो. मी आंबुच्या घरांत राहात होते तेव्हां एक प्रकारचं बंधन, भिती व बोलताना वागताना दडपण असायचं. अर्थात ते घर मला माझंच वाटायचं. तिच्या सर्वच मुलांचा मला लळा होता व त्यांना ही माझा. (आंबुचे मिस्टर) मामाना तर आम्ही वेगळे राहाणार म्हणून खूपच वाईट वाटले. ते चौघेही इथं घरांत राहू दे म्हणत होते. पण बाबांना आपली ४-४ मुलं जावयाचे घरात ठेवणं त्यांना बरं वाटत नव्हतं. म्हणून त्यांच्या व आंबुच्या देखरेखी खाली जवळच्या गल्लीत घर बघून आम्हाला ठेवलं. बाकी सर्वांपेक्षा मी घरांतून जाणार हे दुःख सर्वांना फार होतं. मामा म्हणाले,' मुलगी सासरी पाठवताना बापाला वाटतं तसं मला वाईट वाटतयं.' असो आम्ही चौघं मिळून राहू लागलो. सुरुवातीला आंबूचं आपल्या सामाना बरोबर सामान आणून दयायची. मला तर गोंधळी गल्लीत जावून आल्या शिवाय चैनच पडत नसे. पण हळू हळू आमचे घरातले सामान आम्हीच आणू लागलो. आता माझी भूमिका घरातल्या कर्त्या पुरुषाची होती. कारण आण्णा पैसे पाठवायचे त्याची व्यवस्था व आखणी करुन खर्च करायचा; लहान भावंडांची काळजी घेणं, ती कुणाबरोबर खेळतात, अभ्यास, सर्व. नकळत जबाबदारी पडत गेली. म्हणजे. बंधन संपलं पण जबाबदारी आली. मुडलगीहून जोंधळे, मसाला, गुळ, तिखट,



लोणी सर्व सामान येत असे त्यामुळे ७० ते ८० रु मला वाटतं चौघांना पुरायचे. अर्थात खर्चात काटकसर व शिस्त होती. पैसे कुलपात नसायचे पण वापरताना सांगून वापरायचे. अगदी चप्पल शिवून एक आणा दिला तरी सांगायचं. कामे चौघंही वाटून घेऊन करायचो. वेळापत्रकच करुन भिंतीला लावलेलं. त्यामुळे भांडणाचा प्रश्न येत नसे. अर्थात एकमेकांवर प्रेम असल्यामुळे दुखलं खुपलं तर त्याचं काम दुसरे करत असू. एकूण काय मला माझ्या भांवडात राहायला मिळाले व सर्वात महत्वाचं लीला बरोबर राहायला मिळालं.

अंबूच्या घरात असेपर्यंत काम खूप करावं लागलं तरी कामाचं स्वरुप वेगळं होत. इथं मात्र सर्व जबाबदारीने करावं लागायचं. तिथं सांगतील ते करावं लागायचं व ते संपतच नसे. हे मात्र आपल्या मनाप्रमाणे पण जबाबदारीने कामे करावी लागतं. घरातल काय संपलं? काय हवं ? कुणाचा अभ्यास कसा चाललाय ? कुणाची फी भरायची ? पैसे कसे पुरवायचे व हे करतच अभ्यास करायचं. या वेळी मी हिंदीच्या 'पंडित' परिक्षा देण्यासाठी क्लासला जात होते व 'प्रबोध'ला शिकवायला जायची. मी ललिता जोशी अभ्यास करत होतो. आम्ही जोशींचे घर बदलून चांदिकरांच्या घरात एकदम मागे दोन खोल्यात राहायला आलो होतो.

कारण जोशींच्या घरात कटकट फार होती. लाकडी जिना न वाजवता वर चढा, भाकरी हळू बडवा, दंगा करु नका वगैरे. अर्थात, शरद तसा लहान होता. त्याचे मित्र यायचे. मला परत बंधन नको वाटू लागले व आम्ही समोरच त्याच गल्लीत घर बदलले. या घरांत आम्हाला खूप मजेत राहायला मिळाले. परसात खोल्या असल्याने आम्हाला कुणाचा त्रास नाही व आमचा कुणाला त्रास नाही. आम्ही चौघे म्हणजे लिला, शरद, बापू व मी इथं खूप मजेत राहत होतो. आम्हा प्रत्येकाला ते आपले हक्काचं घर वाटायचे. लिलाला व मला गाण्याची खूप आवड होती. आम्ही गाणी म्हणायचो. बापू शीळ घालायचा. शरद (बाजा) वाजवायचा व कधी टेबलावरच तबल्याप्रमाणे ठेका धरायचा. आपला अभ्यास, आपली कामं करुन परत आम्ही उरलेल्या वेळात त्यातल्या त्यात रात्री धमाल करत होतो. माझी लहान भावंडं माझं ऐकत होती. कधी उलटं बोलत नव्हती. लिलाच्या भाकरी खूप छान व्हायच्या; त्यामुळे ती भाकरी करायची, मी कपडे धुवायची, इतर स्वयंपाक

करायची, चहा व पाण्याची भांडी लीलाच घासायची. बापू पाणी ओढायचा, शरद बाजारहाट करायचा, एकूण काय मजेत होतो.

तरीपण मला आंबुच्या घराची आठवण यायची. मी बहुतेक संध्याकाळी फिरत चाळीत जावून यायची. तसे त्यांच्या व आमच्या घरांत एकाच गल्लीच अंतर होतं. गवळी गल्ली ओलांडली की नार्वेकर गल्ली. मी ७-८ वाजता घरी यायची. शरद पण चाळीत खेळायचा व संध्याकाळी स्वयंपाक विशेष करायचा नसे. नुस्ता भात लावला की झालं. पण काही दिवसांनी आपोआप आमच्याच घरात रमू लागलो. मी वेगळ्या घरात राहू लागले व थोड्याच दिवसात बाबूही निघून गेला व आंबूला घरात बराच कामाचा ताण सुरू झाला. एकदा तर ती खूप आजारी पडली. वाचणे कठीण डॉक्टर म्हणले. त्यावेळी सांबराणीकर म्हणून मामांचे मित्र होते, ते भविष्य सांगायचे. सर्व मुलांच्या पत्रिकेत आईचं सुख आहे त्यामुळे तिला काही होणार नाही म्हणाले आणि खरचं ती बरी झाली. पण काय झाले कुणास ठाऊक; त्या घराची भरभराट एकदम नाहीशी झाली. मामांच्या प्रेसचा प्रॉब्लेम राजाभाऊमुळे सुरू झाला. मुस्लीम बँकेचा प्रॉब्लेम हशामसाहेब जमादारमुळे सुरू झाला व या सर्वांचा परिणाम घरांवर व मामांच्यावर झाला. लहान लहान ७ ते ८ मुलं व परिस्थिती खुपच बिकट, मामांना तर अशा परिस्थितीची सवयच नव्हती. ते पूर्ण खचून गेले. आंबू मामा साबणाचा व चहाचा बिजनेस करुन घर चालवू लागली. मला खुपच वाईट वाटायचे. ज्या घरात मी दुधा- तुपाने हात धुतले त्या घरात मुलांना खाण्याचे हाल झालेले मला पाहवत नसे. मी तरी मदत करुन किती करणार? धान्यातले धान्य वगैरे द्यायची, खाणं करुन डबा भरुन द्यायची व मुलांना खावू दिला की, मला समाधान वाटे. मामा म्हणायचे, काही म्हण शांतीच्या पायात लक्ष्मी असणार. ती व बाबू गेले व घरात असे वातावरण सुरू झाले. मामा मला नेहमीच शांती म्हणूनच हाक मारायचे. आंबूकडे असताना तिचे व माझे खुप वेळा भांडण व्हायचं व त्यावेळी मामा माझी बाजू घ्यायचे. त्यांची पहिली बायको (ताई) ती पण माझ्यावर खुप प्रेम करायची. वडगांवहून येताना मी कधी कधी शहापूरला तीच्याकडे जायची. तीची दोन मुलं उषा व शाम. उषा माझ्या एवढीच, शाम मोठा. उषाला मामांनी एकदा सोन्याची बोरमाळ केली. मला खुप रडायला आलं. मला वाटायचं की, उषाला जे जे करताच तसच मलाही करावं. अर्थात वय लहान होतं.



त्यामुळे ती त्यांची मुलगी आहे व मी त्यांचे घरात शिकायला व कामाला आहे हे कळायचं वयचं नव्हतं. पण जसं कळायला लागलं तसं मात्र मी कधीच हट्ट केला नाही व वाईटही वाटून घेतलं नाही. मात्र मानानं राहायची. काम खूप करायची, त्यामुळे कुणी सरक म्हणायची हिम्मत नव्हती. मुख्य म्हणजे स्वयंपाक करायचा तोही प्रेमाने चांगला, न नासाडी करता. त्यामुळे सर्वांचे पोटच माझ्या ताब्यात. आंबूला काम करायचा कंटाळा. बाहेरची फिरायची कामे खुप करेल, जाईल तिथे वेळेचे भान न ठेवता बडबडत बसेल व माझे उलट मला बाहेर जाणे आवडत नसे, आजूबाजूच्या घरात दारात तर नाहीचं, कारण लोक मला म्हणायचे आई वडील असूनही अशी कशाला त्रासात राहते व आंबूला म्हणायचे, कशाला लोकांच्या मुलींना ठेऊन घ्यायचे, किती केली तरीही त्याची किंमत नसते. असल्या दुतोंडी समाजात वावरायला मला आवडत नसे व स्पष्ट बोलत असल्याने माझे जमत नसे. एकदा आंबू असचं कोणाचेतरी ऐकून मला म्हणाली,' तुला इथे घरात ठेऊन घ्यायचं म्हणजे का फुकट असत का?' त्यावर मी दिलेले उत्तर मला अजून आठवतं. आंबू असं कर माझा जेवणा खाण्याचा राहण्याचा खर्च तु काढ व मी तुझ्या घरातील जी कामे करते व त्यांचा पगाराचा हिशोब काढ. तसं केल तर तुच माझ देण लागशील. बाकी मुलांना प्रेम देते ते वेगळं. त्यावेळी आंबूला माझे मामा बोलले होते.

आमची आंबूना मनानी खुप चांगली व मोकळ्या मनाची व पक्केपणा आजिबात नाही.. त्यामुळे कुणी काही सांगीतले कि, ते तिला खरचं वाटायचं. मी लहान होते, पण माणसं ओळखून वागत होते व आंबूला माणसचं ओळखता येत नव्हती. कुणी गोड बोललं की झालं. मग अगदी काही त्यांना देणार व त्याच माणसांची फटकळ स्वभावामुळे थोड्याच दिवसात त्याच्यासारखा वाईट माणूस नाही म्हणणार एखाद्या माणसाबद्दल मी किंवा मामांनी त्याच्यापासून लांब राहा म्हटलं की, 'तुम्हाला जगात सगळे वाईटच दिसतात' म्हणणार. तिची कुणाशीही मैत्री झाली की, मी तिला विचारायची किती दिवसात तुटणार? मग मला म्हणायची, 'शांताना तू सांगितलसं तसलीच होती बघ.' आंबू मात्र मला कधीच शांती म्हणत नव्हती. शांताच म्हणायची. जसं कळायला लागलं तसं आपण आपल्या गरजेसाठी राहिलो हे लक्षात येऊ लागलं. मग मात्र आंबू, मामा काही

बोलले तरी सहन करायचं. चूक नसली तरी शिव्या द्यायच्या, उलट आजिबात बोलायचं नाही, खूप राग आला वाईट वाटलं तर, एखादा कागद घेऊन त्यावर काही बाही लिहायचं व स्वत:च समाधान झालं की, फाडून टाकायचा. याच सवयीतून मला लिहायची सवय लागली. वर्गात निबंधसुध्दा माझा चांगला असायचा. आंबुच्या घरात १०-१२ वर्षे केव्हा गेली कळलचं नाही. वेगळ्या खोल्या करुन वेगळे राहू लागलो. मला कुणी सरक म्हणणारे नव्हते. पण त्या घरात मी घेतलेले अनुभव, प्रेम, सुग्रास अन्न हे सगळीच विसरु शकणार नाही. त्याबरोबरच मला अनुभव व चांगली प्रकृती, चांगले संस्कार दिले हे कसे विसरता येईल का ? मी परत ट्रेनिंगच्या परिक्षेस बसून पास झाले. त्यामुळे मी व सर्वच खुष होतो. आता एका मनाने मी पंडितचा अभ्यास करु लागले. अभ्यास अवघड होता; पण आवड व सवड दोन्ही असल्याने मी ट्रेनिंगच्या परिक्षेचा आभ्यास जोरात व मनापासून करत होते; कारण मनात हिंदीचा क्लास काढायचा व त्यासाठी ही परिक्षा पास व्हायला पाहिजे हे मला माहित होतं. पण माझं बऱ्याचवेळा मनासारख काही झालं नाही. महिला विद्यालयमधून मला ११ वी पर्यंत शिकायच होतं. ते मिळालं नाही. त्यावेळी ११ वी मॅट्रीक व्हायचं म्हणजे आत्ताची १० वी. असो. आणि आता पंडित होऊन क्लास काढायचं मनात होतं पण नोकरी लागली, त्यामुळे मला पंडितची परिक्षा सुध्दा देता आली नाही. काही असो सिस्टर होण्याऐवजी मी टिचर झाले. पूर्ण आमच्या १० भावंडात मी प्रथम मिळवायला लागले. आण्णाना तर खुप आनंद झाला. पहिल्या पगारात आण्णांना धोतर मामांना शाल आणल्यावर त्यांना खूप आनंद झाला होता. याचवेळी आंबुच्या घरातील मात्र अवस्था फारच वाईट होती. मुलं नाहीत, मामा तर घरात कोंडून घेतल्यासारखं घरातच बसून राहिले. आंबू मात्र वण-वण फिरुन चहा, साबण याचा बिझेनस करी. त्यांना प्रेसमधून राजाभाऊनी सर्व रस्तेच बंद केले व बँकेची नोकरी पण सोडावी लागली. एकूण काय ज्या घरात मी श्रीमंती, सुख भोगलं, त्या घराला अशा अवस्थेत पाहायला वाईट वाटायचं. पण आंबू मात्र धाडसानं सर्व काही करायची. लोक नावंच  ठेवायचे. पण नाव ठेवणारे कुणी मदत करायला येत नव्हते. मी मात्र जमेल तेवढी मदत करायची. आण्णानी पण कुणा रेड्डी माणासाकडून पैसे मागून दिले. पण आभाळ फाटलेलं; ढिगळं लावून कसं एकदम



सावरणार? मला १९५७ साली नोकरी लागली. पण तिथे हजर झाल्यापासून सुट्टीपर्यंत ६ महिने पूर्ण होत नव्हती. त्यामुळे मला ब्रेक दिला व त्यानंतर परत ५८ ला ऑर्डर झाली. मी वडगांवच्या मुलींच्या शाळेत हजर झाले. ते १९६२ पर्यंत तिथेच होते. त्याच दरम्यान मामांना निप्पानीच्या हायस्कूल मधे नोकरी लागली व ते व काही मुलं तिकडचं गेली. त्यांचे सर्व सुरळीत चालू झाले. मग काही दिवसांनी सर्वच आंबूचं बिऱ्हाड निपाणीला रवाना झालं. आम्हाला म्हणण्यापेक्षा मला खुप चुकल्यासारखं वाटायचं. त्यांनी चाळीतलं घर मात्र ठेवलं होतं. नंतर माझी नोकरी व घरातले काम यात रमल्यामुळे मी थोड्या दिवसासाठी नव्हे थोड्या वर्षासाठी आंबूचं घर विसरले. आम्ही चौघेही कामं वाटून करत होतो. नुस्ती भांड्याला बाई होती. लिला के. एल. ई. सोसायटीच्या प्राथमिक शाळेत जात होती. ती बहुदा ६ वी ७ वीत असावी. शरद व बापू सरदार हायस्कूला जात होते. मला वाटतं शरद ५ वीत व बापू ९ वीत असावा.कारण तो ८ वी ला गोकाकला शिकत होता. एकूण आम्ही चौघेही लग्न नसतानाच संसार करत होतो. काटकसरीने रहात होतो. कारण मला नोकरी लागायच्या आधी आण्णा पैसे पाठवायचे. पैसे यायच्या आधीच मी कुणाचे काय द्यायचे, वगैरे हिशोब तयार असायचा. कमीत कमी खर्च करुन जास्तीत जास्त चांगल खाणं व चांगल शिक्षण भावडांना कसं मिळेल याची मी नेहमी विचार करायची. स्वयपांक व निरनिराळे पदार्थ बनवण्यात लीला व मी दोघीपण पारंगत असल्याने जेवण खाणं चांगल नव्हे; उत्तम असायचं. चटणी, कोशीबींर, भाजी, आमटी,भात सर्व काही बनवून व्यवस्थित दोन्ही वेळा जेवण असायचं. शनिवारी दुपारी व रविवारी सकाळी वेगळे पदार्थ बनवायचे. एकूण काय आण्णांनी पाठवलेल्या थोड्या पैशात आमचं शिक्षण व उत्तम संगोपन होत होतं. आता कपडे मात्र असायचे पण कपाट वाहून जाण्या एवढे नाही, गरजे पुरते. प्रत्येकाला महिन्यातून ८ आणे मजा करण्यासाठी मिळायचे. ते पैसे त्यांनी काही करावे. मग बापूला सिनेमाची आवड. तो १- २ सिनेमा पाहायचा. कारण तिकिट चार आणे होते. लिला भरत काम करायला कपडा, धागा आणि शरद ड्रॉईंगचे सामान आणि मी मात्र आंबूच्या घरातली राहिलेली हौस भागवण्यासाठी दर महिन्याला एक डझन काचेच्या बांगड्या घेत असे. अगदी पहिल्या असल्या तरी. कारण आता माझ्याहातून बांगड्या फुटत नव्हत्या. असे करुन माझ्याकडे बांगड्या विकणाऱ्या दुकानदारासारख्या बांगड्या साठल्या होत्या. बापू म्हणायचा, शांता,

ह्या आपण परत विकूया का ? काही दिवसानी माझी बांगड्या घेण्याची इच्छा तृप्त झाली. माणसाला ठराविक वयात एखादी गोष्ट मिळाली नाही तर ती घेण्याची संधी मिळाली की, तो असाच वागत असणार. आता माझा पगार येत असल्याने आण्णाना थोडा ताण कमी वाटू लागला. ते मला मुडलगीला सुट्टीत गेलो की 'शांताराम' म्हणून हाक मारायचे. कारण ज्या माणसांनी शिकत असल्यापासून हालअपेष्टा काढल्या, त्यांना माझा आधार कर्त्या मुलाप्रमाणे वाटायचा. शरद पहिल्या दिवशी शाळेत गेला. अर्थात आम्ही कुणीच गेलो नव्हतो, ५ वीच्या वर्गात बसला. अमेरिकेहून आलेले रोहिडेकर म्हणून शाळेचे प्रिन्सीपल होते. ते वर्गात आले व त्यांनी मुलांना गाणी म्हणायला लावली. लगेच शरद उभा राहिला व छान गाणं म्हटलं. रोहिडीकरांनी लगेच बक्षीस दिलं.

मला नोकरी लागल्यामुळे आम्ही सर्वच खुष होतो. पण एवढ्या मोठ्या कुटुंबात प्रथम मी मिळवायला लागले याचा आनंद आणि अभिमानही होता. कारण इंदू व आंबू यांनाही आण्णांनी काकांच्याकडे ठेऊन शिक्षण दिलं होतं. का माहित नाही; पण काकानी सांगलीत आम्ही असताना दोघीनांही घरातून पाठवून दिल होतं. मला वाटतं काकाही शाळेतच शिक्षक होते. त्यांना काही संशय आल्यामुळेच त्यांनी आपल्यावर ठपका नको म्हणून व सांगलीत गेल्यावर काही तरी वेगळ घडेल असे त्यांना वाटलं असावं. अर्थात मला या गोष्टी समजण्याचे वय नव्हतं. पण आता अंदाज येतो. कारण त्या नंतरच आंबूच्या पळून जाऊन लग्न केल्याचा गोंधळ झाला. आण्णांच्या मित्रांनी (हजीसाहेब) त्यांना आंबूच्या लग्नाचा फोटो मिळाला होता. तो दाखवला. मग आण्णांचे डोळे खाडकन् उघडले व त्यांना ही तेरदळला पाठवले. असो. या सर्वांमुळे काय दोघींचाही आण्णांना उपयोग होण्याऐवजी त्रासच झाला. लगेच इंदूचेही लग्न झालं. राजा तर मंद बुध्दीचा. पण त्या काळात आंबूच्या घरी आई-वडीलांना सोडून राहून व्हर्नाक्युलर फायनल असे काही तरी ७ वी च्या परिक्षेला नाव होतं. ती बोर्डाची परिक्षा देऊन ट्रेनिंग करुन नोकरीला लागले. तसं बघीतलं तर शिक्षण माझं कमी झालं. पण त्या शिक्षणाचा उपयोग खुप झाला. मला इंटरव्ह्यूला बोलावण आलं. त्यावेळी काळे म्हणून एइओ होते व उडपुडे म्हणून चेअरमन व रोहिडेकर एज्युकेशन ऑफिसर होते. ते तिघे इंटरव्हयू घ्यायला येणार होते. तेव्हा नोकरी लागायला पैसा द्यावा लागत नव्हता. पण ओळख असली की काम नक्की व्हायचं. माझं नशीबच नोकरी करण्याचं होतं.



त्यामुळे ओळखीपण निघाल्या.

आज १८ डिसेंबर. माझं लग्न होऊन ५५ वर्षे पूर्ण होणार. बावीस वर्षे संसार केला यांच्यासोबत. केव्हा वर्षे संपली समजलं नाही. पण त्यांना जावूनही बावीस वर्षे संपली समजलं नाही. पण त्यांना जावूनही झाली ती कशी गेली, कशी घालवली ते मलाच माहित. पण आता मात्र या जगण्याचा कंटाळा यायला लागलाय. चार मुलं, सून व नातवंड सगळं आहे, पण स्वत: आपण एकटेच जगतो अस वाटातयं. तरी त्यातल्या त्यात मी माझे मन रमवण्याचा प्रयत्न करत असते. पण कधी कधी खुपच कंटळा येतो. प्रत्येक माणसाचं जीवन असचं असतं की माझच अस सारख बदलवणार जीवन मला जगाव लागतं ? पाहाना ७ - ८ वर्षे आई वडिलांच्या प्रेमात वाढले. पण त्या नंतर मात्र आई वडिल असून दुसऱ्याच्या घरात वाढले. त्यानंतर लग्न नसताना सुध्दा संसार मांडून भावंडात राहिले. मग लग्न, मुलं, नवरा अगदी खावून पिवून सुखाचा संसार न कंटाळता केला. पण बावीस वर्षात अर्धा संसार सोडून मुलांचे बाबा व माझा आधार अचानक गेल्याने परत खुप मोठी जबाबदारी पेलत आज बावीस वर्षे काढली. कधी रडायलाही वेळ मिळाला नाही. रडत बसलं तर मुलांची जबाबदारी कोण सांभाळणार होतं ? कुणाचाही आधार नसताना मुलांना मोठ केलं. शिक्षण झाली, लग्न झाली, सर्व आपापल्या कामात व व्यापात. मी मात्रा आता खरी रिकामी आहे. त्यामुळे मला एकटेपणाची जाणीव जास्त होते. पाहू या अजून किती आयुष्य आहे ? आजच रेडिओवर गाणं ऐकल हे जीवन सुंदर आहे, नुसतचं सुंदर नाही तर बहुरंगी व बहुढंगी असं हे जीवन आहे.

मला नोकरी मिळविण्यासाठी पैसा खर्च करावा लागला नाही. पण ओळखींचा खुप उपयोग आला. मला नोकरी लावायला खऱ्या अर्थाने मदत केली ती शरदने. त्यावेळी शरद असेल ७ वीला. त्याचा एक मित्र होता काळे नावाचा. त्याचेच वडिल माझा इंटरव्ह्यूसाठी येणार होते. शरदने सहज त्याला सांगितले की, बहिणीला इंटरव्ह्यूसाठी कॉल आलेला आहे. तो लगेच म्हणाला माझ्या वडिलांना सांगतो, मदत करतील. पण त्याचे वडिल मिलीट्रीत होते. त्यामुळे आवाज मोठा व उंच. त्या शरदनी त्याला प्रथम वडिलांना सांगायला लावले. त्यांनी मला घरी बोलावलं. अर्थात मी शरदला घेऊन गेले. शरदशी तसे ते गप्पा वगैरे मारायचे. त्यामुळे त्यांच्या घरी जायचं म्हणजे मी खुपच घाबरले होते. गेल्या बरोबर एक

मिनिट मला खरचं त्यांच्या आवाजाची भिती वाटली. कारण पहिल्यापासूनच मला कुणी जोरात बोललं की, डोळ्यात पाणीच येतं. असे त्यांच्याशी बोलण झालं. इंटरव्ह्यूच्या दिवशी मला त्यांनी सकाळी आठवण करायला यायला सांगितलं. उडपुडेना आण्णा भेटले होते व रोहिडेकरांना मामांच्या मित्राकडून सांगितलं. कारण तिघांच्या मार्काची सरासरी काढून नंबर लावणार व नंबर प्रमाणे नोकरी मिळणार. त्यावेळी आतासारखे पैसे खाण्याचा मार्ग विशेष अवलंबला जात नव्हता. आता काय ट्रेनिंगला, ॲडमिशनला डोनेशन, कॉलेजला जायचं डोनशन, आता गुणापेक्षा पैशाला जास्त महत्व आहे. माणुसकी तर कमी कमी व्हायला लागली आहे. जो तो आपल्या नादात आहे. पैशाच्या मागे धावतो आहे. आपल्या गरजा वाढवायच्या व त्यासाठी परत पैसा मिळवायचा.

मला नोकरी लागल्यामुळे घरात उत्सवाचे वातावरण होते. लीला, शरद, बापू यांचे शिक्षण व्यवस्थित सुरू होते. मला वडगांवला जाण्या येण्याचा त्रास होत होता. पण ट्रेनिंगलाही मी तिथं जायची. त्यामुळे मला विशेष फरक पडला नाही. शाळा ११.१५ ला सुर व्हायची व ५ ला सुटायची. जाताना १०.५० ची शहापूर बस पकडून जायचे व शहापूरहून चालत बस दिसली तर, बसने यायचे. नाही तर चालत सुटायचे. कारण उभं रहाण्यापेक्षा चालणे बरे वाटायचे व बरोबर मैत्रिणी असायच्या. त्यामुळे गप्पा मारत रस्ता केव्हाच संपायचा; पण दमायला व्हायचं. आल्यावर लीला चहा करुन ठेवायची. सर्वजण साधारण त्याचवेळी यायचे. ५.३० ते ६ मग खाणं व्हायचं. रात्री नुसताच भात करायचं काम. कारण भाजी, आमटी दोन्ही वेळचीच असे. कमी पडली तरच करावे लागे. मग सर्वांचा अभ्यास सुरू व्हायचा. मी मात्र पुस्तक वाचत बसायची. सर्वांचा अभ्यास झाला की, मगच माझ वाचन बंद व्हायचं. वडगावच्या शाळेत लायब्ररी होतीच व ती चालवण्याचं काम मी घेतलं होतं. त्यामुळे वाचायला बिनपैशांची भरपूर पुस्तक मिळायची व कंटाळाही येत नसे. आंबूचे बिऱ्हाड निपाणीला गेल्यामुळे माझं गोंधळीगल्लीत जाणं जवळ जवळ बंदच झालं होतं. तसं नार्वेकर गल्लीत माझ्या खुप मैत्रीणी होत्याच. माझा आवडतं समादेवीच देऊळ होते. तिथं जावून थोडावेळ बसलं की खुप ओळखीची माणसं भेटायची आणि घरात वैनी होत्याच. वैनी म्हणजे आम्ही ज्या घरात रहात होतो त्या चांदीलकरांची बायको. त्यांची माझी खुप मैत्री होती. मी



त्यांना वैनी म्हणत असल्याने त्या मला नणंदच मानायच्या. कुठेही जायचं तर मिळून जायचं. तसं त्या सर्वांच्याच खुप आवडत्या व प्रेमळ वैनी होत्या.

अशी पाखरे येती आणि स्मृती ठेवून जाती
दोन दिसाची संगत पंगत दोन दिसांची नाती

खरच कवीने किती सुंदर ओळी लिहिल्या आहेत. आपल्या आयुष्यात अनेक माणसं येतात, भरभरुन प्रेम देतात व आपणही त्यांच्यावर खुप प्रेम करतो. असं वाटतं की, आपण या माणसापासून कधीच दूर जाणार नाही व विसर मुळीच पडणार नाही. पण आपल्या आयुष्यात घडते वेगळचं. अशी माणसं दूर तर जातातच व आपण त्यांना आपल्या नित्य व्यापात विसरतोही. तरी मनातल्या कोपऱ्यात त्यांच्या आठवणी मात्र लपून बसलेल्या असतात व त्या आठवणी आपण मरेपर्यंत कोणत्या ना कोणत्या कारणाने काढतच राहतो. माझ्यातर आयुष्यात अशी खुप माणसं आली व गेली की, मी त्यांना कधीच विसरु शकत नाही. ती ना माझ्या नात्यातली ना रक्ताची. पण त्याहीपेक्षा जास्त महत्वाची. त्यात मला इंदू दाणी व शांता वाघ मैत्रिणीच्या रुपात भेटल्या. पण माझ्या वयाच्या नाहीत, शिकणाऱ्या नाहीत, पण कायम लक्षात राहिल्या. चांदीलकर वैनी, त्यांनी माझ्यावर इतकं प्रेम केलं की, विचारू नका. दिसायला अतिशय सुंदर व मनानेही तितक्याच सुंदर. खरं म्हणजे आम्ही राहत होतो त्या घराच्या मालकीणबाई. पण ते नातं त्यांनी कधीच ठेवलं नाही. तिनं मुले अनिल, अशोक व राजन. घरात म्हातारे व थोडा परिणाम झाल्यासारखे पण कडक सासरे व नवरा, नवरा म्हणजे नवराच. त्या माणसानी कधीच व्यवस्थीत नोकरी किंवा धंदा केला नाही. तसा माणूस प्रेमळ पण वागण्याला स्थिरता नाही. त्या बाबतीत त्या कमनशीबी होत्या. घरात त्यामुळे पैसा कमी, येणारे भाडे तरी किती १००-२५० रुपये. त्यात ५-६ माणसांचा संसार चालवायचा. अगदी वैतागून जायच्या पण काय करणार?

चांदीलकर काय करत होते हे मला शेवट पर्यंत कळले नाही. बाहेर काही देणी झाली की, लोक यायचे. ती लोक मात्र बरोबर वाटत नव्हती. त्यामुळे वैनी जीव मुठीत घेऊन असायच्या व त्यामुळे त्यांना माझा खुप आधार वाटायचा व त्यांचं मन माझ्याजवळ बोलून मोकळ व्हायचं. एवढं असल तरी वैनी नेहमी चेष्टा

करत हसत असायच्या. मला शाळेतून यायला वेळ झाला तर भात करुन ठेवायच्या नी ५.५० झाले की बाहेर बाकावर माझी वाट पाहत बसायच्या. मग दिवसभर काय काय घडलं, गल्लीत कुठं काय आलं, वगैरे बातम्या सांगत माझ्या हातचा अर्धा कप चहा घेणार व संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागणार. एकेकदा घरात काही नसणार. मग होत्या त्या एकट्याच अश्रु ढाळणार, कुणासमोर नाही. खुप मानी होत्या. पण माझ्या नजरेतुन त्यांच दु:ख लपत नसे. मी खोदुन विचारल की, मग त्यांना हुंदकाच यायचा. मी त्यांना जमेल तेवढी मदत करत होते. बाहेर आम्ही दोघी निघालो की, नणंद भावजया निघाल्या म्हणायचे. त्या वर्षी हायस्कुलला सुट्टी लवकर पडल्यामुळे शरद, बापू , मुडलगीला गेले. ५ दिवसात दिवाळी होती. मला वेळाने सुट्टी सुरू झाली. त्यामुळे मी दिवाळीच्या दिवशीच गावाला गेले. पण पहाटे उठून सर्व फराळ त्यांनी मला खायला लावला. मी पण त्यांना दिवाळीसाठी छोट्या मोठ्या भेटी दिल्या. ती भेट व त्या भेटी शेवटच्या ठरल्या. कारण मी गेलेल्या दुसऱ्या दिवशी पाडवा किंवा अमावस्या असेल, त्या भाजल्या गेल्या व त्यांना दवाखान्यात ठेवलं. मी लगेचच येणार होते, कारण दिवाळीला दोनच दिवस सुट्टी होती. दवाखान्यात नुस्ता माझा जप चालला होता. डॉ. म्हणाले, ह्या शांताला बोलवा. मी आल्या आल्या दवाखान्यात गेले. माझ्याशी दिवाळीचं बोलल्या. राजनला बघ, म्हाताऱ्याला चहा दे वगैरे. मी शाळेत आले तर पाठोपाठ शरद आला व त्यांनी मला हुंदके देत वैनी गेल्याचे सांगितले.

चांदीलकर वैनी गेल्यानंतर आम्हाला त्या घरात रहावेसे वाटेना. आम्ही दुसरे घर बघितले होते. पण चांदीलकर यांना आम्हाला दुसरे घरात रहायला द्यायचे नव्हते. त्याच घरात रहावं असे त्यांना वाटत होते. पण का कोणा जाणे मला त्या माणसाचा राग आला होता. मेल्या मेल्या दुसरे लग्न करण्यासाठी मुली बघायला लागले. मला मुलगी पहायला बोलवत होते. पण मी गेले नाही. एक महिन्यात दुसरे लग्नही केले. मुलांना खुप रागही आला होता. कारण मोठा मुलगा १३-१४ वर्षाचा होता. मी वैनीशी कसं वागायचे तसेच दुसऱ्या बायकोशी वागावं अस त्यांना वाटायचं व मला ते जमत नव्हतं. शेवटी एकदा आम्हाला खडे बाजारात घर मिळालं. पण चांदीलकर आम्हाला सामान नेवूनच देईनात. शेवटी मुडलगीचे एक रंगण्णा म्हणून वकील बेळगांवात होते. त्यांना मी सांगितलं मग त्यांनी पोलीस



पाठवले. मी मात्र त्यांच्यावर केस घालू नका असं समजावलं. पोलीसांच्या हजेरीत सामान घेऊन आम्ही दुसऱ्या घरात राहायला गेलो. पोलीसांनाही गंमत वाटली. भाडं पूर्ण दिलयं. तक्रारही नाही. पण बाहेर जावू देत नाहीत म्हणजे काय ? त्यांना काय माहित की त्यांनी मला खरंच बहिणीचं प्रेम दिलं होते. पण मला मात्र वहिनीच्या जागेत दुसऱ्या बाईला बघणं पटत नव्हतं. त्यांना मी विसरु शकत नव्हते व त्याचा परिणाम प्रकृतीवरपण होऊ लागला होता. असो आता लिला ७ वी पास होऊन वनिता विद्यालयाला जात होती. सर्वांचं शिक्षण व माझी नोकरी व्यवस्थित चालली होती. मी शाळेत पूर्ण रमले होते. नाडकर्णी बाई हेड होत्या. मात्र जाण्या येण्याचा त्रास सोडला तर बाकी सर्व खुप छान होतं. शाळा ११.१५ ला सुरू व्हायची. त्यामुळे मी जेवण करुन बाहेर जात असे. इथे तर भरपूर मैत्रीणी. कारण १०-१२ शिक्षिका होत्या. सगळ्या खुप चांगल्या होत्या. १-२ सोडल्या तर सर्वजणी बेळगावात राहत होत्या. त्यामुळे येता जाता सोबत चांगली असायची. खुप गप्पापण मारायला मिळायच्या. आम्ही खडे बाजारात राहू लागलो त्याच सुमारास लिला नववीत गेली होती. पण तिच्या मनात माझ्यासारखचं ट्रेनिंग घेऊन नोकरी करायचं वेड शिरलं. मी खुप सांगून पाहिलं. ११ वी नंतर ट्रेनिंग कर, तिनं ९ वीत शाळा सोडली व ती धारवाडला ट्रेनिंगसाठी गेली. तिला पैसे पाठविणे शक्य नव्हते. पण त्यावेळी बेळगांवला कन्नड ट्रेनिंग कॉलेज नव्हतं. त्यामुळे तिनं अशा हॉस्टेलची निवड केली की, तिथे पैसे द्यावे लागू नयेत, काम करायचं व दोन वेळ जेवण नाष्टा मिळेल असे २-३ महिने राहिली. पण ती मुळातच बारीक. तिला जेवण जाईना व चहा पण नाही; अशा हॉस्टेलमध्ये ही कशी राहणार? कारण तिला कसं तरी जेवण चालत नसे. तिचं तत्व म्हणजे 'तुसू तिन बेकू, खरे कसू तिनवारदू', चांगल खावं, खावं तर कमी खावं पण कचरा खावू नये. मग हॉस्टेल बदललं व जमेल तसे तिला पैसे पाठवित असे. शेवटी शेवटी तर मामी (आई) नी आपल्या बांगड्या बँकेत ठेऊन तिचे शिक्षण पूर्ण केले. लगेच तिला नोकरीपण लागली व सर्वात प्रथम लिलाने मामीच्या बांगड्या बँकेतून सोडवून आणल्या. म्हणजे मुलांच्या मनाप्रमाणे त्यांना आनंद देण्यासाठी त्यांचे आई-बाप तत्पर असायचे. तसे त्याची जाणीव मुलांनापण असायची. लिला ५-६ महिने बेळगांवजवळ मारिहाळ या गावी होती. पण माझे चुलत मामा बी. एन. कुलकर्णी यांनी तिची

बदली मुडलगीस करवून दिली. आण्णांचेही वय झाले होते. तरी प्रॅक्टीस करत होते. आता लीलाचा पण संसाराला आधार झाला. ती मुडलगीचे घर चालवी व मी बेळगांवचे घर चालवत असे. शिक्षणात मात्र कुठेही काटकसर नव्हती व खाणे साधेच पण सकस ताजे. कपडे मात्र बेताने. म्हणता म्हणता बापू मॅट्रीक झाला. त्याला लिंगराज कॉलेजला सायन्स साईडला घातलं. कारण आण्णांच्या मनांत त्याला डॉक्टर करायचं होतं. ६महिने तो व्यवस्थीत कॉलेजला गेला. तेंव्हा कॉलेजच्या पहिल्या वर्षाची परिक्षा कॉलेजमध्ये होई. पण ६ महिन्यानी बोर्डाकडून कळले की परिक्षा बोर्डाची. मग कॉलेजमध्ये पोर्शन संपविण्याची गडबड सुरू झाली. त्यामुळे बापूला लेक्चर समजेना. तरी पण पूर्ण वर्ष गेला. परिक्षेस बसला. १- २ पेपर देऊन परिक्षेला गेलाच नाही. किती समजावलं पण जायला तयार नाही. आण्णांचे पैसे फुकट गेले म्हणून खुप रडला. आण्णा आले व त्याला समजावून जूनपासून बेळगावच्या खासबाग कॉलेजला आयुर्वेदिक डॉकटरच्या कोर्सला ॲडमिशन घेतली. कारण त्याचं संस्कृत खुप चांगलं होतं. साडेचार वर्षाचा कोर्स होता. मग त्याची लाईन व्यवस्थित लागली. त्याला कॉलेज जवळ होईल व मला पण कमी चालावे लागेल. विजयपण बेळगांवला आला. त्याला बी. के. मॉडेल या हायस्कूलला घातलं. त्याला ही शाळा जवळ म्हणून आम्ही भांदूर गल्लीत घर घेतलं. कारण खडे बाजारातलं घर जरा कोदंट होतं. ते खुप गैरसोयीचेपण होते .म्हणून आण्णा आले व त्यांनी घर बघून ठरवूनच आले. मला खुपच राग आला होता. कारण मला गोंधळी गल्ली, समादेवी व नार्वेकर गल्ली या खूप आवडत्या गल्ल्या होत्या. पण आम्ही तिथं राहायला गेलो. साल असावं ६१ वगैरे. त्या घराला रेल्वेलाईन जवळ होती व आम्हाला त्याची सवय नव्हती. रात्री गाडी निघाली की, आम्ही सर्व उठून बसणार. त्यामुळे झोपेचा बाजा वाजायचा. आता शरदही कॉलेजला जाऊ लागला होता. पहिल्या वर्षी लिंगराजला जात होता. आण्णांना त्याला खुप शिकवायचं होतं. बापू नाही तर याला तरी एम. बी. बी. एस., डॉक्टर करायचं होतं. स्वामी आडनावामुळे त्याला कॉलेजमध्ये पण फी माफ झाली. फक्त त्याची मी मेडिकलला फी भरली होती. नाही तर त्याला फी माफ व्हायची. तो खुप धडपड्या होता. शिक्षकांना सांगून भेटून फी माफ करुन घ्यायचा. अगदी बापू व लिलाच्या उलट. आण्णांना काय वाटले कुणाला माहित. पण शरदला



इंटरसायन्सला सांगलीला ठेवायचा विचार आला. कारण त्याला चांगला क्लास मिळाला तर मिरज मेडिकल कॉलेजला ॲडमिशन मिळेल हा हेतू असावा. पण शरदच्या नशिवात डॉ. व्हायचे नव्हतेच. त्यामुळे त्याला फर्स्टक्लास मिळाला नाही व त्यावेळी इंटरला फर्स्टक्लास असेल तर मेडिकलला ॲडमिशन मिळत असे. शरदच्या क्लासचा गोंधळ कुठे व्हायचा तर त्याला सायन्सच्या विषयात क्लास असायचा. पण इंग्रजी वगैरे सारख्या विषयामुळे त्याची सरासरी कमी होऊन फर्स्टक्लास जाता आता सारखं पीसीबी व पीसीएम वर प्रवेश मिळत नसे. तसं असतं तर शरद नक्की डॉक्टर झाला असता. त्याला आवडही होती. पण जर तर च्या गोष्टीला काय महत्व असते का ? शरद तेव्हा सांगलीस गेला तेंव्हा मी व बापू त्याला स्टेशनवर पोचवायला गेलो. आम्हाला खूप वाईट वाटत होतं. मला तर रडूच आलं. कारण मी आंबूकडे राहून शिकले होते. पण माझ्या भावडांनी अगर माझ्या मुलांनी कुणाकडे राहून शिकावं असं मला वाटत नव्हतं.  असं का वाटायच ते माहित नाही. खरं म्हणजे तो इंदूकडेच राहणार होता. झालं शरद काही मेडिकलला गेला नाही. त्यामुळे तो आम्हा भावंडात परत बेळगांवला आला व त्याने बीएससीला ॲडमिशन घेतली. आरपीडी कॉलेजला तो जावू लागला. कारण त्यावेळी ते  कॉलेज सायन्स साईडसाठी प्रसिध्द होतं. शिकवणारे शिक्षक चांगले होते. याच सुमारास माझी बदली अनगोळला झाली. तसं म्हणजे वडगांवला येऊन मला चारच वर्षे झाली होती. माझ्यापेक्षा जास्त वर्षे इथे काम करणाऱ्या टिचर इथे होत्या. पण माझी व नाडकर्णी म्हणजे शाळेच्या हेडबाई यांची ऑर्डर एकाच लखोट्यातून आल्या. त्यावेळी आमची शाळा ७ ते १०.३० व दुपारी २.३० ते ५ अशी होती व त्यामुळे आम्ही बेळगांवहून जाणाऱ्या सर्व टिचर सकाळी गेलो की संध्याकाळीच परत येत असू व मधल्या वेळेत तिथेच जेवत असू. (डबा) २.३० ला चहा घेऊन परत दुपारीची शाळा सुरु व्हायची. गावास रहाणाऱ्या बाई घरी जात. त्या २.३० ला येतं. मी त्यावेळी मॅट्रीकच्या अभ्यास करत होते. दुपारच्या रिकाम्या वेळेत गणित-भूमिती वगैरे विषय करत होते. एक दिवस नाडकर्णी बाई आल्या व म्हणाल्या, 'चला मुडलगी बाई.' मी बर म्हटलं. मला वाटलं काही कामासाठी ऑफिसला अगर बेळगांवला जायचं असेल. कारण मी कधीच कोणतेही काम नाही

करत किंवा कां असं विचारायची नाही 'कुठे माहित आहे का ? अहो तुमची अनगोळला बदली झाली'. मला रडूच कोसळलं. मग बाई म्हणाल्या, 'अहो, मी पण येणार तुमच्या बरोबर. आपल्या दोघींच्या ऑर्डर्स आल्या आहेत व ते ही ऑफिसच्या सोईसाठी.' त्यातल्या त्यात जरा बरं वाटलं की, नाडकर्णी बाईचं माझ्या हेड असणारं. पण बाकीच्या सर्व टिचरना दु:ख झालं की, इथून नाडकर्णी जाणार. म्हणजे कसं होणार. सगळ्यांना खुपच वाईट वाटलं. मला सगळ्या टिचरना सोडून जाण्याचं वाईट वाटत होतं. कारण, आमची खुप छान मैत्री झाली होती. मला लगेच हजर व्हायला लागणार होते. म्हणजे एक दिवस रजा दिली होती व नाडकर्णीबाई मात्र ७ दिवसांनी हजर होणार होत्या. कारण त्यांना चार्ज द्यायचा होता. त्यांच्या जागेवर जेसिका दाभाडे नावाच्या अनगोळच्या हेडबाई येणार होत्या. अनगोळची शाळा 'इनक्कायरी शाळा' म्हणून प्रसिध्द होती. सदा भांडणव इनक्कायरी चालू असायची आणि म्हणून मला ती शाळा नको होती. तेंव्हा मामी थेट आली होती. कारण मी मॅट्रीकचा अभ्यासही करत होते ना ? मी घरी येऊन खुप रडले. मामीला पण वाईट वाटलं. मग मी व मामी बी. एन. कुलकर्णी म्हणजे माझे चुलत मामा ए.इ.ओ. होते. ते रामलिंग खिंड येथे राहत होते. त्यांच्या घरी गेलो व मामींनी त्यांना सांगितलं, ते ऑफिसमधूनच आले होते. ते म्हणाले मला माहित आहे. ऑफिसनेच ती शाळा सुधारण्यासाठीच नाडकर्णी बाईना हेड म्हणून घातले आहे. त्यांचेसोबत त्यांची अ.मि. त्यांना मदतीला म्हणून तुला घेतलं आहे व हे ऑफिसच्या सोयीसाठी झालेली बाब आहे. यात काही बदल होणार नाही. तु जावून हजर हो. तुला काही त्रास झाला तर मी जबाबदार आहे.

मी २ जुलै रोजी अनगोळच्या मुलींच्या शाळेत हजर झाले. साल होतं १९६२. प्रथम मी हजर झाले. त्यामुळे मला बऱ्याच गोष्टींना तोंड द्यावे लागले. मुख्य म्हणजे आमच्याच शाळेतल्या दातार बाईनी ती शाळा मागितली होती व त्यासाठी त्यांनी तिथं घरही केलं होतं. घरही केलं होतं व मुलींना टिळकवाडीत शाळेत घातलं होतं व त्यांच्याऐवजी मी, नाडकर्णी त्या शाळेत येणार हे पाहून त्यांचा राग मला ओढवून घ्यावा लागला. खरं तर माझी काहीच चूक यात नव्हती व त्यांचा राग असला तरी मला त्यांच्याच घरी डबा खाण्यासाठी जावे लागे. कारण शाळा



सकाळी दुपार होती. गांव नवीन, ओळखी नाहीत व शाळेतले वातावरण अतिशय वाईट. त्यामुळे शाळेत जेसिका दाभाडे थांबायच्या. त्यांचा नवरा पोलीस. तो दुपारी डबा द्यायला यायचा. म्हणून दातारबाईंचा राग सहन करुन मी एक आठवडा त्यांच्याच घरी दुपारी थांबत होते. नाडकर्णीबाईंनी परवानगी दिल्यामुळे मी अनगोळ शाळेचा चार्ज त्यांच्या फर्स्ट असिस्टंटकडून घेतला, कारण त्याशिवाय त्या वडगांवला जावू शकत नव्हत्या व त्या आपल्या अ. मि. चार्ज द्यायला तयार नव्हता, म्हणून मी चार्ज घेऊन त्यांना मोकळ केलं कारण त्याशिवाय नाडकर्णी बाईना मोकळीक मिळणार नव्हती. एकूण काय १०-१२ दिवस मी खुपच त्रासात काढले. जेवणच बंद झाले. मामीला तर काळजीच पडली. रोज डबा तसाच परत आणायची. मग १०-१२ दिवसांनी नाडकर्णी बाई हजर झाल्या. मी चार्ज पाहून घेतला होता. ज्या त्रुटी होत्या त्या लिहून ठेवून बाईना दिल्या. नाडकर्णीबाई आल्यावर त्यांच्यासोबत मी निर्धास्त व आनंदाने शाळेत राहू लागले. ८ ते १२ दिवसांनी नाडकर्णीबाईंनी दातारांच्याच चाळीत खाली घर घेतलं. मग शाळा सुटली की, आम्ही दोघी एकत्रच जेवत असू कारण मुलं शाळेला जायची, निलू तर लहानच होती. मग जेवणानंतर मी, निलू व अंजू जोगळेकर यांच्याशी गप्पा गोष्टी करत बसे. २.१५ ला चहा करुन मी बाईना उठवायची. चहा घेऊन मग परत शाळा. मला जाण्या येण्याचा त्रास होतो म्हणून बाई लागल्या इथचं घर करा. मलाही पटले. कारण इथ यायला मला वडगांवसारखी सोबत नव्हती. बसेस कमी होत्या व टिळकवाडीतून चालत यायला मला भिती वाटायची; कारण रोडला घर अगदी मोजकी व झाडी जास्त. नाक्यावरचा रस्तासुध्दा न दिसणारी दोन मोठी झाडं बघितली की, मला अनगोळात शिरायला भितीच वाटायची. कितीदा मी तिथपर्यंत येऊन परत गेले व रजा पाठवली.

बाई व मी मिळून घर पाहू लागलो. मला खुप गावात घर नको होतं. कारण शरदचं कॉलेज, विजयचं हायस्कूल व मला वाटतं बापूच मेडिकल कॉलेज. त्यांना खूप आत वाटू नये व मला ही जास्त चालायला लागू नये या विचाराने आम्ही अर्जुनवाडकर यांच्या आवारात घरातल्या दोन खोल्या घेतल्या. सुरवातीला कंटाळा यायचा; कारण बेळगांव सोडून मला कुठचं राहायची सवय नव्हती. पण नाडकर्णीबाई व मी रोज शाळा सुटली की फिरायला नाक्यापर्यंत यायचो व त्यामुळे

संध्याकाळ संपायची. फिरून परत जाताना वाटेत मिस्टर नाडकर्णी भेटायचे. मग त्यांच्यासोबत बाई घरी जायच्या व मी माझ्या घरी एकाच घरातल्या दोन खोल्या. पण मला घरात कोण कोण राहतात माहित नव्हतं. एक काका व काकू सोडून मी महिना दोन महिने कुणाला पाहिलं नव्हतं. वैनी मात्र कायम आजारी असायच्या. त्यांच्या खोकण्याचा व दमा असल्याने विचित्र आवाज मात्र यायचे. त्यांचा नवरा शामराव. ते सकाळी जावून रात्री यायचे व मी दुपारी ११ ते २.१५ च घरी असायची. त्यामुळे त्यांचा आवाज नुस्ता ऐकू यायचा. मधू मात्र खिडकीतून बाहेर पाहावं तेव्हा मुलं गोळा करुन सदा क्रिकेट खेळत असायचा. रमेश मात्र कुठे असायचा; बहुदा त्याचं बीएससीचं शेवटचं वर्ष असावे. तो माडीवर असायचा. २ ते ३ महिन्यात मला घरातली साधारण माणसं काकुंच्यामुळे कळली. घरात एकूण परिस्थिती बरी नसावी. काकू दु:खीच असायच्या आजारी सुनेच त्यांना करावं लागायचे व घरांतलं काम, त्यात आर्थिक ओढाताण या सगळ्याला त्यांना तोंड दयावे लागे. काका मात्र मला म्हणायचे, बाई तुम्ही काही म्हणा तुम्ही आल्यापासून आमच्या घरात शांतता नांदत आहे. कारण शामराव आला की, जरा बोलण होतं. पण भांडण होत नाहीत. तुम्ही नांवाप्रमाणे शांत आहात व जाल तिथं शांती घेऊन जाता. ते ५ ला उठायचे. मी पण ५.३० ला उठायची. कारण लीला सोबत नव्हतीच. त्यामुळे सर्व स्वयंपाक करुन बाहेर पडायचे होते व माझी शाळा ७ वा सुरू व्हायची. ६.५० ला जावे लागायचे.

आज नवीन वर्ष सुरु झालं. वर्ष येतात जातात. पण वर्ष काही नुस्तच येवून जात नाहीत, तर ती आपल्याला प्रत्येक वर्षाच्या आठवणी देवून जातात. पण आपण त्याना विसरू शकत नाही. वर्षे आयुष्यातून जातात, पण मनात मात्र प्रत्येक वर्ष आठवणीच्या रुपानं मनाच्या कोपऱ्यात आपल अस्तित्व ठेवून असतं. निदान मला तरी तस वाटतं; कारण मला तर प्रत्येक वर्षात घडलेल्या चांगल्या व वाईट घटना आठवतात. अस सर्वांनाच आठवत असणाार. पण त्या आठवत बसायला त्यांना वेळ नसतो. माझ्याकडे सध्या भरपूर वेळ आहे म्हणून मी त्या आठवून त्या त्या वर्षात परत जावून एक वेगळाच आनंद उपभोगत आहे आणि म्हणूनच मी माझा वेळ आयुष्यातल्या आठवणी आठवून लिहून त्याचा आनंद उपभोगू शकते.



आता हेच पाहा ना, आज २०१० साल सुरु असताना मी १९६२ सालात रमले आहे. अर्जुनवाडकरांच्या वाड्यात खुप बिऱ्हाडं होती व त्यात बरेचजण एकमेकांचे नातलगही होते. एकूण त्या आवारातलं अस्तित्व नीट समजावून घेणं म्हणजे बंगाली कोडंच होतं. नुसतं आवारातल्या घटनांवर एखादं पुस्तक लिहू शकाल. मी राहत होते ते घर गोविंदराव अर्जुनवाडकरांच. त्यांना तीन मुलगे, एक मुलगी टिचर, लग्न झालेली. मधू लहान तो धड शिकत ही नव्हता व मिळवत ही नव्हता. नुसता हिंडायचे, जेवायचे व क्रिकेट बाकी त्याचे काका शंकरराव त्यांना मुलबाळ नव्हते. पण जवळ जवळ ६ मुलांना रोज पोसत होते. त्यांचा आवारात दरारा खुप होता. मी या आवारात आल्यावर आवारातल्या बाळाबाईंची प्रथम ओळख झाली, ती जवळ जवळ दोन महिन्यांनी. पण ही ओळख मात्र खुप घट्ट मैत्रीत झाली. ती स्वभावाने खुप मोकळी व मनाने चांगली. तिचे मिस्टर बापूराव; ते तर देव माणूस. एकच मुलगा २-३ वर्षाचा. मला खुप आवडायचा. त्याला शाळेत जाताना पहिलं दप्तर मी घेवून दिलं. बापूराव शंकररावांच्या स्टुडिओत काम करायचे. रोज त्यांना पगार मिळायचा. एकूण परिस्थिती बेताची. पण आनंदी कुटुंब होतं. त्यांना कोडं सोडवायची आवड होती. त्यामुळे मी पण कोडं सोडवू लागले. बाळासाहेब नाडगौडा पण कोडं सोडवायचा. त्यामुळे मी वेळ रिकामा असला की बाळाबाईच्या घरी जायची. तिची आई- बहिण पण त्याच आवारात राहतं होते .बऱ्याचवेळा मी व बाळाबाई मिळून सिनेमाला किंवा फिरायला जात असू. कारण मी दिवसभर बाहेर असायची; पण ती घरातच असायची. मी जर मुडलगीला गेले तर ती बापू वगैरेना खाण-पिणं द्यायची. नंतर नंतर आमच्या पूर्ण घरातच तिची ओळख झाली व तिच्यावर सर्वच प्रेम करायला लागले. माझ्या लग्नात तर ती आठ दिवस माझ्या बरोबर आली होती. म्हणजे आण्णा, मामी सर्वांच्या बरोबर आपुलकीने वागे. त्यामुळे ती सर्वांना घरचीच वाटे. त्याचप्रमाणे मधूची आई, काकू त्यापण माझ्यावर खुप प्रेम करायच्या. मी कधीच कुलुप लावत नसे. त्या दूध घेत, तापवून ठेवत, कधी कधी भाकरी पण करून ठेवतं. त्याना काही हवं असेल तर घेवून जात व आल्यावर मला सांगत. स्वत:च्या मनातलं दु:ख सांगून कधी कधी रडतं. आता आमच्या मुडलगीच्या घरात लीला, मंगल, राजा, आण्णा, मामी व आण्णांची आई म्हणजे आजी एवढी माणसं राहतं व इथं मी, बापू, विजय व शरद राहत होतो. मंगलचा व

माझा एकत्र राहण्याचा योग खुप कमी आला. कारण तिच्या जन्मापासून मी बाहेर असल्यामुळे मी व ती एकत्र राहायचो ते मला सुट्टी पडली व मुडलगीला गेलो तर कारण कधी कधी सुट्टीत मी सांगलीला इंदूकडे पण जात असे. असे असले तरी माझी सर्वांत लहान बहीण म्हणून माझं तिच्यावर खुप प्रेम होतं. बापू तर तिला प्रेमानं अन्नी म्हणायचा. आण्णांच्या पानातला दहिभात खाल्ल्याशिवाय तिचं पोट भरत नसे. तिच्या जन्मापासून ते लग्नापर्यंत ती मुडलगीलाच राहीली. मध्ये ११ वी नंतर सांगलीला टायपिंग शिकायला पाठवलं तर ६ महिन्यातच बाईसाहेब पळून आल्या. मी मात्र तिच्यासाठी बेळगावातून कपडे शिवून पाठवून द्यायचे. सरक यांचे दुकानातून कापड घ्यायचं व येसू भिसे (मैत्रीण) कडून परकर झंपर शिवून पाठवायचं. कारण बहिणीचं आणि मंगलचं माप एकच होतं. लीलासाठी साड्या पण मी पाठवायची. जवळ जवळ सर्वांचे कपड्याच कंत्राट माझ्याकडे होते, कारण भातकांडेच्या दुकानातून व सरक यांचे दुकानातून मी केव्हाही कपडे घेवून पाठवू शकत होते पैसे नसले तरी. मी अनगोळात राहीले तरी कपडे तिथेच घ्यायची. पण आपलं अंथरूण बघूनच पाय पसरायची सवय असल्याने मी देण जमेल एवढेच कपडे उधार घेत असे व ते दिल्याशिवाय दुसरे कपडे घेत नव्हते. तसं बंधनच मनाला घातलं होतं. हल्ली आण्णांचा हात थरथरतं होता. त्यामुळे मुडलगीचे घर लीला व बेळगावचे घर मी चालवत होतो. अर्थात आण्णाही प्रॅक्टीस करत होते. पण इंजेक्शन वगैरे कमी द्यायचे. नाही तरी आण्णा पेशंटना इंजेक्शन खुप कमी द्यायचे. जास्त करून बाहेरील आजूबाजूच्या खेड्यातील पेशंट जास्त असायचे. त्यांना ४ किंवा ८ दिवसांचे औषध तयार करून द्यायचे. अगदी गरज असली तरच इंजेक्शन. पण शक्यतो औषध व गोळ्या यावर भर आसयचा. पूर्वी आत्तासारख्या तयार औषधांच्या बाटल्या नसायच्या. वेगवेगळी औषध प्रमाणात घालून औषध प्रत्येकाला तयार करून द्यावी लागायची. आण्णानां अनुभवामुळे रोगाची परीक्षा खुपच चांगली होती. अगदी चेहरा पाहताक्षणी त्या माणसाला कोणता रोग झाला असेल हे ओळखायचे. खेड्यातले पेशंट असल्यामुळे खुप बोलावे लागायचे. मग एकेकदा खुप चिडायचे. तसा त्यांचा स्वभाव थोडा रागीटच होता. पण मुलांना मात्र ते कधीच मारत नसतं. कधी कधी मामीच मारायची. मी तर समजायला लागल्यावर म्हणजे ४-५ वर्षानंतर मार खाल्लेला अजिबात आठवत नाही. बापू मात्र मार



खायचा, तो खुप तापटही होता. आमच्या भांडणाच्या जोड्या होत्या. आंबू व इंदू, बापू व लीला, शरद व विजय. मी मात्र राजा मंदबुध्दीचा असल्यामुळे असेल कुणाशीच भांडत नसे व मंगल तर सर्वांत लहान त्यामुळे सगळे तिचे लाडच करायचे. त्यातल्या त्यात कधी तरी लीलाच तिला रागवे. मी मात्र कधी भांडतच नव्हते व नंतर बेळगावला गेले. मग आलेल्या वेळी सर्वजण प्रेमानेच राहत होतो. आण्णा व आम्ही मिळून एकत्र कधीच जेवत नव्हतो. आमची मुलांची जेवणं झाल्यावरच ते जेवायचे व मग मामी जेवायची. जो स्वयंपाक केला असेत तोच सर्वांनीच जेवायचा. प्रत्येकाच्या आवडी निवडी जपणे शक्य नव्हते व तशा खुप आवडी निवडी नसायच्याच. मामीच्या हातानी काही स्वयंपाक केलेला असला तरी त्याला खुपच चव असायची. खाणं विशेष नसायचं. तीनदा जेवणचं. दही, दूध, तूप लोणी हे पदार्थ मात्र जेवणाात असायचे . रोज कसली का असेना चटणी, कोशिंबीर, भाजी, भात, आमटी, भाकरी ७ दिवस. कधी तरी चपाती. अमावस्या असली की भाकरी करत नसत. सणाला मात्र वेगवेगळी पक्वान असायची. मसालेभात, वांगीभात म्हणजे छोटी वांगी घालून खुपच छान असायचा. नवरात्रात तर दहा दिवस भाकरी नाही. रोज वेगवेगळे पदार्थ व रोज कुणी ना कुणी जेवायला असत. रोज आरती, पुरण वरणाचा स्वयंपाक, श्रावण महिन्यात पण तसेच. देव आमच्याचकडे असल्यामुळे सर्व सणांना व रोजही नैवद्य तसेच देवासमोर नंदादीप म्हणजे कायम रात्र दिवस समई तेवत असायची. त्यामुळे घरात एक प्रकारचे पवित्र वातावरण असायचं. आण्णाना कसलही व्यसन नव्हतं. कधी सुपारीसुध्दा खात नसत. लोकांना खावू जेवू घालायचं व्यसन मात्र दांडगं होतं. त्यामुळे मामीला कायम घरात काही आहे नाही याकडे लक्ष द्याव लागे कारण केव्हा कुणाला जेवायला घेवून येतील नेम नसे. त्यात त्यावेळी मुडलगीला खानावळी नव्हत्या त्यामुळे गावात कुणी अधिकारी, ऑडीटर, डॉक्टर आले की आमच्याच घरी जेवायला यायचे. चुकुन डाळीचं पीठ संपल तर मामी रात्री जात्यावर बसून पीठ दळून ठेवायची. कारणा आण्णांना व आम्हालाही गिरणीत दळलेल्या डाळीचं पिठलं आवडत नसे. तसेच लाह्याचं पीठ व मुगाचंही पीठ घरातच दळायची पध्दत होती. मेतकुट, मसाला पावडर, सांडगे सर्व घरीच बनवायची.

आज गणेश जयंती. म्हंटलं, आज पुन्हा लिहायला सुरु करुया. कारण १०-१२ दिवसात लिहायचे राहून गेले. आता वयामुळे मध्ये-मध्ये प्रकृती बिघडते. आता पाय दुखायचे कमी झालेत, पण डावा खांदा खुप दुखतो म्हणून गोळ्या घेतल्या व त्यामुळे पित्त होवून चक्कर सुरु झाली. या दोन तीन वर्षात मला मधे मधे चक्करचा त्रास होतोच. पण मला चक्कर येते हे सांगितल्याशिवाय कुणाला कळतं नाही व मला तर आपणाला काही होतय हे सांगायची सवय नाही. अर्थात हल्ली नाईलाज झाला की सांगणे भागच पडते. रसायनीत असले की प्रश्न नाही, सीबीडीत असले की मेघाला फोन करा, गोळ्या विचारा, मग त्या आणा. दुकानही लांब पण निशा आणि बाळू बरे नसले तर खुप काळजी घेतात. बाळू जरा विसरतो पण निशा मात्र आजारी असताना काळजी घेते. माझा आजार म्हणजे काय चक्कर येणे, पाय दुखणे हे आता कायमचेच. तो आजार आमच्याबरोबरच जायचा. पण आता बरेच कमी आहे. बाळूला वाटतंय मी फिरायला जावं, घरात बसून पाय दुखतात पण जर त्यात चक्करचा त्रास केव्हा होईल हे सांगता येत नाही. कारण त्यावेळी मला एक पाऊलही पुढे टाकता येत नाही. पूर्ण घर व वस्तू उलट्या सुलट्या दिसतात. मग मी एकटी कशी जाणार व दुकटे कुणाला नेणार. परवा बेळगावला दोन दिवस सकाळी २-४ तास चक्कर यायची. सकाळी पहिला चहा १०-१०..३० ला घेतला. बिचारे निशाचे बाबा व आईला त्रास. मी आईला शाळेत जायला सांगितले. पण बाबांना माझ्यासाठी घरात १२ पर्यंत थांबाव लागलं. म्हणून मी हल्ली घरी किंवा रसायनी सोडून कुठेही जात नाही.

१९६२ साल असावे. शरदने आरपीडी कॉलेजला ॲडमिशन घेतली. बापूचंही शिक्षण संपलं. विजयपण १० वी पास झाला. शिक्षणाची जवळजवळ अर्धी जबाबदारी संपत आली. आण्णा आपले मुडलगीचे पेशंट म्हणजे ऑपरेशन किंवा सिरीयस पेशंट प्रथमपासूनच घटप्रभेला घेवून जायचे. त्यामुळे घटप्रभाचे के .एच.आय हॉस्पीटल म्हणजे आण्णाचं दुसरं हॉस्पिटलचं होतं. अगदी एकूण सर्व लोक त्यांना ओळखायचे व आदराने वागवायचे. त्याचा फायदा बापूला झाला. बापूला त्याच हॉस्पीटलमध्ये नोकरी मिळाली. पगार तसा फार नव्हता, पण त्याला तिथे खुप अनुभव व शिकायलाही मिळणार होते. मला वाटलं १ -२ वर्षे तरी तो तिथं होता. पेशंटची पण त्याच्यावर श्रध्दा होती. हे हॉस्पीटल जास्त करून टी. बी. हॉस्पीटल म्हणून प्रसिध्द होते. कारण इथली हवा खूप चांगली. त्यामुळे उत्तम हवा, पाणी व उपचार यामुळे हे पेशंट पूर्ण बरे होवून जायचे. बापूला बराच वेळ टी. बी. वॉर्डात काम करावे लागे व तो मनापासून करायचा. त्या वार्डातले पेशंट तर



हाच डॉक्टर पाठवा म्हणायचे. मग तिथल्या कमेटीला वाटले की, याला स्पेशल शिकायला मद्रास की कुठं तरी पाठवावे व टी. बी, स्पेशालिस्ट म्हणून नेमणूक करून घ्यावी. त्यामुळे हॉस्पीटलचा फायदाही होता व बापूचाही. पण काय झाले कोण जाणे, तो जायला तयार झाला नाही. तिथली नोकरी त्याने १९६५ साल असावं सोडून दिली. यावेळी माझं लग्न झाल होतं. मी व हे आत चहा घेत होतो. हा बाहेर एकटा रडत बसला होता. मुडलगीस न जाता तो माझ्याकडेच आला. मी व यांनी त्याची समजूत काढली. आण्णांचा दवाखाना चालवायचा सल्ला दिला. मग जरा शांत झाला. मी मधून अर्जूनवाडकराच्या नावाने बेंको कंपनीतून कार्लेकर की काय आडनावावर दुकानातून एक सायकल घेवून दिली. महिन्याला २ का २.५ रुपये भरायचे होते. मला वाटतं बापू पुढे गेला हे व मधू सायकल घेवून मुडलगीस गेले व बापूच्या दवाखान्याचे उदघाटन करून आले. म्हणजे आण्णांच्या देखरेखीखाली बापूची प्रॅक्टीस सुरु झाली.

शरद बेळगावला आला. बी.एस्सी फर्स्टक्लासमध्ये पास झाला. आम्हा सर्वांना खुप आनंद झाला. साल असावं १९६३. त्याला लगेच कॉलेजमध्ये पूर्णवेळ डेमॉस्ट्रेटर म्हणून नोकरी द्यायचं भालेराव-प्रिन्सिपल यांनी कबूल केलं. पण जास्त वशिल्याचा कुणी आल्यामुळे याला अर्ध वेळ नोकरी मिळाली. म्हणजे पगार अर्धाच असला तरी पण त्याने ती धरली. या आधीपासूनच म्हणजे ६१-६२ पासूनच माझं लग्न व्हावं असं आण्णांना मामीला वाटायचं. पण तसा हातात पैसा नसल्याने मी लग्नाला विशेष तयार नसे. कारण हुंडा सोनं कुठुन आणायचं व आण्णांच वय पण आता बरंच होतं. त्या लग्नाच्या कारणावरून बऱ्याचवेळा माझे व आण्णांचे खटके उडायचे. आण्णांना व पुर्ण कुटुंबाला कर्जात टाकणं मला पसंत नव्हतं. तरी पण स्थळ आलं की आण्णा ऐकायचे नाहीत. ह्या लग्नाच्या बाजारात मला खुप मजेदार अनुभव आले. त्यातील २-३ तरी विचित्र अनुभव एकदा मी आण्णांच्या बरोबर तेरदळला गेले. अर्थात त्या लोकांनी बोलवलं म्हणून. इनामदार की काय आडनांव होतं. बहुतेक मुलगा वकील होता अस वाटल. त्यादिवशी खरच त्यांच्याकडं मुलींचा बाजार मांडला होता .एक दोन नाही १० मुलींना बोलावलं होतं. १० -१५ मिनीटाच्या अंतराने तो प्रत्येक मलगी पाहायचा. मला तर खुप राग आला होता. पण काय करणार आण्णांच्या पुढे काय सांगायचं. आण्णांनाही ते फारस आवडलं नाही. त्या मुलीत मामांची एक मामेबहीण की कुणी होती. नाव बकुळा. दिसायलापण स्मार्ट. खरं वय जास्त असावं. ती पण या कार्यक्रमावर वैतागली. प्रत्येकीला तो काही प्रश्न विचारी. आता माझा नंबर आला मला नोकरीबद्दल वगैरे

विचारल व मग मेतकुटाला लागणाारं साहित्य विचारलं. मला आधीच राग आला होता. मी मसाल्याला जे लागतं ते अधिाक डाळ, तांदूळ, उडीद घालतात असं सांगितलं. मला तर कुठे मेतकुट करता येत होतं. मामी बरोबर दळायला लागायची तेव्हा पाहीलं होतं. मग म्हणाला एका भाकरीसाठी पाणी किती टाकाव लागतं. मग मला मात्र खुप राग आला काय सुचलं कोण जाणे, मी सांगितलं पुरुषाला दाढी करायला जेवढ पाणी लागतं तेवढ्या पाण्यात एक भाकरी होते. सर्वांना माझ उत्तर कसं वाटलं माहित नाही पण सगळे हसायला लागले एवढ मात्र खरं. चांदीलकरांच्या घरात असताना माडीवर यमुताई राहायची. ही माझी मावस बहीण पण आईच्या वयाची. तिला तर माझ्या लग्नाची खुप घाई. मला सोडून सर्वांना माझ्या लग्नाची घाई होती. ती पूर्ण बेळगाव भटीणबाई म्हणून प्रसिध्द होती. तिनं माझ्यासाठी एक स्थळ आणलं. अर्थातच मी तिच्याबरोबर जायला नकार दिला. पण ती काही ऐकायला तयार नाही. ती खुप शहाणी होती असेही नाही. त्यामुळे तिच्याबरोबर जाणे मला मुर्खपणाचे वाटले. मी सहज अंबूला म्हणाले. ती म्हणाली,'जा की, तुला काय तिथं बांधून ठेवतात.?' मग मी यमुताई बरोबर गेले. शहापूरला वेळ कोणती माहित आहे ९ -९.३०. रात्री जेवण करून झोपायची आणि खरचं तो मुलगा जेवण करून झोपला होता. बाकीचे जागे होते, माणसं बरी होती. मुलगा झोपेतून उठून आला, पण बरे वागला, बोलला, तो कोर्टात क्लार्क होता चिकोडीला. दुसऱ्या दिवशी त्याच्या घरी जावून यमुताई होकार घेवून आली. तो मुलगा माझ्यापेक्षा ७ महिन्यांनी लहान होता. पण त्याला लोकांची काही हरकत नव्हती. पण का कोणास ठावूक ही गोष्ट माझ्या मनाला पटत नव्हती. आपल्या माहितीत असून, आपल्यापेक्षा लहान वयाच्या मुलाबरोबर लग्न करणं मला पटत नाही. बाकी काहीच काढण्यासारख नव्हतं. त्यांनाही माझ्या नोकरीमुळे मी जास्त पसंत होते. ती लोकं एक दोनदा समजवायला यमुताईकडे आली. पण माझाच नकार असल्याने आण्णांपर्यंत ही गोष्ट गेलीच नाही. एकूण काय यमुताई नाराज झाली. मला काही फार फरक पडला नाही. त्यानंतर चिकोडीच्या दोन मुली म्हणजे यमुताईच्या चुलतं बहिणी आमच्या घरात दाखवायला आणल्या शांताबाई नावाच्या नर्स होत्या त्यांच्या भावासाठी. आमचं घर जरा मोठं व व्यवस्थित होतं म्हणून आमच्या घरी कार्यक्रम ठरला. मुलगा मिलटरीत होता. अर्थात चांगलाच होता. त्याला ज्या मुली दाखवल्या त्यात एक खुप मोठी होती व बऱ्यापैकी कुरुप. तीनं गाण मात्र छान म्हंटलं. आमच्या घरातला चहा पिवून निघुन गेला. तिच्या धाकट्या बहिणीलाही पाहायचे त्याने नाकारले. नर्सबाईंची व माझी ओळख



असल्याने मीच विचारायला गेले, त्यांनी नकार सांगितला. उलट मलाच लग्नाचा विचार आहे का विचारले. यमुताईकडून आण्णांनाही विचारले. पण मिलीटरीतल्या माणसाला नको म्हणाले. एकूण काय लग्न होत नाही याबद्दल मला काहीच वाटत नव्हते. कारण नोकरी, भावंड व मैत्रीणी यामध्ये मी छान रमलेली होत. पण आण्णा, मामींना एवढ्या मुलांची जबाबदारी पार पाडायची होती ना हे आता मला कळलं तेव्हा नव्हतं कळत. हातात पैसा नसताना स्थळ बघतात याचा मला राग यायचा. पण उलट बोलायची धमक नव्हती. त्यामुळे गप्प बसण्यापलीकडे गत्यंतर नव्हतं.

शरदला नोकरी मिळाली. जेमतेम दोन महिने नोकरी केली व त्याने एम.एस्सीसाठी धारवाडला जायचा विचार बोलून दाखवला. मला जरा हे पसंत नव्हतं. कारण आण्णांना आत काम करवतं नव्हतं. जर माझं लग्न झालं तर विजयच शिक्षण कसं होणार? बापूची नोकरी नावालाच कारण पगार त्याच्या जेवणापुरताच मिळायचा. त्यामुळे आता आण्णांना त्रास होवू नये असं मला वाटायचं व त्यासाठी शरदने नोकरी करणं गरजेच होतं. हे सर्व मी त्याला समजवलं, त्याला पटत होतं पण शिकायची इच्छा खुप होती. मलासुध्दा त्यानं शिकावं वाटत होतं पण त्याला पैसे कुठुन पाठवायचे, कारण लीला व मीच घर चालवत होतो. उत्पन्न होतं पण त्या व्यापाऱ्याकडे पैशासाठी आण्णांनी खेट्या घालाव्या हे मला पटत नव्हतं. हे सर्व खरं होतं अडचणी खुप होत्या. पण आण्णांनाही शिक्षणाची आवड होती. आण्णा बेळगावला आले. त्यांनी मला समजावलं व शरदही मुडलगीस जावून व्यापारी लोकांशी बोलला. त्या गावातले लोक त्याला हायस्कूलमध्ये काम कर म्हणत होते. पण शरदनी तिथे काशिनाथला नोकरीस ठेवून आपण कॉलेजची नोकरी सोडून धारवाडला गेला. मला भिती की पैशामुळे त्याच शिक्षण अर्धवट होईल पण तोही जिद्दीचा. म्हणाला निदान युनिव्हर्सिटी तरी पाहून येतो. आम्ही सर्वांनी त्याला प्रेमाने निरोप दिला. कुठल्या बहिणीला भाऊ शिकू नये असे वाटेल का? साल असावं ६४-६५. यावेळी आम्ही अर्जुनवाडकर आवारातलं घर बदलून गांगोटकरांच्या घरांत राहायला आलो. आऊटहाउसमध्ये दोनच खोल्या; पण छान हवेशीर होत्या व त्या आम्ही ठेवल्याही होत्या छान. कुणीही आलं की म्हणायचे, तुमच्या घरात छान प्रसन्न वाटतयं.

आता बेळगावला दोन खोल्यात मी व विजय दोघं राहत होतो. विजय सायन्स कॉलेजला पार्ट १ किंवा इंटरला होता. मी माझी नोकरी, घर यात रमलेली. संध्याकाळी बाळाबाईकडे जावून गप्पा, कोडं सोडवायचं यात वेळ जायचा. संध्याकाळी भाकरी भाजी सर्व असायचे. नुसता भात गरम करायचा. ८ च्या

सुमारास घरी जायचं. ९ पर्यंत जेवण आणि १०-११ पर्यंत माझा अगदी आवडता कार्यक्रम म्हणजे वाचन. मला अगदी लहानपणापासून वाचनाची आवड असल्याने कुठेही वेळ जात नाही असे होतचं नाही. इथंसुध्दा मी शाळेची लायब्ररी सांभाळायचं काम आवडीनं घेतलं होतं. त्यामुळे पुस्तक दरवर्षी ग्रँटमधून आणायची, निवडायची. अर्थात ती व्यवस्थीत ठेवायची हे काम माझ्याकडे होते. बरोबर नाडकर्णी बाई असायच्या. सांगायचं कारण म्हणजे मला कुठं लायब्ररी शोधणे व वाचण्यासाठी पैसे खर्च करावे लागलेच नाहीत. अगदी आता ७४ व्या वर्षी सुध्दा रुपा लायब्ररीयन असल्याने मला सातार्‍याहून पुस्तक येतात. पुस्तक जरासुध्दा कुणी खराब केलं किंवा हरवलं अथवा खुप दिवसांनी परत केलं नाही तर मला खुप राग यायचा. त्या कारणावरून मी कपिलेश्वरी बाई दोन वर्षे बोललो नव्हतो. असो रात्री ११ काय पुस्तक चांगल असेल तर १२-१२.३०पर्यंत वाचन. मला झोप मात्र मस्त लागायची. एकदम सकाळीच जाग यायची. मग काम सुरु. धुणं, केर, स्वयंपाक, १०.३० ला जेवणं, मग शाळा असा छान दिनक्रम चाललेला असायचा. केव्हांतरी आवारातल्या लोकांशी बोलण व्हायचं. पण कमी त्यामुळे गांगोटकर कंपनीला मी खुप मस्तवाल आहे. नोकरी करते म्हणून जरा ग ची बाधा असलेली बाई असं वाटायचं. हे नंतर त्यांनी मला सांगितलं.

आमच्या दोन खोल्या होत्या त्यांच नाव होत 'पद्मावती कॉटेज'. मी व विजय दोघचं असल्याने काम फार नसायचं व शाळाही लांब नसल्याने बर्‍यापैकी दग दग कमी झाली होती. ११ ते ५.३० शाळा, सकाळी १०.३० पर्यंत घरचे भांडी घासण सोडून सर्व काम करून जायचं. संध्याकाळी थोड फिरुन घरी. या चक्रात मी पूर्ण रमून गेले होते. सुट्टी असली की चांगला लागला असेल तर मी व बाळाबाई सिनेमाला जात असू. अर्थात इथून जायचं म्हणजे जाता येता बस पकडायची कसरत करावी लागे.

आण्णांची स्थळ पाहणं चाललच होतं. तम्मा स्वामी म्हणजे आताचे सुधीर स्वामीचे वडील, आल्यावेळी त्यांनी कुरुंदवाडातून दोन स्थळं आणली. एक कुलकर्णी व एक देशपांडे. मला वाटत मी प्रथम सांगलीस गेले व तेथून मी व मामा नाडगौडा कुरुंदवाडला गेलो. अर्थात तम्मास्वामींच्या घरीच उतरलो. दोन्ही स्थळ पाहणं झाले. यादी झाली व चैत्र महिना आल्याने घरात हळदी कुंकू समारंभ झाला. कुलकर्णींच्या घरातील माणसं जरा मतिमंद व रोगट वाटली अर्थात मेन मुलगा नव्हताच. पण घरही भयाण व असमाधानी वाटलं. दुसरं देशपांडे यांच्या खाली एक स्वयंपाक घर. त्यातच जीना व वर दोन का एक खोली, गॅलरी. सुरवातीला वैनींनी



स्वागत केलं. मला खुप कडक वाटल्या. सुमन रंगनाथराव पोटे. अर्थात माणसं बरी वाटली. नानासाहेब व मुख्य लक्ष्मणराव. असो. मी परत सुट्टी संपताच बेळगावला आले. देशपांड्यांनी पसंती कळवली अर्थात मी त्या स्थळाचा खुप विचार केला नव्हता. परत रुटींन सुरु झालं. आण्णांना मुडलगीस पसंतीच पत्र आलं व ठरवायला येतो म्हणून पत्र लिहून आण्णा पोस्टात निघाले. पत्र पोस्टात टाकायला जातानाच पोस्टमनने आलेले नाडगौडांचे पत्र दिले व ते वाचून पत्र न टाकताच आण्णा परत घरी आले. त्यांनी लिहिलं होतं मुलगा बारीक वाटतो व ते पत्रिकापण पाहत नाहीत, तेव्हा आपणा बघा काय करता. मग आण्णांनाही मनात संशय सुरु झाला व यातलं अर्थात मला काहीच माहित नव्हतं, मग समजलं.

सन ६४ असावं एक वर्ष मध्ये गेलं. शरदचे शिक्षण व्यवस्थित चाललं होतं, म्हणजे तो खुपच काटकसरीने राहत होता. कधी त्याचे मित्र, कधी वडीलाच्या मैत्रीणी त्याला पैसे पाठवत होते व त्यानंतर त्याला बँकेतून विद्यार्थी लोनही मिळाले. एकूण त्याच्या नशिबात शिक्षण होते. अर्थात आमचा भाऊ शिकतोय याचा आनंद मलाही व सर्वांनाच होता. म्हणता म्हणता ६५ साल उजाडलं. सहज तम्मास्वामी आले व परत आण्णांच्या मागे ते लागले. त्यांच्या पत्रिका जळीतात जळाल्या व सर्व लुटलं. त्यामुळे ते पत्रिका पाहत नाहीत अस समजलं व तुम्ही शांताला तिथ द्यायचं, काही प्रॉब्लेम आला तर मी आहे. मग आण्णांच्या मनाला पटलं. सुरु झाले. त्यांनी मला सांगलीला यायला पत्र घातलं व कुरुंदवाडला परत जायचं त्यांनी ठरवलं. त्यावेळी फोनची सोय मुडलगीत नव्हती आणि मला पत्र मिळालं नाही. मी वैजनाथला ट्रीपला गेले. आण्णा, मामी बहूतेक नाडगौडा पण असणार कुरुंदवाडला गेले व माझं लग्न ठरलं. दुसर्‍या दिवशी मी शाळेतून येते तर मामी घागर घेवून मला अंगणात दिसली. मला वाटलं भास होतोय. कारण एकटी अचानक कशी आली? चावी बाजूलाच असायची. माझी यायची वेळ झाली म्हणून विहीरीच ताजं पाणी आणून चहा करणार होती.

मामीला अचानक पाहून मला आश्चर्य वाटलं, मग तिनं सांगायला सुरुवात केली. शांता, तू मला शिव्या दे, भांड काही कर, पण मी तुझं लग्न ठरवून आले. मला न विचारता आणि त्यांनी तरी परत मुलगी पाहतो कसं म्हटलं नाही. अर्थात मी मामीला काहीचं बोलले नाही. बरं म्हटलं. पण तिलाच ते मनाला कसंतरी वाटू लागलं. अगं घर खुप मोठं आहे. विम्याचं काम पण भरपूर करतो. शिक्षण नाही पण निर्व्यसनी आहे. शेवटी मी तिच्यावर रागवण्याऐवजी मीच तिची समजूत घातली. असूदे, तू किंवा आण्णा माझं कधीच वाईट चिंतणार नाही. आंधळा वगैरे

नाही ना मग मी सांभाळीन त्याला. मग जरा मामीला हायसं झाले. मी गेले नाही म्हणून आण्णा तर चिडले होतेच. म्हणून मामी स्वत एकटी बेळगावपर्यंत आली व आण्णा मुडलगीस गेले. मी मात्र बाळाबाईला दुसऱ्या दिवशी सांगून खुप रडले. अर्थात ती पण म्हणाली अगं, पण तुला का नाही विचारल? मला न विचारता लग्न ठरवले म्हणून बापूही आण्णा मामीवर रागवला होता. त्याच म्हणणं, तिनं एवढं आमच्या सर्वांसाठी केलं असताना तुम्ही अस कां केलं? पण मामीच्या मनात हे स्थळ जास्त होतं कारण यमुताई तिला भेटून तू शांताला तिथ देच नाही तर मी माझी मुलगी देईन, पण नानासाहेबांना तिची मुलगी करायची नव्हती. म्हणून ते यमुताईला भेटून आमच्या घरी सांगायला सांगितले, कारण यमुताईची आई चंदूरकरांच्या घरात दिली होती. म्हणजे मामीची बहिण व म्हणून त्या घराण्यात शांताला द्यायचं असं काही तरी चाललं होतं. मामी म्हणाली म्हणे बेळगावला या, आणखी एकदा मुलगी बघा. यांनी सांगितल, 'मी २-२ वेळा अनगोळ रोडवर पाहिले आहे, त्याची गरज नाही' कारण ते डॉ. दिक्षीतांच्या घरी यायचे व तेव्हा रोडवरच्या दवाखान्यात ते सरकारी डॉक्टर होते. त्यांचेकडून त्यांनी माझी पूर्ण चौकशी केली होती. २-३ दिवसांनी मामीला केर काढताना पेटीच्या खाली आण्णांनी मला येण्याबद्दल घातलेलं पत्र मिळालं. एकूण माझं लग्न असच ठरणार होतं.

प्रथम मला समजेना त्यांचं घर मोठं आहे असं मामी म्हणते. मी तर त्यांचं दोन खोल्यांचं भाड्याचं घर बघितलंय. काय घोळ आहे कळेना. शेवटी मी मामीला विचारलं, अग त्यांच स्वत:च घर नव्हतं आणि दोन भाड्याच्या खोलीत ते राहत होते. नक्की कुणाबरोबर लग्न ठरवलंय? मग मामी म्हणाली, अग २-५ महिन्यांपूर्वी त्यांनी हे घर घेतलंय. त्याच्या खरेदीपत्रासाठीच ते बेळगावला यायचे व डॉ. दिक्षीतांचे घरी राहायचे. कारण घरमालक हुबळीला राहायचे. मग म्हटल हरकत नाही. निदान आपण एकदा तरी माणसाला पाहिले आहे. मला वाटतं ऑक्टोबरच्या शेवटच्या किंवा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात लग्न ठरलं व मुहुर्तपण ठरवूनच मामी मला सांगायला आली होती. म्हणता म्हणता बाईंच लग्न ठरलं. अर्जुनवाडकरांच्या आवारात व तिथल्या मुलींच्यामुळे शाळेत कळायला वेळ लागला नाही. मला मात्र आनंदाऐवजी काळजीने ग्रासले होते. विजयचं शिक्षण कसं होणार ? कारण तो कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. त्याचे शिक्षण अर्धवट राहील का ? माझा नवरा विजयला घरात ठेवायला तयार होईल का? शरद व विजयचे शिक्षण, मंगल ८ वीतच होती त्यामुळे तिचा प्रश्न नव्हता. एकटी लीला



किती जबाबदारी सांभाळेल ? हे सर्व विचार मनांत यायचे व संसाराच्या चित्रापेक्षा हिच चित्र जास्त दिसायची. त्यात ७ तोळे सोनं आणि खर्च करायचा अस ठरलं होतं. त्यासाठी आण्णा कसे पैसे जमवणार ? वगैरे वगैरे म्हणता म्हणता १५ दिवसांवर लग्न आलं. बाळाबाईच्या आग्रहास्तव २-३ ब्लावूज शिवायला टाकले. फर्नांडीस म्हणून शिंपी होता. खडे बाजारात होता. ८ दिवसांनी कपडे ब्लाऊज आणायला गेले. तर तो आजारी होता. त्याने कपडे तसेच ठेवले होते व दुकानाला कुलुप

२-४ दिवस तरी आधी यावे लागेल म्हणून मुडलगीहून आण्णांचे जरा कडक पत्र आले. बोलवायला पटाप्पाला पाठवतो, असेही पत्रात होते. मग मी बाईंना रजेचे विचारून रजा टाकली. कारण १६-१७-१८ या दिवसांत गणती होती. एकूण ५-६ दिवस रजेवरच भागवायचे ठरले. मग काय रोज कुणाकडे तरी केळवण असायचे. मी व विजय कधी कधी यायचा. मी मंगळवारी १४ तारखेला मुडलगीस गेले. त्यादिवशी पडल्या भरल्या बुधवारी देवकार्य. शुक्रवारी निघायचे कारण मिरजेला लग्न. बरोबर बाळाबाई आली होती. तिचं काय ती माझी मैत्रीण. लीलाने तर एखाद्या कर्त्या पुरुषाप्रमाणे आण्णांच्या मार्गदर्शनाने लग्नाची पुर्ण तयारी केली होती. मला कोणतीही झळ लागू न देता सर्व काही चूपचाप करत होती. तयारी पाहून मी तर थक्क झाले. पैशाची किती अडचण आहे हे मला माहित होतं. शरदनी, बापूनी आपले आपले कपडे आपणच तयार करून आणले. मंगल व मामीला घेतले. फराळ पूर्ण घरांत सर्वांनी मिळून म्हणजे शरद विजयसह केला होता. कारण स्वयंपाकी परवडणार नव्हता. बुंदीचे का मोतीचूर लाडू मात्र मिरजेतच कार्यालयात करायला लावले होते. २५-३० माणसांचा टेम्पो ठरवला होता. मी, आण्णा व मामी आणखी कुणीतरी ५ जणांनी ट्रॅव्हलने जायचे ठरवले. देवकार्यादिवशी गावातल्या देवांना प्रथम व नंतर घराघरात अक्षता देवून आमंत्रण द्यायचे होते. अर्थात मामी, इंदू, मंगल सर्व तयार झाले. लीला, म्हणाली बँडवाले येवू देत ना. तेव्हा आण्णा म्हणाले, 'नाही, बँड सांगितला नाही'. तेव्हाचे लिलाचे बोलणे मी अजूनही विसरू शकत नाही. घरात व गावातलं पहिल लग्न होतयं बँड आणायलाच पाहिजे. घरात तुम्ही काय खाता हे कुणी पाहायला येत नाही. बाकी सर्व गोष्टी केल्या मग बँड का नाही ? ती स्वत जावून बरोबर कुणाला तरी घेवून बँड वाल्याला घेवून आली. एकूण शांताच्या लग्नाच्या अक्षता गावातल्या देवांना द्यायला थाटात निघाली. आल्यावर १० मिनीटे दरवाजात बँड वाजवायला लावून त्यांना खुशाली दिल्यावरचा लीलाच्या चेहऱ्यावर आनंद बघण्यासारखा होता. असे निरपेक्ष प्रेम आज क्वचितच पाहायला मिळते. शाळेतल्या मुलींना घेवून रुखवतसुध्दा कमी खर्चात पण सुंदर केला होता.

ती खुप तडफदार होती व बोलेल ते करेल अशी. गावातसुध्दा तिला खुप मान होता. कलाप्पा स्वामी म्हणायचे, बघा रस्त्यातून निघाली तर कुणाची छाती आहे का काही म्हणायची. खुप भर भर चालणार. पदर इकडचा तिकडे होणार नाही. लोकांना मदत करणं व सर्व कला अंगात, सुंदर गाण म्हणायची. सुंदर रांगोळ्या काढायची. विणकाम, भरतकाम, स्वयंपाकात व शिकवण्यात तिचा हात कुणीच धरणार नाही. असो. शुक्रवार उजाडला. आम्ही चौघे रेल्वेने मिरजेला गेलो. संध्याकाळी ८ वाजले असणार. टेम्पो ८ - ८.३० ला आला. कुरुंदवाडची मंडळी आली ७.३० ला. मी व मामी रुममध्ये बसलो होतो. रंगनाथरावांनी गितूला माझ्याजवळ देवून सांभाळायला सांगितलं. त्याच दिवशी ती प्रथमच चालायला शिकली. वर्षा सव्वा वर्षाची होती. बाकी माणसं अजून यायची होती. श्रीमंत पुजा झाली तेव्हा १० वाजले. मग जेवण व जेवताना मी प्रथम ह्यांना बघितलं व बाळाबाईला दाखवलं.

१८ डिसेंबर १९६५ उजाडला हा दिवस म्हणजे माझे आयुष्य पटल बदलवणारा  दिवस. मग ते आयुष्य कसे असेल याची मी कल्पना करू शकत नव्हते. कारण नवीन माणसं, नवे स्वभाव व नवीन राहणी ह्याच्यात मला सामावून जाता येईल का ? कारण हल्ली बरीच वर्षे मी स्वंतंत्रपणाचे व माझ्या मनासारखे आयुष्य जगत होते. ८ वर्षे नोकरी करत असल्याने आर्थिक बाबतीत पण स्वतंत्र होते. जरी मी कुटुंबाचा भार उचलत असले तरी ते माझ्या माणासासाठी माझ्या मनाने करत होते. यापुढे असे मदत करण्याची व मनाप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मला असेल का? होणारा नवरा हुकुमशहा नसेल ना ? अर्थात असा विचार येत होते. पूर्वी मी ठरवलेले की, लग्न झाले की आपण खुप छान संसार करायचा, आपली मुल आपणच सांभाळायची. घरातील भांडी सोडून सर्व काम आपणच करायची. छोटे असले तरी घर छान व शांत ठेवायचे. आलेल्या गेलेल्या पाहुण्यांचे प्रेमाने स्वागत करायचे व हे सर्व करण्यासाठी आपण नोकरी सोडून द्यायची. नवरा कमवेल, त्यातच काटकसरीने संसार करायचा. पण आज विचार बदलले, आपल्या नवऱ्याचा पुर्ण स्वभाव समजेपर्यंत आपण नोकरी अजिबात सोडायची नाही. हे सुध्दा मी १८ डिसेंबरलाच ठरवले. मी जेव्हा विचार करून माझे मत ठरवते तेव्ही मी कुणाशीही चर्चा करत नाही व कुणाचेही मत घेत नाही. व त्याची मला गरज वाटत नाही. जरी कुणी सल्ला दिला तरी मी माझ्या विचाराला पटेल तेच करते. दुसऱ्याचे ऐकून करत नाही. त्यामुळे मी नात घेतले जे निकाल असतात ते सर्वस्वी माझे असतात व त्यामुळे मी कुणावरही रागवत नाही. त्याचा परिणाम म्हणजे माझे वाद



क्वचित होतात. असो. असे विचारच करत बसले. लग्नाला कोण उभं राहणार ?आजचा हा निर्णय माझाच आहे. आण्णा व मामीवर पूर्ण विश्वास ठेवून घेतलेला.

लग्नाचा मुहुर्त मला वाटतं ११.०० ते ११.३० च्या दरम्यानचा होता. आमची माणसं ६० ते ७०, पाहुण्यांची जवळ जवळ २०० माणसं, अशी २०० ते ३०० माणसं लग्नाला होती. माझा मानलेला भाऊ म्हणजे बापूराव अक्षताला १० मिनीट असताना आले व मला हळूच येवून सांगितले, ‘बाई मी आलोय बरं का, कारण बापूराव हे खुपच चांगले फोटोग्राफर होते व त्यांनी माझ्या लग्नाचे फोटो काढायचे अगदी प्रेमाने ठरवले होते. लग्नाआधीसुध्दा त्यांनी माझे, मी व बाळाबाई, जोत्स्ना व शरद व मी असे खुप फोटो काढलेले आहेत. मग आज तर त्यांच्या बहिणीचे लग्न, धावत पळत अक्षतेला हजर राहीले होते. १८ तारखेला सकाळी ८-९ वाजता मी आणि लीला गप्पा मारत होतो मला एकदम आठवण झाली व मी तिला म्हटलं,‘अग तुझी साडी दाखवली नाहीस. माझ्या लग्नाला कसली घेतली? ती म्हणाली,‘नाही, मी साडी घेतली नाही.’ वेळच मिळाला नाही. मग मात्र मी तिला सांगितलं,‘तुला साडी आणल्याशिवाय मी लग्नच करून घेणार नाही. तिनं मला खुप समजावलं. पण मी मामीलाही सांगितलं, लीलानी साडी घ्यायलाच पाहिजे. मग ९-१० वाजता मोक्याच्यावेळी मी व शरद का कुणीतरी जावून तिला छान ३५/- रु.ची जरीची साडी आणली. तिचे डोळे भरून आले. असे आमचे बहिणी बहिणीचे प्रेम होते. जसं सर्व भावाबहिणींचे प्रेम सोडून आज मी लग्न करून नाव, आडनावासकट दुसऱ्या घरात जाणार, खरचं बायकांचं आयुष्य कसं असतं, एका घरात वाढतात व दुसऱ्याचं घर सजवायला व लावायला जातात आणि काही दिवसात त्या तिथल्याच होवून जातात.. गंमत आहे ना ? लग्न झालं. सर्व होम हवन वगैरे व्हायला २ -३  वाजले. जेवणावळी चालल्या होत्या. सर्वजण रात्रीच्या जेवणाचे आत्ताच्या जेवणाचे कौतुक करत होते. त्या गोरे मंगल कार्यालयाचा मालक खुष होता. प्रत्येक कार्यक्रमाचे वेळी लक्ष्मणरावांना बोलावून आणावे लागे. कारण जसं दुसऱ्याच्या लग्नाची जबाबदारी घ्यायचे तसेच स्वतःच्या लग्नाची जबाबदारी त्यांच्यावरच होती. असो नेहमीप्रमाणे माझ्या लग्नाचा जवळ जवळ सगळा कारभार नाडगौडा यांच्याकडेच होता. प्रथमपासून आण्णांचे ते सल्लागारच असायचे. १० तोळ्याचं बिस्कीट घेवून ते घरांत आणून वितळवावं लागलं. कारण त्यावेळी सोने खरेदीवर काही तरी नियंत्रण होते. त्यात इंदूचा ३ तोळ्याचा हार व ७ तोळे माझ्यासाठी व १० ते १२ तोळ्याची चेन होती. मंगळसुत्र, साडेतीन तोळ्याच्या बांगड्या व अर्धा तोळ्याची अंगठी असे दागिने केले होते. मला सर्व

दागिने आधी श्रीमंत पुजनावेळी दिले. मंगळसुत्र दुसऱ्या दिवशी. एक तोळ्याच्या हाराचे पैसे ह्यांनी दिले होते. अर्ध्या तोळ्याची अंगठी मात्र मला लग्न झालं तरी दिली नाही. नाव ठेवताना ह्यांनी आपली अंगठी काढून तांदळात नाव लिहिलं 'उर्मिला'. सर्व तयारी झाली हिशेब चुकते झाले. कुरुंदवाडची म्हणजे ह्यांची २५-३० माणसे जास्त झाली होती. अर्थात ह्यांनी त्यांचे पैसे आपण भरले व मग इंदूनी मला हळूच अंगठी आणून दिली. कारण त्यांनी पैसे भरले नसते तर अंगठी द्यायची, काय करायचं यावर नाडगौडांची चर्चा चालली होती. तोपर्यंत ह्यांनी पैसे भरले व मला अंगठी मिळाली. मी मुद्दाम त्यात गुलाबी खडा घालायला सांगितला होता. पण मी अंगठी मागणार तरी कशी ? म्हणजे माझ्या लग्नातसुद्धा हिशोबीपणा त्यांनी केला. अर्थात आण्णा मामी पण त्यांचं ऐकायचे. काही का असेना त्यांचा आण्णांना आधार वाटत असणार. असे माझे लग्न पैशाची चणचण असूनसुध्दा खुप थाटात झालं. आण्णा मामींना खुप आनंद झाला तो कशाचा तर त्यांना आतापर्यंत कन्यादान करता आल नव्हतं. कारण आंबूनं लग्न पळून जावून व इंदूचे काही तरी गोत्राचा गोंधळ होता त्यामुळे मोळेच्या मामा-मामीनी तिचं कन्यादान केले म्हणजे पहिलं कन्यादान आण्णा मामींनी माझ केलं. कन्यादान करण्यात खुप पुण्य असतं असा त्यांचा समज होता.

लग्नानंतर ५ च्या सुमारास आम्ही म्हणजे वैनी, नानासाहेब, शिऱ्या, विद्या, तम्मा स्वामींची मुलगी, मी व हे असे कारने कुरुंदवाडला आलो. हो, सत्तू बाईपण होती. आजूबाजूच्या बायका जमल्या. घरात पाऊल ठेवताना वैनींनी नाव घ्यायला सांगितलं. तो उखाणा अजून आठवतो. 'मनाला आल्हाद वाटला, पाहून कुरुंदवाडचा थाट, लक्ष्मणरावांबरोबर आत यायला, सोडा माझी वाट' अर्थात हा जुळवून घेतला होता. कारण उखाणे वगैरे पाठ करायला सवड कोठे ? खरचं घर मोठं होंत हे खरं. पण बाथरुमला दार नव्हतं, संडास नव्हताच. दुसऱ्याच्या संडासात जावे लागे. अर्थात माझा प्रश्न नाही. मी काय २-३ दिवस राहून हजर व्हायला जाणार होते. घरातील सर्व मंडळी चांगली, साधी होती. वैनीच जरा टोमण्यानी बोलायच्या पण कामाला व पाहूणचार करायला खुप चांगल्या. रावसाहेब सर्वात थोरले. नानासाहेब शिक्षक होते. घरात मंगलपण होती. ही तात्यासाहेबांची मुलगीपण इथच राहते हे मग मला समजलं. दुसऱ्या दिवशी सत्यनारायणाची पुजा होती. मी तम्मास्वामीकडे गेले असताना रावसाहेब बोलवायला आहे व मी घरी येताच मला सांगलीचा नंबर विचारला. विलासने मी भांडीवाले शिंदेचा नंबर बघायला सांगितला. नाडगौडांच आमंत्रण गेलं पण नुसता



शरद एकटाच आला. मला एक ब्लाऊजपीस व यांना पाकीट देवून जेवण वगैरे करून संध्याकाळी गेला . पोटे वैनी, त्यांची बहिण बाळी पोटे हे सर्वजण संध्याकाळी वाडीला जाऊन आले. पोरे कंपनी गप्पा मारायला छान होती. बाजूलाच तम्मा स्वामींचे घर असल्याने सुधीर, सुरेश, विद्यालता यांच्यामुळे मला ४ दिवस न कंटाळता गेले. घरात सुमन, रंगनाथराव, गितू, विलास, रावसाहेब, नानासाहेब वगैरे असल्याने कामातही वेळ जायचा. माझ्या भाकरी व चपात्याचा स्पीड व क्वालीटी बघून घरात सर्वांना व त्यातल्या त्यात सुमनला खुप कौतुक वाटायचं. आमचा घरात बनवलेला फराळ सर्वांनी कौतुक करून करून खाल्ला. म्हणजे नोकरी करत असले तरी स्वयंपाक चांगला येतो असं वैनी म्हणाल्या मी मनात म्हटलं न येवून सांगणार कुणाला. ८-९ वर्षापासूनच लागला पाठीशी. असो यांचा स्वभाव मी घाबरत होते तसा अजिबात नव्हता. मुख्य म्हणजे निर्व्यसनी, हौशी व हसतमुख असल्यामुळे मला बिनधास्त वाटले. कारण दारूडा वगैरेची मला खुप भिती वाटायची. लहान असताना शंकर काकानी घरात दारू पिवून येवून जो गोंधळ घातला होता. आण्णा बेशुध्द पडले. मामी व आम्ही मुल रडू लागलो. त्यामुळे मला मुडलगी फारशी आवडत नव्हती. मुडलगी म्हटल की मला दारू व शंकर काका आठवायचे. लहान वयात याचा माझ्या मनावर परिणाम झाल्याने मी आण्णांना म्हणायची गरीबी चालेल, शिक्षण कमी चालेल पण व्यसनी माणूस मात्र मला नवरा म्हणून चालणार नाही, मी लगेच सोडून येईन. २-३ दिवसानी म्हणजे बुधवार असेल हे व मी सांगलीला गेलो. तिथं बाळाबाई होती. शरद होता. सर्वानी मिळून 'माझी बायको माझी मेहूणी' नाटक पाहीलं. मी बाळाबाई शरदसह बेळगावला आलो. शरद चिक्कोडीला उतरून मुडलगीला गेला. तो दुसऱ्या दिवशी बेळगावातल्या लोकांसाठी व शाळेतील टिचरासाठी फराळाचे डबे घेवून आला. धारवाडला एम.एस्सी साठी गेला. बाळाबाईंनी व विजयनी आवारात फराळ दिला मी शाळेत आमच्या टिचर व उर्दु शाळेतल्या टिचरना शनिवारी चहा व फराळ शाळेतच दिला. झालं, लगीन घाई संपली. परत माझी शाळा, नोकरी सुरु झाली. हो आणि मी चार दिवस कुरुंदवाडला होते तेवढ्यात सुतार येवून बाथरुमला दरवाजा ह्यांनी लावून घेतला. मग वैनींनी ह्यांना टोमणा मारला बघा आता बायको आली लगेच सुधारणा सुरु झाली. हे सहसा उत्तर देत नसत. म्हणजे या माणसाशी मी चांगले जमवून घेईन याची मला खात्री वाटली. व त्याच समाधानाने मी बेळगावला परतले.

मला माझ्या जगात लग्नामुळे फारसा फरक पडला असे वाटले नाही. इतर

मुलींप्रमाणे मला सासरी जावे लागले नाही. त्याच घरात मी, विजय राहत होतो. आहे त्याच गावात आहे. तिच नोकरी करत होते. घरातल्या सामानात फरक नाही डिसेंबरचा शेवटचा आठवडा म्हणजे २९-३० तारखेला किंवा जानेवारीचा पहिला आठवडा असेल, हे अचानक आले. अर्थात आमच्या घरी कुलुप. मग हे दातार बाईंच्या घरी गेले. म्हणजे शाळेजवळ दातारबाईंनी मला मधल्या सुट्टीत हे आलेत व भेटायला बोलवलंय अस सांगितलं. त्याप्रमाणे मी गेले. ह्यांनी मला घेवून मुंबईला जायचा बेत आखला होता व बोलवायला आले होते. खरं म्हणजे असं अचानक ठरवणं मला कधीच आवडत नाही. पण मी नाही म्हटलं नाही. रजा विचारून सांगते म्हटलं. मग समोरच शाळा, मी बाईंना विचारलं. बाई लगेच तयार झाल्या. १० दिवसांची रजा टाकून मी निघणार तोपर्यंत पगार शिपाई आला. मला हुश्श झाले. कारण मला विजयला पैसे देवून जायला हवे होते व माझ्याजवळ पैसे जास्त नव्हते. यांच्याकडे मागणे म्हणजे मला अपमान वाटत होता. लगेच पगार घेतला. विजयला पैसे दिले. त्याचा निरोप घेवून मी व हे कोल्हापूरला आलो. पोटे, पोटे वैनी व मधू नावाचा खेड्यातील एक मुलगा असे दुसऱ्या दिवशी ५ जण मुंबईला निघालो. त्या मुलाचे वडील वारले होते. त्याच्या विम्याचे पैसे आणायचे होते. यांचा खर्च तो करणार होता. माझा मात्र ह्यांनी केला. मी मुंबई प्रथमच पाहत होते. अर्थात पोटे व वैनी ह्यांनी पण मुंबई पाहीली नव्हती. हे मात्र खूप वेळा मुंबईला जायचे. ट्रकमध्ये भोपळे भरून तिथल्या व्यापाऱ्यांना ते विकायचे. याच भोपळ्यावर बसून ह्यांनी एकदा विलासलाही मुंबई दाखवली होती. असं तो मला सांगायचा. एकूण काय मला पण मुंबई बघणार याचा आनंद होताच. पोटे ही त्याच आनंदात. मुंबईला आलो संध्याकाळी. त्या दिवशी संध्याकाळी संकष्टी होती. हे म्हणाले,'आज आपण खवासखानच्या घरी जेवायला जावू व तेथेच राहू.' मी म्हंटलं,'आज मुसलमानाच्या घरी नको.' मग मला कळलं की खवास खान हे राम बिदनुकर यांच्या बहिणीचं आडनाव. त्यांनी आमचं खुप प्रेमाने स्वागत केलं. कारण हे लहानपणापासून एकत्र वाढलेले. दुसऱ्या दिवशी पण त्यांचं व्रत असल्यामुळे आम्हाला आग्रहाने ठेवून घेतलं. दुपारी आम्ही शिऱ्याच्या बहिणीकडे चुनाभट्टी येथे गेलो. सामान खवासखान कडेच. कारण त्या रात्री त्यांच्या घरी उद्यापन होतं. परत येताना आम्ही लोकलने यायला निघालो. मी, पोटे वैनी व मधू चढलो. पोटे व हे खालीच राहीले. गाडीत गर्दी खूप होती. कुठ उतरायचं त्या स्टेशनचे नाव आठवेना. शेवटी पोटे वैनीना बॉम्बे आठवलं व मला सेंट्रल आठवल. एका चांगल्या माणसाला विचारून ज्या बाजूला स्टेशन येतं त्या बाजूला मधुला घेवून थांबले व स्टेशन



येताच मी व वैनी पटकन उतरलो. पण मधू उतरताना त्याचा पिशवीसकट हात आत राहीला गाडी सुटली. शेवटी आतल्या लोकांनी पिशवी व हात बाहेर ढकलला. १० मिनीटांनी दुसऱ्या लोकलने हे आले. मोठे मोठे डोळे करून पाहत असताना आम्ही हात केला. मग हे उतरले. कारण आमची गाडी दहिसरपर्यंत जाणारी होती. त्यामुळे हे खुपच घाबरले होते. अशा मुंबईच्या पहिल्याच दिवशी आम्ही हुशार आहोत याची खात्री ह्यांना पटली. तिसऱ्या दिवशी आम्ही शिऱ्याच्या बहिणीकडेच राहायला आलो. तिचा नवरा पोलीस खात्यात वरच्या हुद्द्यावर होता त्यामुळे घरही मोठे व तिथचं राहून आम्ही पूर्ण मुंबई पाहिली. रोज सकाळी नाश्ता करून बाहेर पडायचं व रात्री जेवायला व झोपायला यायचं असे चार दिवस कसे गेले ते कळलंच नाही. एक दिवस आम्ही राणीचा बाग बघायला गेलो. खरं म्हणजे ह्यांना बाग बघायची नव्हती. त्यांना भोपळ्याच्या व्यापाऱ्याला भेटायचे होतं. पण पोटे त्यांना सोडेनात. तेव्हा आम्हाला बागेत बसवून आत्ता खायचं घेवून येतो म्हणून जे गेले ते २-३ तास पत्ताच नाही. पोटे कंपनी जरा कंजुषच. शेवटी खुप भुक लागली. मग पोटेनी काही तरी खायला आणलं व आम्ही खात असतानाच हे आले. मधुला पण घेवून गेले होते. मला ह्याच्याशी न बोलण्याबद्दल ताकीद दिली होती. थोडा वेळ ह्यांची मजा बघितली व मग खावून परतलो. तेव्हा कळलं की, हे व्यापाऱ्याला जावून भेटून आले. एकूण मुंबईत खुप फिरलो, खुप फोटो काढले, खरेदी पण केली व चार दिवसांनी आम्ही परत निघालो. त्या मधुचे काम पण झाले. येताना आम्ही पुण्यापर्यंत आलो. मिरजेला सुटणारी गाडी ८-९ ला काही तरी होती. आमच्या सर्वांना काही माहित नसल्यामुळे हे सांगतील तेच खर मानावं लागायचं. तिथ पण ह्यांनी आम्हाला स्टेशनवर बसवलं. सामान एका रुममध्ये ठेवलं व म्हणाले, 'मी जरा काढलेले फोटो धुवून प्रिंट करून आणतो. आम्ही बसलो व जाताना मात्र म्हणाले गाडी लागली की, गाडीत जावून बसा.' कुठ गाडी लागणार वगैरे सांगून गेले. ८ वाजले तरी पत्ता नाही. तिथंही ते कुणाला तरी भेटून फोटो घेवून फिरून आले. मी गाडीत बसूया म्हटले तर पोटे तयार नाहीत वाट पाहत थांबले. गाडी फुल भरली. गाडीत मुंगी शिरायला जागा नाही. तिकीट तरी काढलेलं मला व पोटे वैनीला फर्स्टक्लासच्या डब्यात सामानासह बसवलं व आपण बाजूच्या डब्यात कसे तरी चढले. मला हे अजिबात आवडलं नाही. कारण थर्ड क्लासचं तिकीट काढून आम्ही फर्स्टक्लासच्या डब्यात प्रवास करत होतो. मी ह्यांना सांगून टाकलं. चेकर आला तर मी मुक्याच नाटक करणार. पोटे वैनी म्हणाल्या, मी सांगेन काही तरी बाजूच्या डब्यात तिकीट राहीलीत म्हणून. पहाटेचे ५-५-३० वाजले असणार फस्टक्लासच्या

डब्यात आम्ही गाढ झोपलो होतो. चेकर आला आणि आम्हाला उठवलं, मी न बोलता वैंनीकडे बोट दाखवलं. त्यानं त्यांना उठवलं. तिकीट मागू लागला. वैनी म्हणाल्या, 'बाजूच्या डब्यात पुरुषांकडे आहेत.' तो उतरून गेला. पण मिरजेला त्याने बरोबर आम्हाला गाठलं. मी तर लांब जावून उभी राहीले. मग ह्यांनी त्याला बाजूला नेवून काय काय सांगून पैंसे थोडे देवून परत आले व आम्ही अशा तऱ्हेने मुंबईचा पहिला प्रवास करून १२ वाजता कुरुंदवाडला आलो. फोटो खुपच छान झाले होते. एक गाढव सोडून सर्व वाहनांवर बसून फोटो काढले व त्यातलं एकही वाहन स्वत:च नाही. कुणाची तरी स्कुटर, कुणाची तरी कार, घोडा, रेल्वे स्टेशन राणीचा बाग, कमला नेहरू पार्क, ताजमहल हॉटेल. ताजमहल हॉटेलमध्ये तर पोटेंची गंमत केली, आम्ही चहा सांगितला. तिथं तीन चार माणसं असली तरी किटलीत ७-८ कप चहा भरून देतात. म्हणजे नुस्त साखर, दूध व कप दिले. आम्ही १-१ कप चहा करून प्यालो. पण पोटे कंपनीने पुर्ण चहा व दुध संपेपर्यंत चहा करून प्याले. हॉटेल मात्र पुर्ण फिरून बघितलं. कुण्या तरी बड्या माणसांची पार्टी होती. सर्वांना चांदीची ताटं, वाट्या, तांबे मांडलेली दिसत होती. मागच्या बाजूला सुंदर हिरवळ होती. काही लोक तिथं खात पित होते. आम्ही मात्र मंद प्रकाशात हॉटेलमध्ये संगीत ऐकत चहा घेतला. तेवढ्या चहाचे त्यावेळी मला वाटतं १५० रुपये वगैरे बिल आलं असावं. एक मात्र आम्ही सर्व मुंबई होता होईल ती चालत पाहिली किंवा टॅक्सी. कारण बसने यांना कळायचे नाही. त्यावेळी मी बाळाबाईच्या मुलाला दप्तर व घरात गारेच्या दगडाचे पोळपाट आणले. ते मुंबा देवीच्या देवळाजवळ खरेदी केले. एकूण आमचा मुंबईचा प्रवास खुप छान झाला. २ - ४ दिवस राहून मी परत अनगोळला हजर व्हायला आले. यावेळी मात्र हे मिरजेपर्यंत कुरुंदवाड मिरज बसने पोहचवायला आले. ८ -१० दिवस बिचाऱ्या विजयचे हालच झाले. महिना असावा जानेवारी. माझ्या लग्नानंतर पहिला सण आला तो संक्रातीचा. वैंनीने माझ्यासाठी हलव्याचे दागिने तयार करून ठेवले होते व रथसप्तमीला येण्याचे आंमत्रण होते. तेवढ्या अवधीत लिलाने हलवा घरात बनवून ह्याच्या उंचीला साजेल असा हार व गुच्छ करून आणला. चांदीची वाटी घरातली आणते म्हणाली. मी नको म्हटलं वरून यांच्याकडे कपडे फारसे नव्हते. म्हणून मी शर्ट पँट पिस घेतला व हार तुरा घेवून कुरुंदवाडला गेले. मला यांनी साडीपण घेवून दिली. पण घरात वाटी आणली नाही. म्हणून वैनी रागावल्या होत्या. त्या म्हणाल्या,'आता बायकांना काय दाखवायचं शर्ट पीस?' मी म्हटलं,' वाटी काय वापरली जाणार नाही व कपडे वापरले जातात म्हणून मी माझ्याच मनाने असे



केले.' विलास, सुमन सर्वांना माझं म्हणणं पटल होते ते माझी बाजू घेत होते. मग वैनी जास्तच रागवल्या तुम्ही काकूची बाजू घेतात वगैरे. हे आपले शांत कुणाचीच बाजू घेत नव्हते पण मनातून कपडे आणले यावर खुष होते. २ दिवसांत मी परत निघाले यावेळी हे मला बेळगावला पोहचवायला आले कारण ह्यांना खुप आहेर आला होता एक मोठं घागरीचं पातेलं भरून वाट्या व पेले ताट डबे खुपच भांडी आली होती. जळीतात घर लुटल्याने यांच्या घरांत भांडी बेताची म्हणजे मोठी खुप होती पण लहान कमी. सुमनने मला एका पोत्यात घागर, कुकर, ताट अस काय काय घालून बेळगावच पोतं तयार केलं. त्यामुळे मला पोहचवायला त्यांना यावं लागलं. त्यात ह्याच्या पणजोबाची घागर आहे ती अजून मी तशीच ठेवली आहे.

मला आज शिवराज गोर्ले याचं पुस्तक वाचायला मिळालं. 'मजेत जगाव कसं ?' अर्थात वाचायला नुकतीच सुरुवात केली आहे. छान असावं असं वाटतयं. त्यातलं हे वाक्य मला खुप आवडलं. प्राणी जगायच म्हणून जगतात. का जगायचं हा प्रश्न त्यांना पडत नाही. माणसाला मात्र हा प्रश्न पडतो. म्हणूनच तो अस्वस्थ असतो व या अस्वस्थेतूनच माणूस स्वत:च्या जगण्याला अर्थ देण्याचा प्रयत्न करतो व त्याच जगण हे नुसतं जगण न राहता सतत प्रगती करत राहणचं. माणसाच खरं जगण असतं म्हणून माणसानं पुरेपूर जगावं. खरच किती छान वाक्य आहे. हल्ली माणसाला जगण्यात जरा जरी दु:ख नैराश्य आल की स्वत:ला संपवायची घाई खुप होते. पण हे चुकच ना ? माणसाला देवानं एवढी शरीरसंपदा दिली आहे. विचार करण्याची क्षमता आहे, त्याच्या जोरावर माणूस आयुष्यात खुप काही करू शकतो. एखादी गोष्ट मनासारखी नाही झाली तरी बाकीच्या ज्या मनाप्रमाणे घडलेल्या गोष्टी असतात त्याच्याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी आपल्याला असली की आपण सहजच मजेत जगू शकू अस मला तरी वाटतं. आज १५ चं पानं वाचून झाली आहेत. कारण हल्ली मी एकदम खुप वाचत नाही. कारण डोळ्यांची संपत्ती आता वयाप्रमाणे जरा जपून वापरायला हवी ना ? पूर्वी रात्री १२ वा. पर्यंतही वाचत बसायची. हल्ली कमी केलयं. तसं माझं वाचन लग्नानंतर थोड थोडं कमीच झालं. त्याला कारण आमचे सरकार. सरकार म्हणजे लक्ष्मणराव. त्यांना सरकार म्हणूनच दूरचे लोक हाक मारायचे व त्यांना ते आवडायचे. म्हणून मी पण त्यांना अहो वगैरे न म्हणता सरकार म्हणायची. आपण सरकारी थाटात राहत नसलो तरी सरकार म्हटलं की आहे तो साधा थाट सुध्दा सरकारी वाटायला लागतो. आपण आपल्याला मोठं मानायला कुणाची भिती ?

हे मला बेळगावला पोहचवून परत गेले. महिना असेल फेब्रुवारीचा. मग

मार्च महिना काय आमच्या शाळेच्या वर्षाचा शेवटचा धामधुमीचा महिना. पेपर काढा, तपासा, ७ वीचे पेपर चेक करायला जा. रिझल्ट शीट तयार करा, एक ना दोन? म्हणता म्हणता एप्रिल १९६६ सुरु झालं. मुलांच्या परीक्षांची घाई सपंली. पण सुट्टीचे वेध सुरु झाले. कामाला वेग येत होता. पट पट काम आटपून एप्रिल १० ते मे २२ अशी मोठी सुट्टी पडणार होती व यावर्षी त्या सुट्टीला वेगळा अर्थ होता. कारण प्रथमच ह्यांच्या सोबत ही सुट्टी घालवायची होती. अजूनही एकमेकांच्या आवडी तितक्या समजत नव्हत्या. आता त्या समजतील. असो. २-३ तारीख असावी एप्रिलची. अचानक हे कुरुंदवाडहून आले. हातात एक रिकामी मोठी पिशवी व त्यातच २-३ कपडे. मला आश्चर्य वाटलं. मला म्हणाले, मी ५-६ दिवस इथं राहायला आलोय. मग १० तारखेला सुट्टी पडली की, जावू चालेल ना ? मी म्हंटलं जावू. त्यांना अजून हे घर परक वाटत होतं. कुरुंदवाडचं घर त्याचं व हे त्यांना कुणाच वाटत होत कोण जाणे. मला तर दोन्ही घर माझीच वाटायची. ११ तारीख उजाडली. हे व मी कुरुंदवाडला निघालो. सकाळी लवकरच निघालो. त्यामुळे १२.३० ते १.०० च्या दरम्यान पोहचलो. घरात मंगलला नानासाहेब रागावलेले. त्यामुळे ती रडतं बसली होती. नानासाहेब जरा रागातच दिसत होते. वैनीचा आधीच आठ्या असणारा चेहरा आठ्यांनी भरला होता. ह्यांना या सर्व गोष्टींची सवय असेल किंवा असं घडणार हे माहित असेल त्यात काही विशेष वाटलं नाही. पण माझं मन मात्र खट्टू झालं. सगळे बरे वाटत होते. पण सगळ वर वर वाटत होतं. आत काही तरी भयंकर लाव्हा रस शिजतं असावा अस भास होत होता. मी दुर्लक्ष केलं. जे होतं ते दोघंही जेवलो. वर वर एकमेकाची खुशाली विचारली व गंभीर वातावरणातून मी माडीवर निघून गेले व मोकळा श्वास घेतला. ह्यांना कुरुंदवाडला गेले की यांच्या पायाला काही थारा नसतोच, नुस्ते फिरायचे, घरात कमीच. रावसाहेब, नानासाहेब, मंगल, सर्वांनाच भटकायची सवय. गावातल्या बातम्या मग घरात सांगायच्या. घरात बसल्या सर्व गावात काय चाललंय हे माझ्या सारख्या घरकोंबडीलाही कळायचे. वैनीसुध्दा देवळाला जायच्या निमित्ताने सकाळी एक तास बाहेर पडायच्या. मी या खेपेला कुरुंदवाडला जास्त दिवस रहावे लागणार म्हणून १०-१५ किलो तांदूळ, मसूर, सोल, असं बरचं सामान घेतलं होत. अर्थात ह्यांना घरात सर्वांना पहिल्यापासून भाकरी खावून मग थोडा भात जेवायची सवय होती. मला दोनदा भात व मध्ये थोडी भाकरी खायची सवय, नुस्ती भाकरी खाल्याने पोटात विचित्र व्हायचं म्हणून तांदूळ घेतले होते. दुसऱ्या दिवशी सर्व सामान काढून वैनीना दिलं, नाष्ता झाला दुपारची जेवणं



झाली. वातावरणात फारसा फरक पडला नव्हता. हे बाहेर गेले. मी ह्यांना लायब्ररीतून पुस्तक आणायला सांगितलं. लगेच ह्यांनी आणून दिलं. वाचत मी वर जावून कॉटवर पडले. दुपारी २-३ च्या सुमारास माडीवर दोन अडीच वर्षाचा जरा मंद वाटणारा मुलगा आला व वैनी म्हणून हाक मारली. मी त्याला पाहतच राहीले. कारण त्याला पाहून भिती पण वाटली, मी 'तू कोण' म्हटल्यावर मी भाई की काय म्हणाला.व तुम्हाला पोटेंच्या घरात देशपांड्यांनी बोलवलंय म्हणाला. मला जरा ह्यांचा रागच आला. तरी पण मला कंटाळा येवू नये म्हणून गप्पा मारायला बोलवलं असेल असं वाटलं. मी पोटेंच्या घरी जवळच होते. वैनिला सांगून गेले, मला सहसा कुणाच्या घरी जायला आवडत नाही. पण ह्यांनी बोलवलंय व मी नाही गेले तर यांचा अपमान व्हायला नको म्हणून मी गेले. त्यांच्या घरी गेले तर हे सोडून तेथे सर्वजण होते. पोटे, पोटे वैनी व तिची आई, नानासाहेब, पाटणकर साहेब व बोलवायला आलेलं ध्यान. मला कळेनाच ह्यांनी बोलावलं असे खोटं सांगून मला का बोलवलं असेल? मी सरळच विचारलं. मनांत खूप राग होता. पण शांतपणे मी हे कुठं आहेत? अस विचारलं. तेव्हा पोटे म्हणाले, नाही आमचं काम तुमच्याकडे आहे. तुमच्याशी बोलायचं आहे. मग साहेबांनी ह्यांच्या तक्रारी सांगून झाल्या. हप्ते वेळेवर भरत नाहीत वगैरे. मग पोटेनी सांगितले की घरांत एक पैसा देत नाही, पैसे काय करतो कळंत नाही. या तिघांना मी मात्र एकटी न रडता मनातून आलेला राग गिळून शांतपणे उत्तर देत होते.

पोटेंच्या घरी जवळ जवळ दोन अडीच तास कार्यक्रम झाला. मी पण कुणाला सैल सोडलं नाही. प्रथम नानासाहेबांना म्हटलं,'घरात पैसे देत नाहीत तर जेवायला का वाढता? व आजपासून मी पण तुमच्या घरात जेवणार नाही. कारण माझा नवरा जर तुम्हाला पैसे देत नसेल तर मला तिथं जेवायचा अधिकार नाही व मी फार स्वाभीमानी आहे.' नानासाहेब थंडच बसले. मग पोटेंना म्हटलं,' तुम्ही फिल्ड ऑफिसर आहात ना मग हाताखालच्या माणसाकडून कसं काम काढून घ्यावं ह्याचं तुम्हाला ज्ञान नसताना तुम्हाला कुणी फिल्ड आफिसर केलं ?' पाटणकरांना तर मी खुप बोलले. तुम्ही नेमलेल्या एजंटाचं लग्न होवून आता २ - ३ महिने झालेत व अजून आम्ही एकमेकांचे स्वभाव ही ओळखत नसताना मला एकटीला त्यांच्या माघारी बोलवून अशा तक्रारी सांगणं तुम्हाला शोभत नाही. तुम्ही ब्रँच मॅनेजरच्या पोस्टवर आहात व साधं एक एजंटला तुम्हाला ओळखून काम करवून घेता येत नाही? लायकी नसेल तर त्यांची एजन्सी रद्द करा हे मी एक बायको म्हणून सांगत नसून शाळेची शिस्त पाळणारी एक टिचर सांगते. एवढी मी फडा

फडा बोलले व तेथून घरी आले. दारांतच पायरीवर हे दोन माणसासह बसले होते. चंदूरचे दोन क्लायंट आले होते. त्यातला एक दारू प्यायला होता. आधीच मी खुप चिडलेले त्यात दारूचा वास आला. मग मी ह्यांना जोरात विचारल ह्यांच्यात दारू कोण प्यायलं त्यांनी घरातून बाहेर जावं. हे पहातच बसले. मी वर जावून एवढा वेळ आवरलेलं दु:ख, संताप, राग सगळं काही रडण्याच्या हुंदक्यातून बाहेर पडलं. हे वर आले, त्यांनी पाहिलं मी खुप रडत आहे. पण का रडते हे समजेना. ह्यांनी मला विचारलं .पण मी गप्पच. मग वैनींना ह्यांनी वर पाठवलं. वैनींना माहित होतं की मी पोटेंच्या घरी गेले आहे. मग मी त्यांना थोडक्यात काय घडलं ते सांगितलं. त्यांनी माझी समजूत काढली. या गावात असे खुप लोक आहेत, त्यांच्याकडे लक्ष द्यायचे नाही. पण माझ्या मनातून मात्र राग व दु:ख ह्यांच संमिश्र रसायन जे तापले ते शांत होईना. उलट सुलट विचार करून डोकं जास्तच भणभणायला लागलं. तेवढ्यात वैनीनी तम्मा स्वामीची बायको मला बोलवणं पाठवलं. मी जरा फ्रेश होवून त्यांच्याकडे गेले. तिथ खाणं पिणं झालं. नानासाहेब ८ वाजता बोलवायला आले. मी जेवणार नाही म्हटल्यावर त्यांनी आग्रह केला. मी थोडा भात खावून ९ वाजता झोपायला गेले. हे माडीवर गंभीरपणाने विचार करत बसले होते. ह्यांनाही खुप वाईट वाटलं असणार. मग ह्यांनीच मला विचारलं तुला जे त्यांनी सांगितलं त्याच्यावर तुझा विश्वास आहे का ? मी म्हटलं तुम्ही खरं काय ते सांगेपर्यंत तरी आहे. मग मला दोन तास ह्या प्रकरणाची कहाणी सांगितली. साहेबांनी बँकेतून कर्ज घेतलं होतं. त्याला हे जामीन होते व ते आल्यावर ते बरंच कर्ज काढणार होते व त्याला जामीन म्हणून ह्यांची परत सही मागत होते व ह्यांना जामीन राहायचं नव्हतं. बँक मॅनेजर मित्र होता. तो ह्यांना पैसे भरले की सांगणार होता व म्हणून हे बेळगावला येवून राहीलं होते, पैसे भरलेले त्यांनी कळवले व मग आम्ही इथं आलो. पण साहेबांनी नानासाहेबांना बँकेत ६० हजार भरायचे आहेत. ते नाही भरले तर घरावर जप्ती येते असं सांगितल्यामुळे ते चिडले होते. खरे पैसे भरलेत हे यांना माहित, तसं सांगितल तरी नानांना पटत नव्हतं. म्हणून पोटेच्या घरात सर्वांना म्हणजे नानासाहेब, मी व यांनाही बोलवून त्रास द्यायचा व यांचेकडून सही घ्यायचा त्यांचा विचार होता. हे आलेच नाहीत व मी गेले व या सर्व प्रकरणाचा मला त्रास झाला याबद्दल ह्यांनी माफी मागितली. मग आमचे असे ठरले की, आपण दुसऱ्या दिवसांपासून पोटेंकडे नेहमीसारखे जायचे, गप्पा मारायच्या. मी गेल्यावर पोटे वैनी म्हणाल्या,'मग काय रात्री भांडण वगैरे झालं का ?' मी म्हटलं,'भांडू कशाला? खरं काय ते विचारलं समजलं. गैरसमज संपला.' पोटे यांना



म्हणाले,'मग काय बायको चिडली असेल ना? हे म्हणाले,'बायकोने तुम्हाला चांगली उत्तर दिली हे पाहून मला आनंद झाला व मी खुलासा केल्यामुळे चिडण्याचा प्रश्नच नाही.'

तुम्हाला काय मला सुध्दा खुप नवल वाटतंय की, जवळ जवळ एक वर्षात मी कुणाबद्दल काहीही लिहलं नाही. असं का झालं? मला वाटतं माणसाचं मन अस्वस्थ असलं की, त्याला काही करावं असं वाटत नाही आणि त्याला कारणं ही तशीच होती. एवढचं काय माझ्या आवडीचा छंद म्हणजे वाचन. ते सुध्दा या वर्षात मी केलं नाही. दिवाळीचा आई, कथाश्रीचा विशेषांक सोडला तर मी काहीच वाचलं नाही. पेपर वाचन फार फार तर कोडं सोडवणं एवढं सोडून मी काही केलं नाही. कोडी सोडवते पण माझ्या आताच्या आयुष्यात पडलेली कोडी मात्र सुटत नाही. आपण आई म्हणून मुलांना नीट वाढवलं असं मला वाटतं. पण मुलांच वागण पाहीलं तर तसं समाधान होत नाही. मी माझ्या आयुष्यात कुणाकडूनही पैसे घेतले नाहीत व मला वाटतं की, माझ्या मुलांनी पण आपल्या आयुष्यात असेच वागावे, असे वाटले तरी घडत नाही व त्यांचं वागण मला पटत नाही. पैशामुळे नाती तुटतात. वाकडेपणा येतो व हेच वर्षा व बाळूच घडले. अर्थात मी परत परत सांगूनही वर्षा निवडणूकीला उभी राहीली. अर्थात तिला बाळू अकबर व मनोज खेडकर यांनी पाठींबा व पैसे दिले नसते तर वर्षा निवडणूकीत उभी राहीली नसती व पुढचे रामायणही घडले नसते. दोघांनी पण माझ ऐकलं नाही. हल्ली खरं म्हणजे मी कुणाला सल्ला देत नाही. पण ह्यातून चांगल घडणार नाही माहिती होतं. म्हणून मी बोलले पण वर्षानी पैसे घेतले व बाळूने दिले व त्यातून कशातून काय वाद झाला मला माहित नाही. पण एप्रिलला एक वर्ष होतंय ते एकमेकांशी बोलत नाही. माणसांनी आधी गुंतू नये आणि मग कुंथू नये त्यात चूक दोघांची पण आहे. त्यामुळे मी या विषयावर कुणाशीच बोलतं नाही व त्याचा त्रास आतल्या आत मला होतो. म्हणून ११ महिने सहन करून आज मी कागदावर उतरवून सरस्वतीला सांगत आहे. तो फोटो पण आता माझ्या रुममध्ये नाही, पण डोळ्यासमोर आहेच ना ?

मी मागं एकदा लिहिलंय की, वर्षे जातात पण नुस्ती न जाता आठवणी ठेवून जातात. २००१ साली निवडणुकीचा गोंधळ व मानसिक त्रास. कारण राजकारण म्हणजे सर्वात घाण विषय. निवडणूका संपल्या, वर्षा हरली. अर्थात यात काही फार नवल घडलं नाही. कारण समाजाला चांगलं व वाईट हे ६० वर्षे स्वातंत्र्य

मिळूनही समजलं नाही. कारण राजकारणी लोक समाज सुधारणा किंवा समाजात शांतता व सुख कसे नांदेल याचा विचार न करता नुस्ता स्वार्थ बघतात. अर्थात नेताच जर अविचारी स्वार्थी असेल तर जनता पण तोच आदर्श ठेवते आणि त्यामुळेच राजकारणात सगळे गुंड, स्वार्थी व नालायक लोकच असतात आणि त्यात पडणे म्हणजे दगड मारून चिखल उडवून घेणे. असो, या निवडणुकीचा परिणाम मात्र आमच्या कुटुंबात झाला व ज्या वर्षानी भाऊ पाहिजे म्हणून राखी पौर्णिमेला रडून गोंधळ घातला व त्यांनी तिला नेऊन संजीव (स्वामीला) राखी बांधायला लावली व त्यानंतर तिला भाऊपण मिळाला. पण एप्रिलच्या (२०१०) पासून त्यांचे बोलणे बंद आहे. त्यामुळे ९ व १० दोन्ही वर्षे चांगलीच लक्षात राहिली. आता २०११ साल तर जानेवारीपासूनच मला वाईट घटनांनी फेरा धरायला सुरुवात केली. डिसेंबर १५ ला मेघानी नोकरी सोडली. अर्थात मला फारसे पटलं नाही. असो. प्रत्येकजण आपल्या विचारानी वागतो. कारण स्वतंत्र भारतात जन्मलेली पिढी आमच्या प्रमाणे मोठ्यांचा सल्ला वा ऐकणे या गोष्टीपासून जरा लांबच. असो. मेघानी स्वत:चा दवाखाना जानेवारीतच सुरू केला. त्यानंतर २६ जानेवारीला माझी मोठी बहीण आंबू जवळ जवळ महत्त्वाची वर्षे जिच्या घरात घालवली ती वारली. अर्थात पिकलं पान गळणारच. पण दु:ख हे होतचं. त्यानंतर नाडकर्णी (मिस्टर) या महिन्यात गेले. इच्छा असूनही मला बाईंना भेटायला जाणे जमत नाही याचे वाईट वाटते. आज वर्षाचा वाढदिवस. तिला फोन केला. पण बाळू व ती बोलत नाहीत याचे जास्त वाईट वाटले. मी टी.व्ही. पाहताना वेलणकरच्या तोंडातले वाक्य ऐकले व पूर्ण पटले. माणूस तरूण असताना हाल, अपमान, दु:ख सर्व काही सहन करू शकतो. पण वय झाल्यावर या गोष्टी सहन करायची ताकद कमी होते, म्हणण्यापेक्षा रहातच नाही हे अगदी खरे आहे. पूर्वी मी खूप श्रम केले, खूप अपमान सहन केला. दु:ख तर खूपच भोगली पण आत्तासारखी मी खचून जात नव्हते. येणाऱ्या प्रसंगांना धाडसाने तोंड देत होते. पण आता कुणी जोरजोरात बोललं तरी मला घाबरायला होतं, अंग थरथरतं. सोसून सोसून त्राण संपलेल्या शरीराला काहीच सहन होत नाही. म्हणून या वयात कुणाच्याही उसाबरी करण व कशातही लक्ष घालून सल्ला देणं मी सोडून दिलंय व मला वाटतं त्यामुळेच मी आहे त्यात सुखी आहे. आत दोन महिन्यात ७६ वे वर्ष लागेल. कशाला सुख-दु:खाच्या व्यापात पडून त्रास करून घ्यायचा असं म्हणून मनाला समजावते व माझ्यापरीने जास्तीत जास्त चांगला वेळ कसा जाईल याकडे लक्ष देते. मी वागते ते बरोबर आहे ना ? बरेच जण मी अलिप्त राहाते असं



म्हणतात. पण मला कशातही गुंतण्यापेक्षा अलिप्त रहाणेच योग्य वाटले. आंबू गेल्यावर मात्र ८-१५ दिवस त्या घरातल्या आठवणींनी मन भरून येत होते. मी त्या घरात किती सुखे व श्रीमंती भोगली ते मलाच माहित. अगदी सिनेमाला सुद्धा दमणी किंवा टांग्याशिवाय जात नव्हते. फ्रॉक तर कुणीही घरात घातले नाहीत असे सुंदर सुंदर फ्रॉक मला सणाला शिवायचे. कारण शोभा व प्रकाश, अरूणा लहान. त्यामुळे त्यावेळी माझे उषाच्या (मुलगी) बरोबरीने लाड व्हायचे. खाण्यापिण्याला तर ददाद नाही. तिथल्या खाण्यापिण्याने माझे मन तृप्त झालेले आहे. मुळात समाधानी स्वभाव व त्यात परत भरपूर समाधान त्या घराने मला दिले. पण प्रकाशची अवस्था पाहून वाईट वाटले. त्याला खूप बजावले. फोनवर पण रागावले, बघू काय करतो ?

आज अरूणाचा फोन आला. तिला आईची खूप आठवण झाली म्हणून तिने मावशीला म्हणजे मला फोन केला. खूप गप्पा मारल्या. तिचं मन माझ्यासमोर व माझं मन तिच्यासमोर मोकळं केलं. नाही तरी अंबू गेल्यापासून मला त्या घरची व पूर्वीच्या आठवणींनी गर्दी केली होतीच. त्यांना वाट मिळाली. आमची अंबू स्पष्ट बोलणारी असल्याने तिच्या मनात काहीच राहात नसे. पण काही वेळेला माणसे दुखवली पण जायची. त्या दुखावण्यातून माझे तिचे बरेचदा भांडणही व्हायचे. पण ती परत सर्व विसरून चांगल वागायची. माझं मात्र उलट होतं. मी सहसा दुसऱ्याला लागेल असं बोलायची नाही व कुणी मला लागेल असं बोललं तर पटकन् विसरतही नसे. एकूण काय मी दुसऱ्याच्या मनाचा विचार करून बोलायची व ती मनात आले की बोलून टाकायची. असे विरुद्ध स्वभाव असूनही मी तिथं १२ वर्षे मजेतच होते व त्याला कारण मामा. ते स्वभावाने खूपच सरळ चांगले व हुषार. ते आम्हा दोघींनाही चूका समजावून सांगायचे. ते म्हणायचे शांती कमी बोलते पण पक्की आहे व तू उगाच बडबड करून वाईट होतेस आणि हे खरचं होतं. आंबू व बापू दोघांचा स्वभाव फाडकन् बोलून वाईटपणा घेतील पण मनाने मात्र खूप चांगले. तोच स्वभाव आमच्या वर्षाला आला आहे. वर्षा पण फटकन् बोलते. ते कुणाच्या मनाला लागेल याचा विचार करत नाही. त्यांच्या मनात काही रहात नाही. पण दुसऱ्याचे मन दुखावते व याचे भान आंबूलाही रहात नव्हते व वर्षालाही रहात नाही. पण मला तर असं वाटतं की. शक्यतो माणसाने दुसऱ्याच्या मनाचा विचार करूनच बोलावे, कारण हत्यारापेक्षा शब्दाचा मार जो असतो, जो घाव होतो तो बरा होत नाही. म्हणूनच म्हण आहे की, तलवारीच्या हत्यारापेक्षा जिभेचे हत्यार जपून वापरावे. पण सर्वांना हे शक्य होत नाही आणि मग घराघरातून ताणतणाव निर्माण

होऊन घरातली शांतता भंग पावते.

दोन दिवसात लिहिणं जमलं नाही. नाडकर्णी बाईंना फोन केला. पण अजूनही त्यांच्याशी बोलण्याचे समाधान झाले नाही. नाडकर्णी जावून आज १०-१२ दिवस झाले. निलूशी बोलले (मुलगी) पण बाईंच्या बरोबर बोलण्याचे समाधान मिळालं नाही. असो खरं तर बाई खूपच नशीबवान. त्यांना एवढी वर्षे पतीची साथ मिळाली. एकत्र रहाता आलं. आत्ताची एक-दोन वर्षे सोडली तर बाई तशा सुखी होत्या. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या नाडकर्णी सोबत होत्या. हे समाधान फार मोठं असतं. ज्यांचे संसार अर्ध्यावर सोडून साथीदार निघून जातो, त्यांचे दु:ख काय असतं ते माझ्याशिवाय कुणाला माहीत असणार? याबाबतीत बाईंना अगदी पतवंड होईपर्यंत त्या जोडीने राहिल्या यातच समाधान मानायचं. माणसाला काय किती आयुष्य असलं तरी ते हवचं असतं. पण नाडकर्णी आता आजाराला कंटाळले होते. त्यामुळे ते गेले हे जरी वाईट झालं तरी ते मनाप्रमाणे जगून गेले यात मोठं समाधान आहेच ना? मला बाई म्हणजे माझ्या बहिणीपेक्षाही प्रिय आहेत. त्या व मी ५० वर्षे एकमेकांना चांगलं ओळखतो व सुखदु:खात साथ देत आहोत. माझ्या नोकरीच्या सुरुवातीलाच मला चांगल्या हेडबाई मिळाल्या हे माझं नशीब चांगलं होतं म्हणूनच. ५८ सालापासून आजपर्यंत आमची मैत्री कायम आहे. त्यांनी मला नोकरीमध्येसुद्धा खूप मार्गदर्शन केलं. ऑफिशियल कामं शिकवली व मुख्य म्हणजे सच्चेपणाने काम केल्याने काय समाधान मिळतं हे मी त्यांच्याकडूनच शिकले. कर नाही तर डर नाही व या सर्वांमुळेच मी ५-६ वर्षे हेडचं कामही चांगल्या तऱ्हेने व बिनधास्त सांभाळू शकले. वर्षाचे बाबा गेल्यावर तर त्यांनी मानसिक आधार खूप दिला. मी खाण्याकडे दुर्लक्ष करते म्हणून त्या स्वत:च्या घरी नेऊन खायला लावायच्या. अशी आधार देणारी माणसं होती म्हणून मी दु:ख पचवून परत चार मुलांना वाढवायला ताठ उभी राहिले. पण त्यांच्या दु:खात त्यांना समजावयास व समाधान देण्यास जावू शकत नाही याचे वाईट वाटते.

आज १ मार्च २०११ उजाडलं. फेब्रुवारीतील सर्व मानसिक त्रासातून आज जरा बाहेर पडले. आता मी परत १९६६ सालच्या एप्रिल महिन्यात आले. मी यांच्याबरोबर ही सुट्टी मजेत घालवायची, खूप फिरायचं ठरवलं होतं, पण माझं जरा नेहमीचंच ठरवलेलं सगळं विस्कटतं तसचं झालं. आल्या आल्या काय घडलं ते मी सांगितलंच ना ? पुढे मला डोक्यात सारखे तेच विचार व यांच्या साहेब व पोटे यांच्या वागण्याचं कारण, घरातले वातावरण, वर वर पोटेकडे जाणं, गप्पा मारणे मला नको झाले व प्रकृतीपण बिघडली. त्यामुळे मी यांना मला सांगलीला



सोडा म्हंटलं. यांनी पण नाही वगैरे न म्हणता राम वाईकर (मित्र) यांच्या सोबतीत सांगलीला पाठवलं. तिथं जरा बदल झाल्यामुळे बरं वाटलं. पण प्रकृतीतला बिघाड कमी झाला नाही. मग डॉ. दाखवून झाले व त्यांनी मला काविळ जास्त प्रमाणात झाल्याचे सांगितले. औषध इ. सुरू झाली. मामांनी ह्यांना बोलावून घेतले. हे विलासला घेवून आले. तो सांगलीतच इंजिनिअरींगला होता. मला येऊन ५-६ दिवस झाले होते. मी सांगलीत रहाणे विलासला व ह्यांनाही पसंत नव्हते. अशक्तपणा बराच होता व घर वर-खाली. मग विलासनी आपणाला सुट्टी आहे, मी तुमच्याबरोबर राहून काळजी घेईन असे सांगून मला दोघांनी मिळून कुरूंदवाडला आणले व म्हटल्याप्रमाणे विलासनी व ह्यांनी माझी खूपच काळजी घेतलीच पण वैनींनीसुद्धा माझे पथ्यपाणी व खाण्यापिण्याची प्रेमाने काळजी घेतली. औषधे सांगलीच्या डॉक्टरची सुरू होती. पण म्हणावी तशी आजारात सुधारणा विशेष नव्हती. त्यात कुरुंदवाडच्या उन्हाळाने मला जास्तच त्रास सुरू झाला. म्हणता म्हणता सुट्टी संपत आली. पण आजार संपेना. शेवटी मी म्हंटलं आपण मुदलगीस जाऊया. आण्णांचे पण पत्र आलेच होते. पण हे प्रथमच मुदलगीस येणार होते. त्यांना वाटत होतं आपल्यामुळेच मी आजारी पडले. प्रकृती बरीच उतरली होती. जेवण जात नव्हते व अशा परिस्थितीत मुदलगीस जाणे यांना अगदी नकोसे झाले होते. पण हो नाही करत मी व हे मुदलगीस निघालो. मे ची ८-१० तारीख असावी. ५-६ दिवस राहिलो. तोपर्यंत शाळा सुरू व्हायची तारीख २२ मे जवळ आली. मग १७-१८ तारखेस मी व हे बेळगावला आलो. पण शाळेत जावून ड्युटी करण्याएवढी माझी प्रकृती चांगली नव्हती. त्यामुळे मी एक दिवस हजर झाले व एक महिन्याची रजा टाकली. कामही करवत नव्हतेच. अर्थात सोबत विजय होता व काही दिवस हेपण हेते. तिथं गेल्यावर थंड हवेमुळे व डॉ. दीक्षित यांच्या औषधाने मला बरे वाटू लागले. अंगात थकवा होताच. ह्यांनी मंगलला (पुतणी) आणलं. थोडी मदत करेल म्हणून. पण तिला काही येतच नव्हतं. मला म्हणायची,' चूल पेटवून द्या. मला फुंकता येत नाही.' असो तशाच अवस्थेत मला स्वयंपाक करावा लागला. कुणाला सांगणार ? रजा संपली. शाळेला जावू लागले. मंगलला बेळगावला शाळेत घातली. ८ वी ला आता भावंडाच्यानंतर सासरच्या मुलांची जबाबदारी व सेवा सुरू झाली. विजय माहेरचा, मंगल सासरची आणि मी व मधून मधून हे असे बेळगावचे घरातले वास्तव्य सुरू झाले. जुलै उजाडला. पण जेवण जातच नव्हते व प्रकृतीपण सुधारत नव्हती. परत डॉ. दीक्षितना दाखवलं व त्यांनी मी आई होणार असं सांगितलं. अर्थात आनंद झाला. पण ५-६ महिन्याच्या

त्रासाने मी हैराण झाले. त्यात मंगल व विजयचे पटायचे नाही. विजय आता बीएस्सी ला होता. मी समजावून सांगायची. पण दोघेही आडमुठे. नातं विचित्र. असो. फेब्रुवारीत वर्षाचा जन्म झाला, तेव्हाही गोंधळच. राजा व मामी एक महिना अगोदर आले होते. हे राजाला सोडायला मुडलगीस गेले. तसेच कुरुंदवाडला जाऊन येतो म्हणाले व डॉ. कित्तूरकडे नाव घातले. ती पुण्याला गेली. घरात मंगल, मामी व विजय. बराच त्रास झाला. डॉ. चा नवरा डोळ्याचा डॉ. मग कोडकिणी डॉ. आले व त्यांनी माझी डिलिव्हरी केली. जन्मली तेव्हा वर्षा रडलीच नाही. मला वाटलं काहीतरी झालं, पण डॉ. नी तिला कोऱ्यापिन दिल्यामुळे ती शांत झोपली होती. वर्षा जन्मली तेव्हा डॉ. म्हणाले, हिचे बाबा खूप गोरे आहेत का?. कारण वर्षाचे वजन साडेआठ पौंड. त्यामुळे ती खूपच सुंदर दिसायची. कुरळे केस भरपूर व गोरा रंग. वजनामुळे २-३ महिन्याचीच वाटायची. तिसऱ्या दिवशी तिला थोडा ताप आला व ती बारीक वाटू लागली. हे दुसऱ्या दिवशी आले. गांगोट करांनी मात्र खूप मदत केली. कारमधून दवाखान्यात सोडलं. डॉ. फोन करून दुसऱ्या डॉ. बोलवायला सांगितलं. दीक्षित डॉ. तर स्वत: दोनदा येवून गेले. मामी (आई) मात्र खूप घाबरली. शेवटी आंबूला फोन केला. ती आली व वर्षाचा जन्म झाला. ह्यांना तर खूप आनंद झाला. कारण प्रेम काय असतं, काळजी काय असते या गोष्टी त्यांना मुलीच्या जन्मानेच समजायला लागल्या. कारण त्यांनी आई-वडिलांचे प्रेम कधी पाहिले नव्हते, अनुभवले नव्हते. ह्या बाबतीत आम्ही दोघे म्हणजे दोन टोकं होतो. माझा स्वभाव हळवा, काळजी करणारा व ह्यांचा बरोबर उलटा. ह्यांनी आयुष्यात कधी कसली काळजी केली नाही. काहीही संकट असले तरी शांत झोपणार व माझे उलटे. कोणत्याही गोष्टीबद्दल मी जास्त काळजी करत असल्यामुळे मला झोप येणं कमी. ह्यांचं म्हणणं काळजीने त्रास सुटत नाहीत, मग झोपमोडं करून काळजी कशाला करायची त्यापेक्षा झोप भरपूर घेवून प्रश्नांना तोंड द्यायला सज्ज व्हायचे. पण प्रत्येकाचा स्वभाव वेगळा पडला. मला काळजी करू नको म्हटलं तरी जमणार नाही व ह्यांना काळजी करा म्हटलं तरी जमणार नाही. असो काही का असेना हे गावात नसायचे म्हणून व काळजी करायची सवय म्हणून मुलांना लहानाचे मोठे करण्यात माझाच वाटा जास्त हे सांगायची गरज नाहीच.

आज महिला दिन. जगातील सर्व महिलांचा वाढदिवस. रूपाचा फोन आला व मी वर्षाला व तिच्याबरोबर आलेल्या साताऱ्याच्या बायकांना शुभकामना दिल्या. वर्षाच्या जन्माबद्दल मी सांगत होते. ता. २३ फेब्रुवारी १९६७ हा दिवस मी कशी विसरेन? कारण जगातले सर्वात सन्मानाचे व पवित्र नाते आई व मूल याचा



अर्थ मला त्यादिवशी कळला. खरचं आई झाल्यावर आईचं महत्त्व जास्त समजत. माझी आई मी मुडलगीस गेले नाहीतर का रडायची ते मला आता कळत होतं. मुलं कितीही असली तरीही सर्वांवर सारखीच माया करते. मुलांचे गुण व दोष आईला समजतच असतात. त्यांचे दोष सुधारून त्यांना आदर्श बनविण्यासाठी आईची कशी खटपट चाललेली असते ते आई झाल्यावरच कळते. वर्षाच्या बाळलीला पाहता पाहताच अजून वर्षा बाळच होती व पावणे दोन वर्षातच म्हणजे २९ सप्टेंबर १९६८ ला आमचे दुसरे कॅलेंडर मेघाचा जन्म झाला. हे ह्या दोघींना कॅलेंडर म्हणायचे कारण ६७ व ६८ अशी साल होती ना म्हणून. ह्या दोघींना मोठं करायचं म्हणजे मला जुळ्या मुलीच झाल्या आहेत असं वाटायचं. वर्षाला सांभाळायला सुरूवातीला एक वर्ष सत्तूबाई होती. ती सर्व खूप प्रेमाने करायची. वर्षाला तर जीवापलिकडे जपायची. मग एक वर्षानंतर शिरपाची मुलगी विमल म्हणजे सत्तूबाईची नात आली. ती १० वर्षांची असेल पण दोन्ही मुलींना प्रेमाने सांभाळायची. अर्थात मी दुसरे काही काम त्यांना लावत नसे. कपडे धुणे, स्वयंपाक, नोकरी व मुलांचे खाणे-पिणे मी स्वत:च पाहायची. भांड्याला बाई होती. सामान आणणे महिन्यातून एकदाच. ते काम ह्यांचे. आमचे सरकार काय महिन्यातून १५-२० दिवस फिरतीवर म्हणजे कोल्हापूर-कुरुंदवाड असेच बाहेर. त्यामुळे नकळतच जबाबदारी माझ्यावरच जास्त पडायची.

माझे असेच होते. मूड आला तर लिहायचे नाही तर मग माझे व पेनचे नाते राहात नाही आणि आता जरा थकल्यासारखेही वाटते. ३ ता. पासून मी रसायनीत आले आहे. आता एक दोन महिन्यात मेघा रसायनी सोडून जाणार व मग मी रसायनित राहू शकणार नाही. जसे मला कवठेमहांकाळ, बेळगाव व तिसरा नंबर रसायनी. ही गावं माझ्या आयुष्यातली आवडीची गावं. धावपळ, गडबड, गोंगाट, गर्दी व खूप पैसा यापासून मला लांब रहावेसे वाटते. दोन दिवसांसाठी गावाला जाणे, घरात वादावादी, खूप धांगडधिंगा, गाणी, जत्रा व गर्दीतून देवदर्शन या गोष्टी मला अजिबात आवडत नाहीत. त्यामुळे माझे देवळात जाणे खूपच कमी म्हणण्यापेक्षा नाहीच. सध्या आमच्या घरात माझी पंचाहत्तरी करायची चर्चा चालली आहे. अर्थात मला या गोष्टी खूप आवडतात असे नाही. पण काही गोष्टी दुसऱ्याच्या समाधानासाठी कराव्या लागतातच ना ! मुलांना वाटते मग छोटासा कार्यक्रम घरगुती करायला हरकत नाही. पण उगाच लोकांना बोलवा आहेर करा- द्या या गोष्टी मला नकोच वाटतात. आता तर मी बाजारात जावू शकत नाही त्यामुळे मी कुणालाही पैशाशिवाय काही देवू शकत नाही. पूर्वीचे दिवस आठवले

की मी सर्व कसं निभावलं ह्याचं खूप नवल वाटतं व मी माझी मीच पाठ थोपटून म्हणते, व्वा उर्मिला, लक्ष्मणाच्या माघारी तू संसाराचा गाडा त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करत व्यवस्थित हाकलात. धन्य तुमची ! पण आता आता मात्र कोणत्याच गोष्टी सहन होत नाहीत. खूप गप्पा माराव्या असं वाटतं पण माणसं मिळत नाहीत. या मुंबईत भरपूर माणसं रहातात अगदी मुंबई वाहून जावी इतकी माणसं आपापल्या कामात, नादात असतात. ते दुसऱ्याला आपला वेळ देवू शकत नाहीत. त्यातल्या त्यात म्हाताऱ्यांना द्यायला तर वेळ खूपच कमी असतो. इथं व्यस्त प्रमाण आहे. म्हाताऱ्या लोकांकडे खूप वेळ असतो व इतरांकडे वेळ खूप कमी असतो व या व्यस्त प्रमाणामुळे म्हातारी माणसं कंटाळून जाणारच ना ?

२४ मार्च नंतर आज वहीला हात लावावा असं वाटलं. कारण आज गुरुपौर्णिमा. आज काहीतरी थोडं लिहिलचं पाहिजे नाहीतर मी गुरुजनांचा अपमान केल्यासारखे होईल. असो आणि दुसरं कारण म्हणजे आज रूपाचा वाढदिवस. एवढे दिवस का लिहिलं नाही याची कारण बरीच आहेत. त्यात मुख्य म्हणजे मनस्वास्थ्य व गडबड. मेघाचे घर बदलणे, मग त्या नवीन घरात १५-२० दिवस रहाणे, म्हणता म्हणता मे महिना आला. मग साताऱ्यात रूपाकडे नवीन घरात छोटासा माझ्या ७५ व्या वाढदिवसाचा कार्यक्रम. मग जून सुरू झाला. पण तोही न लिहिताच गेला. का कोण जाणे मला हल्ली पूर्वीप्रमाणे काहीच करावे वाटत नाही. उत्साहच नाहीसा झालाय व आपण कशासाठी व कुणासाठी जगतोय असे मधेमधेच मनाला वाटून जाते. या २-४ महिन्यात सरकारांची पण खूप आठवण येते. ते जावून एवढी वर्षे झाली पण मला इतकं एकाकी कधीच वाटलं नाही. आत्ताच असे का होते कळत नाही. असो जीवनगाणे गातच जावे.

रूपाचा जन्म १५ जुलै १९७० म्हणजे ती सुद्धा ४१ वर्षाची झाली. त्यादिवशी आषाढी एकादशीच होती. पंढरपूरला वारी पोचली. टाळ मृदुंगाचा पंढरपूरात जयघोष चालला होता. अशा गजरात डॉ. कुलकर्णी व पद्मजा विठोबा का रखुमाई म्हणत जी. आर. च्या दवाखान्यात माझ्याजवळ बसल्या होत्या. कारण मामी या खेपेला आली नव्हती. पद्मजा आली होती बाळंतपणाला. मला तर विठोबा हवा होता पण रखुमाईच जन्माला आली. मला थोडसं वाईट वाटलं. पण पद्मजा म्हणाली आता ही मुलगी मला देऊन टाका. तुम्हाला दोन्ही आहेत व तेव्हा तिला अजून मुलं झाली नव्हती. ह्यांना मात्र काही फरक पडला नाही. शाळेतून टीचर आल्या. नाडकर्णी बाईंनी आळिबाचे लाडू करून आणले होते. रूपाचं बारसंसुद्धा थाटात केलं. पद्मजा व मी बाळाला घेवून देवाला जावून



आलो. समादेवीच्या देवळात मी रूपाला पद्मजाकडे दिलं. त्यानंतरच तिला संजीव झाला. मला रूपानीच प्रसाद दिला असं ती म्हणायची. मी १-२ महिने मुदलगीस गेले. परत विमलकडे बाळाला ठेवून माझी शाळा सुरू झाली. खरंच शिरपाच्या मुलीमुळेच मी नोकरी करू शकले. त्याच्या मुलींचा मला खूप उपयोग झाला. मुख्य म्हणजे त्या मुलींचं खूप प्रेमाने करायच्या. रूपा झाल्यावर जरा वाईट वाटलं. पण आता मात्र सर्वांत रूपाशीच जास्त जमतं. अगदी रोज फोन केल्याशिवाय चैन पडत नाही. कारण रूपा व मी ह्यांच्यानंतर जास्त वर्ष एकत्र होतो. त्यामुळे माझ्या सर्व सुखदु:खात तीच जास्त वाटेकरी असायची. त्यामुळे तिच्याजवळ मला मनातलं बोललं की बरं वाटतं व तिचा स्वभावही मला जसा हवा तसा आहे. ती सर्वांच्या सुखदु:खात सहभागी होत असते. सासरची माणसंही तिच्यावर तेवढचं प्रेम करतात. सर्वांशी गोड बोलून, सर्वांना लावून घेवून असते. सदा हसतमुख व आनंदी रहाते. तसा तिला कुठलाच त्रास नाही असं नाही. पण सर्व गोष्टी सहन करून दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणं हा तिचा स्वभाव मला आवडतो. ती मुलांच्यावर किंवा कुणावरही पटकन् चिडत नाही आणि या सर्वांमुळे मला ती आवडते. लाडकी वगैरे काही नाही पण तिला घरात आनंदी वातावरण असावे असे वाटते. मला ह्या वयात मनाला त्रास होईल असे कुणी वागू नये असे तिला नेहमीच वाटतं. असो अशी रूपा, वर्षा व मेघा या मुलींचा सांभाळ करत नोकरी सुरूच होती. सरकार मधेमधे असायचे. मात्र मला बाजारात कधी जायला लागले नाही. भाजी व्यतिरिक्त मी काहीही आणत नसे.

वर्षा चार वर्षांची, मेघा दोन वर्षांची व रूपा बाळ अशा छोट्या पिल्लांना सोडून मी शाळेत जायची. विमल मात्र मुलींना छान सांभाळायची. मात्र मी विमलला कुठलेच काम लावत नसे. अगदी तिचे कपडेसुद्धा मी धुवायची. आमच्या मुलांप्रमाणेच तिला मी जपायची. खाण-पिणं, कपडे सर्वच बाबतीत मी भेदभाव करत नसे म्हणून तर ती ४-५ वर्षे राहिली. ती मोठी झाल्यावर मात्र आम्ही तिला पाठवून मग निर्मलला आणली. निर्मलला सवय व्हावी म्हणून विमल थोडे दिवस राहिली. एवढं सर्व होईपर्यंत रूपा २ वर्षांची झाली. रूपाला ३ वर्षे संपली व बाळूचा जन्म ७३ साली झाला. त्यावेळी घरात निर्मल होती. पण बाळंतपणाला यायला कुणीच नव्हते. कारण त्याचवेळी पद्मजापण दिवसांत होती व तिचे बाळंतपण सासरी म्हणजे मुदलगीस होणार होते. त्यामुळे मामी (आई) येणार कशी ? व मला खूप भीतीपण वाटत होती. कारण ७१ साल असावं, माझी बहिण लीलाचा मृत्यू झाला व तेही बाळंतपणात. तिनं बाळाला पाहिलंसुद्धा नाही. सर्व

भावंडात माझी ती लाडकी बहीण होती. त्यामुळे मला दवाखान्यात जायचे म्हणजे डॉक्टरांची भीतीच बसली. मग मी रोडवरच इंदूबाई जोशी ह्या नर्सचा दवाखाना होता, तिथचं नाव घातलं व मामी २ दिवस आधी आली. मी गावातले गणपती बघायला गेले रविवारी व मामी गावाहून येवून शेजारी बसली होती. मला रजा नव्हतीच. सोमवारी बरे नाही म्हणून रजा घेतली. बाहेर डोसा खाण्याचे निमित्त होवून मेघाला कावीळ झाली व अशा गोंधळात सोमवारी पहाटे म्हणजे मंगळवारी अनंत चतुर्दशीलाच जन्म झाला. मुलगा झाला म्हणून सर्वांनाच खूप आनंद झाला. मामी तर 'मुरर म्याल मुत्त' असं कानडीत म्हणायची. तिनं त्याला अनंत नाव पण ठेवलं.

मी ५ व्या दिवशीच घरी येणार होते. पण घरात विश्रांती मिळणार नाही म्हणून १० दिवस दवाखान्यातच ठेवलं. ११ व्या दिवशी पहाटे घरी चालतच आले. कारण दवाखाना जवळच होता. तोपर्यंत बारशाची जय्यत तयारी ह्यांनी केली होती. सांगलीहून इंदू, मामा तसेच राम भाऊजी व वैनी बारशाला खास आले होते. मेघा खूप सिरीअस होती. आता तीपण बरी झाली. पण ह्यांनी संशय नको म्हणून भटजींना विचारून त्याची (बाळूची) पत्रिका करवून घेतली. त्याचे आयुष्यात सर्वच चांगले व्हावे यासाठी भटजींनी शांत करायला सांगितले. म्हणून १२ व्या दिवशी आधी शांत करून मग बारसे केले. जवळजवळ १०० माणसे जेवायला होती. सर्व तयारी ह्यांनीच केली होती. अर्थात इंदू, मामी वगैरे होतेच. बारसे खूपच थाटात झाले. सांगते ना हे खूप हौशी व उत्साही होते. त्यामुळे आमच्या घरातल्या कोणताही कार्यक्रम कमी पैसा असला तरी हौसेनेच साजरा व्हायचा. बारसं झालं व सर्वजण म्हणजे मामी, ह्यांची वैनी व इंदू सर्वजण निघून गेले. माझे बाळंतपण करण्यासाठी कुणीही चार दिवस राहिले नाही. १५ व्या दिवसापासूनच माझी कामाला सुरूवात झाली. मला खरी मदत झाली ती निर्मलची. (सिरपाची मुलगी) तिला मी कुकर लावायला व छोट्या छोट्या भाकऱ्या करायला शिकवून ठेवले. रवा वगैरे भाजून बाळंत व्हायच्या आधीच भाजून ठेवला होता. शक्यतो सर्व श्रमाची कामे करून ठेवली होती. मग २० दिवस माझे बाळंतपण मीच करून घेतले. स्वयंपाक, नाष्टा, मुलांचे व माझे खाणे सर्व मलाच करावे लागे. त्यातच ऑफिसकडून निरोप आला. रजा शिल्लक नाही म्हणून मग मला २० व्या दिवशीच शाळेत जावे लागले. ११ सप्टेंबरचा जन्म. मी ३० तारखेला हजर झाले. मग २ ऑक्टोबरची सुट्टी पडली. पण मी मुदलगीस गेले नाही. घरीच विश्रांती घेत २० दिवस सुट्टीत आराम करून प्रकृती सुधारून घेतली व बाळूला ४५ दिवसाच्या



बाळाला ठेवून मी शाळेत हजर झाले. पण मी त्याचे हाल मात्र अजिबात केले नाहीत. त्याची अंघोळ चांगली व्हायला पाहिजे म्हणून मी ५ महिने त्याला तेल लावून अंघोळ घालायला सुंदरबाईला लावलं होतं. नंतर निर्मलनी त्याच्याकडे लक्ष द्यावं म्हणून सकाळी खास सुंदराबाईच्या मुलीला भाकरी करणं, भाजी व कुकर इ. कामे करायला लावलं होतं. त्यामुळे मी शाळेत जाईपर्यंत त्याचेप ूर्ण वेळ सर्व करून, झोपवून बेबी व मी शाळेत निघायचो. आवारात सर्वच लोक चांगले. त्यातल्या त्यात गांगोटकर कंपनीला तर बाळूचा खूपच लळा होता. जरासा रडण्याचा आवाज आला तरी आबा घरी कुणालातरी पाठवायचे. एकूण काय मी घरात नसले तरी पूर्ण आवाराचं लक्ष त्याच्याकडे असायचं. मी सुरुवातीला दोनदा तरी घरी यायची. नंतर फक्त मधल्या सुट्टीत यायची. त्याच्यासाठी काळ्या गाईचे (कपिला) दूध वावडिंग घालून उकळून ठेवून जात असे. बाटलीने निर्मल त्याला पाजत असे. मी घरात नसतानाच फक्त पाजायची. एरवी मग वरचे दूध अजिबात नाही. तो ७-८ महिन्याचा झाल्यावर उष्टावणं केलं. त्यादिवशी बाळूने तुपाची पूर्ण तांबली आपल्या श्रीखंडात ओतून घेतली. आपल्याला मुलगा व्हावा यासाठी मी नवस फार केले असं नाही. पण नकळत नवस केले गेले. रूपा २|| वर्षांची असेल. बाळूच्या वेळेला मला २-३ महिने झाले होते. चंदूरच्या वैनी मुलांना घेवून बेळगावला आल्या होत्या व ह्यांचे बंगळूरला काम होते. ह्यांना काय लहर आली व म्हणाले मुलांना (वर्षा व मेघा) ठेवून बंगळुरला ४ दिवसांसाठी जावू. रूपाला घेवून हे व मी बंगळूरला आलो. तिथली काम संपत आली व दोन दिवस बंगळूर बंद झालं. मी म्हंटलं, चला आपण तिरूपतीला जावू. पण हे ऐकायला तयार नाहीत. मग म्हणाले बघू. मुलगा झाला तर जावळ काढायला तिरूपतीला जावूया. त्यानंतर मी एकदा शाळेत ऑफिसमध्ये बसले होते. हणमंण्णवरच्या मुलाला पाहून मी म्हटलं याचं नावं विद्या, तर नाडकर्णी बाई म्हणाल्या नाही, त्याचं नाव रायाण्णा. रायाण्णा नावावरून मग रायाण्णाची कथा कळली. तो अंघोळीला गेला असता एका पुजाऱ्याने त्याला इंग्रजांना पकडून दिले व त्याला फाशी झाली. त्याला फाशी देताना त्याने सांगितले की, ज्याने गद्दारी केली त्याचा नि:शेष होईल व जो माझ्याकडे मागणे करील त्याला मुलगा होईल. बाई लगेच म्हणाल्या देशपांडे बाई व निंगण्णवर बाईंना (त्याही गरोदर होत्या.) मुलगा झाला की रायाण्णाच्या झाडाला पाळणा बांधा. मी हो म्हंटलं. अर्थात, मी स्वत: फक्त दहा दिवस डाव्या हाताने जेवीन असं संतूबाईला सांगितलं होतं. कारण कुठे येते वगैरे असलेल्या मागण्या मी कधी करत नाही. कारण त्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. उपवास,

वाचन या गोष्टी आपल्या हातात असतात. पण म्हटल्याप्रमाणे बाळूचं जावळ तिरूपतीला जावून केलं. रायाण्णाच्या झाडाला पाळणा बांधायला मात्र बाळू ५-६ वर्षांचा झाल्यावर योग आला. असो. बाळू एकूणच लहानपणी खूप शांत व त्रास न देणारा मुलगा होता. त्याला कधी मारलेलं, रागावलेलं आठवतच नाही. तसेच खूप लाड केले असंही नाही. रूपा ३-४ वर्षांची असल्यामुळे ती बाळूला खूप त्रास द्यायची. मग निर्मलला ऐकायची नाही. म्हणून ५ व्या वर्षीच रूपाच नाव शाळेत घातलं व शाळेत घेवून जावू लागले. बाळू दीड वर्षांचा असेल, निर्मल चंदूरला गेली. ती परत आली नाही. तिच्याहून मोठी पुतणी होती. पण ती वांड होती. नात्यातले तर कुणी यायला तयार नाही. सर्वांनी सांगितलं आमच्याकडे एक मूल पाठव. मुलांना कुठतरी ठेवून नोकरी करायची नव्हती. यावेळेपर्यंत ह्यांनी आपली एजन्सी बेळगावला बदलून घेतली होती. मग ते ६ ते १० काम करून १०-१५ ला यायचे. मग संध्याकाळी ६ ते ९ परत कामाला जायचे व दिवसभर त्यांना सांभाळायचे. मध्यंतरी मुदलगीहून शैनजला आणलं. चंदूरचीच एक मुलगी आणली. ती खूप घाणेरडी व उवांनी भरलेली व रोज रडायची. एकूण काय कुठलीच मुलगी ठेवायची नाही ठरलं व संसाराचा रथ जमेल तसा हाकत राहिलो. माझी नोकरी टिकून रहायला ह्यांची मला खूप मदत झाली हे मात्र मी कधीच विसरणार नाही. मुलांचे हाल झालेले त्यांना अजिबात आवडत नसे.

आज नागपंचमी. लहानपणापासूनच्या सर्व गोड नागपंचमीच्या आठवणी ह्या पंचमीनी करून दिली. कवठे, सांगली, मुदलगी व बेळगाव या सर्व गावांची आठवण त्यामुळे झाली. कारण जास्त आयुष्य ह्याच गावातून घालवलं गेलं. असो. हे बेळगावात राहायला आल्यामुळे माझे जगणे बिनधास्त झाले. कारण ते नसताना घर, मुले व शाळा सर्व मलाच सांभाळावे लागे. पण आता मात्र ह्यांचा खूप मोठा आधार मिळाला. कारण इकडे तिकडे फिरत रहाणारं संसाररथाचं दुसरं चाकही बेळगावात स्थिर झाले. सामान आणणे हे महत्त्वाचं काम ते करत असल्याने मला फक्त स्वयंपाक, धुणं व शाळा एवढेच काम. मुलंही जरा मोठी झाल्यामुळे त्यांचे आजारपण व त्यांना हवं नको बघायचं कामही कमी झाले. माझ्या मुलांनी मला कधीच त्रास दिला नाही. लहान बाळ असताना नाही व शाळेत जायला लागल्यावरही नाही. त्यांचे जेवण, डबा, वेण्या हे अर्थात करावेच लागे. रविवारी खूप कपडे धुवायचे असायचे. शाळेचे ड्रेस, ह्यांचे कपडे, माझे आठवड्याचे कपडे (बाहेरचे) त्या दिवशी गावात असले तर सरकार मला कपडे वाळत घालायला मदत करायचे व मुलांच्या अंघोळी पाहायचे. रविवार म्हणजे पूर्ण धावपळच वाटे. कारण



दळण, आठवड्याचे तांदूळ निवडणे, एखाद दुसरी कोरडी चटणी करणे व जास्तीचे कपडे धुणे, परत वेळ मिळाला तर कुठेतरी जाणे हे सहसा जमत नसे. हेच मुलांना घेवून जायचे. बाबा घरात रहात असल्याने मूलंपण खूप आनंदात असायची. पूर्वी गावाला गेले की, बाबा केव्हा येणार असे सारखे विचारत रहायची, ते बंद झाले. जरा चारी मुलांना बाबांचा सहवास लाभायला लागला व माझीही जरा सुटका झाली. पंचमी आली की ५ तऱ्हेचे लाडू, लाह्या, लाह्यापीठ हे सर्व मी घरी बनवत असे. ह्यांची सामान आणण्यात काटकसर अजिबात नसते. त्यामुळे खाणे-पिणे मस्त.

आमच्या घरात आता फक्त भांड्याला बाई होती. बाकी सर्व घरातच मुलगी वगैरे परत पाहायचं सोडून दिलं. ६ महिने शैनाज म्हणून मुदलगीची मुलगी आणली. ती पार धर्मवेडी मुसलमान मुलगी भेटली की, मग तिला बोर्नविटा, साखर काय मिळेल ते जाऊन घ्यायची व मुलांनाही विशेष प्रेमाने करत नसे. मुलं म्हणजे तसा बाळू लहानच होता. तिच्या वडिलांनी ६ महिन्याचे पैसे आधीच घेतले होते. बहिणीचं लग्न आहे म्हणून घेऊन गेले. ती परत आली नाही. मी पण बोलावले नाही. म्हणता म्हणता बाळूला चौथे वर्ष सुरू झाले. तो आबा (गांगोटकर) व मिराताईंचा फारच लाडका होता. त्यामुळे तो आवारातच छान राहायचा. आवारातल्या लोकांची मदत ही सुद्धा माझ्या नोकरी टिकवून ठेवायला कारण आहेच. त्यातल्या त्यात शानभागमामी व गांगोटकर यांची मला खूपच मदत व्हायची. मला वाटतं बाळू २० दिवसांचा असताना शानभागमामींचे हार्टचे ऑपरेशन झाले असावे. हे स्वत: पुण्याला जावून त्यांची सर्व व्यवस्था फूकट करून आले. ऑपरेशनही फूकटच. अशी आम्ही एकमेकांना मदत करत वाड्यात एक कुटुंबासारखे रहात होतो. बाळूला शाळेत घातलं तेसुद्धा जवळच्या मराठी शाळेत. अगदी घंटा ऐकू यायची. त्याचे चौथीपर्यंत, त्याचे म्हणण्यापेक्षा माझे खूप हाल झाले. कारण त्याची शाळा सकाळी ८ ते १२ व माझी शाळा ११ ते ५ व घरात कुणी नसायचे. कारण हे पण दिवसभर बहुतेक बाहेरच. मग बाळूला ७ ला दूध देवून शाळेत पाठवायचं व ९-३० ला मधली घंटा व्हायची. तेव्हा जेवण तयार ठेवायचं. घंटा ऐकू आली की भात दही दूध घालून कालवून ठेवायचा. तेवढा खाऊन जायचा. मग त्याचं दूपारचा दूध डबा व थोडा खाऊ पाणी हे सर्व घेवून मला १०-३० ला शाळा गाठायचे. मास्तरना मी सांगून ठेवल्यामुळे ते मोठ्या मुलाबरोबर बाळूला माझ्या शाळाकडे सोडायचे. मग बाळू दिवसभर माझ्या शाळेत कंटाळा आला तर गावातच त्याचे मित्र होते त्यांच्याकडे खेळायचा. पण त्याला सकाळी ७

ते संध्याकाळी ५ शाळेत व घराबाहेरच रहावे लागायचे पण माझा नाईलाजच होता. पण बाळूनी कधीच तक्रार केली नाही.

आज जवळजवळ वर्षाने या वहीला हात लागला. आजतरी मुहूर्त चांगला आहे, गुरुपुष्यामृत. पाहू आता तरी एका सुरात लिहायचा योग येतो का ? प्रत्येक गोष्ट पूर्ण व्हायला वेळ यावी लागते. बघू माझं लिखाणं पूर्ण व्हायची वेळ येते का ? मला खूप खूप लिहायचं आहे. पण मध्येच काही कारण होतं व लिखाणं थांबतं. त्यात माझं सर्व ऐकणारी सरस्वतीपण हल्ली माझ्यासमोर नाही. मग आपण जे सांगतो ते ऐकायला श्रोता हवा ना ! तोच नसल्याने उत्साहच येत नाही. असो.

ता. १७/८/२०१२ मला ७३ वे वर्ष सुरू झाले. तेव्हा गानू मॅडम ह्यांनी मला माझ्याच आयुष्यावर कविता करून मला दिली. ती अशी

सात दशके दोन वर्षे पूर्ण केलीत तुम्ही
दोन दशके आठ वर्षे स्वागतास उभी
कृतार्थ माता सदा करीतसे संस्काराची वर्षा
तिची अपत्ये तिलाच देती कर्तृत्वाचा धडा
ओसंडून जाऊदे घडा हा असाच क्षण अन् क्षणी ।।१।।
वात्सल्याच्या मेघातून त्या भरती संवेदना
तिच्यात न्हाऊन जाई जेव्हा गरीब दुबळी प्रजा
शरीर थकले तरी मनाला कोंब फुटू लागती
लक्ष्मणाच्या उर्मीलेचा त्याग नावाजती
मातृत्वाच्या रूपामध्ये तोच नांदतो जगी
त्या त्यागाची तमा न वाटे संतोषच जन मनी
स्वास्थ्य मनाचे घेवून येवो हर दिन अन् हर निशा
रिद्धी सिद्धी घरात नांदो हीच असे मनिषा
हीच सदिच्छा आज प्रार्थते माझ्यातील उर्मी !!

परत आता जवळजवळ वर्षानेच वहीला हात लावत आहे. आज गुरुपौर्णिमा. आताच नाडकर्णीबाईंना फोन केला. त्या आता ८७ वर्षांच्या झाल्या. पण कुठलाही आजार नाही. आम्हा पूर्वीच्या लोकांना आजार कमीच. त्या माझ्या फोनची सकाळपासून वाट पहात होत्या. २०१२ साल तसे खूपच धावपळीत गेले. म्हणजे पायांची नव्हे, मनाची धावपळ. बाळूने मोठे घर घेतले व त्याची कामे करण्यात ८-१० महिने लागले. मी जवळजवळ नोव्हेंबर १२ ते मार्च १३ पर्यंत पनवेललाच होते. वही घेवून कुठे फिरणार? २५ मे ते जून २८ पर्यंत बेळगांवला



होते. त्या अवधीत सुमेघा दहावीला उत्तम मार्क घेवून पास झाली. २९ मे ला,वर्षा,मेघा, रूपा, बाळू, निशा यांच्यासमवेत बेळगांवच्या आवडत्या माणसासोबत माझा वाढदिवस झाला.

माझ्या टीचर सोसायटीत घेतलेल्या प्लॉटचे खरेदीपत्र करून घेण्यात एक महिना गेला. त्यामुळे निशाच्या आई-बाबांच्या सोबत व आवडत्या मैत्रिणीसोबत महिना कसा गेला समजलेच नाही. मी परत नोकरीत असल्यासारखीच बिझी होते. हे काम पूर्ण न करता बेळगाव सोडायचेच नाही असे ठरले होते. मधे मधे पाय कुरकुरायचे पण गोळी देवून त्यांना गप्प करून काम करायची. व ते काम मलाच करणे भाग होते. बऱ्याच वर्षांनी बेळगावला राहायला मिळाले. त्यात अनगोळात लक्ष्मी बसलेली. त्यामुळे अनगोळ गावालाच लग्न घराचे स्वरुप आले होते. सगळ्यांच्या घरात फराळ व पाहुणे.. एकूण बेळगावातले वास्तव्य खूप आनंदात, सुखात व कामाच्या पूर्ततेत गेल्याने समाधान वाटले.

पौर्णिमेपासून रोज लिहायचे ठरवले पण त्याच दिवशी मी शरदकडे गेले ती आज आले. ९ जुलैला सांगलीचे मामा वारले. त्यामुळे इंदू एकटीच पडली. ती २३ जूनपासून वृद्धाश्रमात राहायला गेली. शरदने इंदू व मामांची खूपच सेवा केली. तिची सर्व कामे करून देवून त्याच्या घराच्या जवळच आश्रमात तिला ठेवले आहे. मी आज तिला तेथे पोहचवूनच घरी आले.

माणसाला केव्हा, कोणती वेळ येते, सांगता येत नाही. तिला तसे राहाताना बरे वाटले नाही. पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंबात अशी माणसे खपून जायची. खपवून घेतली जायची, पण हल्लीच्या चौकोनी किंवा त्रिकोनी कुटुंबात म्हातारी माणसं म्हणजे अडचणच वाटते. त्यात आमच्या इंदूचे तर कुणाशी जमणे फारच कठीण. आता त्या आश्रमात तरी जमवून घेवून राहिली तरी पुरे. असो. मी बेळगावहून येताना माझ्या आवडत्या मैत्रीणीबरोबर आले. दोन-तीन दिवस साताऱ्यात व चार दिवस मुंबईत राहून वासंती परत गेली. पण गड्डीबाई दि. २२ पर्यंत राहिल्या व त्याआधी बेळगावातपण मिळून राहिल्याने २ महिने त्यांची खूपच सवय झाली होती. त्यानंतर मामा गेल्यामुळे बापू व पद्मजा हुबळीहून आली. मंगल व बाळासाहेब पण आले. त्यामुळे मला भावंडातच राहायला व भेटायला मिळाले. मामा गेल्यामुळे इंदूला पैशाला कमी नाही, पण माणसं जोडली नसल्याने

माणसाच्या सोबतीची कमतरता आहे. म्हणून माणसाने चांगले असताना माणसं जोडून ठेवावी. जरा सर्वांना लावून घ्यावे, गोड वागावे पण हे इंदू व मामाला जमलेच नाही. त्यामुळे पैसा भरपूर आहे पण पैसा म्हणजेच सुख नाही. माणसाला माणसांची सोबत लागते. पैसा हे सुखाचे साधन असेल पण पैसा असला की सुख मिळते हे चुकीचे आहे. काटकसर करून पैसा साठवायचा व त्याचा उपभोग घ्यायचा. आपल्याच बँकेतला पैसा काढून आणणे आपल्या वयामुळे अवघड होते. तेव्हा काय वाटत असेल कोण जाणे?कारण या अनुभवापासून मी दूर आहे. मी माणसं साठवली, पैसा नाही.

आज नागपंचमी. प्रत्येक नागपंचमीला मला सरकारांची आठवण आल्याशिवाय रहात नाही. श्रावण सुरू झाला की, मला सरकारांची आठवण नेहमीपेक्षा जास्त येते. कारण श्रावणातली पंचमीच नव्हे तर प्रत्येक दिवस आमच्या घरात सणाचाच व आनंद पण वेगळा असायचा. प्रथम श्रावण सुरु झाला की, ह्यांनी मार्केटातून येताना दोन गौरीची गाडगी व मुखवट्याची छोटी बोळकी, काव, पेवडी, चुना हे साहित्य आणायचे. मग मी पहिल्या गुरुवारी अर्जुन वाडकरांच्या घरी संध्याकाळी एक तास रजा घेवून चारला जात असे. मग वहिनी, वासंती व मी अशा सर्वजणी गौर लिहायचे काम करत असू. वहिनी गाडग्यात काव लावून गाडगी सकाळीच रंगवून ठेवत. आम्ही संध्याकाळी त्या चित्रांनी सजवत असू. पांढऱ्या, पिवळ्या रंगांनी. कोळसा उगाळून डोके रंगवायचे. असो. पहिल्याच शुक्रवारी गौर बसायची घरात. खूप प्रसन्न वाटायचे. आरती, नैवेद्य, संध्याकाळी गौरीचे गाणे ऐकायला कुलकर्णी वहिनीकडे जावून मग आरती करून घरी येवून आमच्या गौरीची आरती, मग प्रसाद. श्रावण सोमवारी संध्याकाळी सहा वाजता जेवायचे. मंगळवारी मंगळागौरीचे हळदी-कुंकू वगैरेला जायचे. पंचमीचा थाट तर खूपच मोठा. लाह्या घरातच करायच्या व लाह्यापीठ दळून आणायचे. पाच प्रकारचे लाडू करायचे. एकूण काय घरात भरपूर खाणे करायचे. चकली, चिवडा तर हवाच. मला जमले नाही तरी, हे श्रावण सोमवारी मुलांना घेवून मिलिट्री महादेवाला जावून येणारच घरात झोपाळा तर महिनाभर असणार. बाहेर झाडाला झोपाळा एक आठवडा, पण घरातला महिनाभर, मुलींना पंचमी म्हणून बांगड्या, गळयातले, नवे कपडे हवेतच. आज मात्र हा सण मी श्रावणातली गाणी ऐकून



साजरा केला व यांच्या आठवणीने.

आज नेहमीप्रमाणे एस एम गोल्ड या वाहिनीवरचा कार्यक्रम ऐकत होते. त्यातली मनातील गाणी संपून इंद्रधनूहास्य कार्यक्रम सुरू झाला. त्यात रोज वेगळ्या विषयावर गाणी ऐकवतात. आजचा विषय 'सूर्य' होता. त्यात उगवता सूर्य माध्यान्हीचा व मावळतीचा सूर्य यांच्या वर्णनाची गाणी ऐकून मला माणसाच्याआयुष्याची त्याच्याशी तुलना करावी वाटली.

पहा ना! बाळ जन्माला येते तेव्हा सर्वांना खूप आनंद होतो. बाळ मोठे होत होत तरुण होतो. माध्यान्हीच्या सूर्याप्रमाणे जगात तळपतो व ज्यावेळी तळपून भागून, दमून म्हातारे होते, त्याचा वर्ण मावळत्या सूर्याप्रमाणेच त्याची अवस्था होते. व त्याचे वर्णन करणारे गाणे म्हणजे,

'मावळत्या दिनकरा....अशक्य जरि तू केलीस वणवण।
दिलेस जीवन हे नारायणा, जगात भरले तोंड पुजेपण धरी पाठीवर सुरा।
जो तो वंदन करी उगवत्या, जो तो पाठ फिरवी मावळत्या दिनकरा...।।

किती सुंदर वर्णन आहे या सूर्यनारायणाचे उगवताना. हो सूर्यनारायण म्हणायचे तसेच माणसाचे आयुष्य आहे. मावळत्या सूर्याप्रमाणेच म्हाताऱ्या माणसाकडेही हल्ली पाठ फिरवली जाते. लहान मुले, तरुण पिढी या सर्वांनाच म्हातारी माणसं नको वाटतात. त्यांना हे आठवत नाही की, जसा सूर्य वणवण करून जगाला जीवन देतो तसेच आपले आईवडिलांनी वणवण करून आपणाला मोठे केले आहे. त्यांना वंदनीय मानणे हे कर्तव्य आहे. पण आज आपण काय पाहातो? वृद्धाश्रमाची वाढती संख्या. कारण घरात चांगली वागणूक मिळत नाही. म्हणून स्वखूषीने किंवा घरात अडगळ वाटते म्हणून मुद्दाम म्हाताऱ्या लोकांना वृद्धाश्रमात जावे लागते. आयुष्यभर वणवण करून मुलांना वाढवायचे, पोटाला चिमटा घेवून शिक्षण द्यायचे व त्यांनी म्हातारपणी वृद्धाश्रमाचा रस्ता आईबापांना दाखवायचा. आमच्या बापूचेच उदाहरण घ्या.

बाळूचे नवीन घर खूपच छान झाले आहे. सर्वांनाच खूप आवडले. माझी खोली तर खूपच छान आहे. खूप आवडते व या खोलीत माझी सरस्वती टेबलावर येऊन बसलाी आहे. ती मला म्हणते. '' अग किती सारखा सर्वांचा आतल्या आत विचार करतेस. त्यापेक्षा भराभर लिहून टाक. त्यामुळे मन मोकळे होवून, मोकळा

श्वास घेतल्याचा आनंद तुला भोगता येईल. खरंच... या खोलीतून निसर्ग किती छान दिसतो. सूर्याला या हो...या हो... सूर्यनारायण, असे बोलवावे लागत नाही. क्षितिजावर आला की, प्रथम माझ्याच खिडकीत डोकावतो. पौर्णिमेच्या दिवशी तर चंद्राचे व आकाशाचे पूर्ण प्रतिबिंब खाडीच्या पाण्यात हुबेहुब दिसते. खाली आणि वर दोन दोन आभाळ व चंद्र पाहाण्याचा अनोखा आनंद मिळतो. मासे पकडणारे कोळी रात्र रात्र आपल्या छोट्या नावा घेऊन खाडीत फिरत असतात. मला झोप येईना झाली की, मी त्या शांत खाडीत ती गलबते पाहात बसते.

संध्याकाळी खाडीच्या कडेला जो फूटपाथ बांधला आहे. त्यावरून वेगवेगळ्या वयाची माणसं फिरताना किंवा पळताना पाहायला मिळतात. गाड्यातून येतात व फिरुन परत गाडीने जातात. मी खिडकीतून बाहेर पाहते. तेव्हा खूप छान वाटतं. मी एका बंदिस्त रुममध्ये नसून निसर्गाच्या सानिध्यात रहाते, असाच भास होतो. असे नाही तर मी खरेच खाडी, समुद्र, झाडी, मोकळे आकाश, चंद्र, सूर्य, चांदण्या या सर्वांच्या समवेत रहाते. व तेही या मुंबईत हं... कारण मुंबई म्हणजे गर्दीने भरलेले रस्ते. गाड्यांची वर्दळ, लोकलचा खडखडाट, पंख्याचा वारा. पण या खोलीत यातले काही नाही. पंखा आहे पण मी क्वचितच लावते. खिडकीतून येणार खाडीचा वारा छान वाटतो.

आज १८ डिसेंबर २०१३. आज माझे लग्न होवून ४८ वर्षे झाली. पण १९६५ साल व १८ डिसेंबर. आजही तो दिवस जसाच्या तसा आठवतो. भराभरा दिवस व वर्षे संपतात. पण आठवणी जसाच्या तशा मनात राहतात. खरंच आपल्या मनाची गम्मतच आहे व आपला मेंदू म्हणजे तर शरीरातील अजब रसायन आहे. मधल्या काळात आपण कितीतरी गोष्टी करतो, सुखाचे क्षण भोगतो, दु:खाचे चटके सोसतो, कोसळतो, सावरतो पण आपल्या आयुष्यतले त्या त्या क्षणांचे सुख-दु:ख मेंदू आपल्याला जसाच्या तसा चित्रपटाप्रमाणे उलगडून दाखवतो व तो दिवस मग सुखाचा किंवा दु:खाचा असू दे. तो आपण जसाच्या तसा अनुभवतो. एखादी घटना घडून जाते पण ती आपल्याला आठवून पुन्हा अनुभवता येते. ही माणसाला मिळालेली देणगी म्हणावी का शाप?

कारण चांगल्या घटना मनाला आठवल्याने आनंद मिळतो त्याचप्रमाणे वाईट घटना आठवून आपले मन दु:खाने पण नर्व्हस होते. मग आपण या



आठवण्याला तोडगा काय काढायचा तर आपल्याला आनंदात जगायचे असेल तर चांगल्या आठवणी काढायच्या व वाईट आठवणी विसरून जायच्या असो. पण मला तर सध्या चांगल्या आणि वाईट या दोन्ही आठवणी तुम्हाला आठवणी सांगायच्या आहेत. कारण आता ८० वयाच्या घरात जात असल्याने आठवणीने खूप आनंद किंवा मनस्ताप काहीच होत नाही. ते सर्व सोसून त्यापलिकडे मन गेले आहे. आता वेळ जाण्यासाठी आठवणी लिहिणे हा माझा छंद झाला आहे. मग ती दु:खाची असो अथवा आनंदाची, त्या लिहून मी माझे जगलेले जीवन परत जगणार आहे.

माझे लग्न होवून ४८ वर्षे झाली. त्यातली २२ वर्षे मी सरकारांच्या बरोबर घालवली व आता २६ वर्षे त्यांच्या विना घालवली. अर्थात त्यांच्या आठवणी सोबत होत्याच. आतापर्यंतच्या आठवणी ह्या त्यांच्या सोबतच्या होत्या. व आता यापुढे ज्या आठवणी आहेत त्या ह्यांची साथ नसतानाच्या आहेत. घरचा कर्ता माणूस गेला की, त्या घरावर काय संकटं कोसळतात. त्या मी पुरेपूर भोगल्या. असो.

१९७२-७५ च्या सुमारास ह्यांनी आपली एजन्सी महाराष्ट्रातून कर्नाटकात शिफ्ट केली. त्यामुळे ह्यांना इकडे डायरेक्ट एजंट म्हणून नेमणूक झाली. त्यामुळे फिल्ड ऑफिसरशिवाय स्वत:च स्वत:चे काम करावे लागे. अर्थात त्यांना कामाचा अनुभव असल्याने ते आरामात भरपूर काम करत होते. मुलंही मोठी होत होती. सर्व मुले शाळेला जात होती. शिक्षणात खूप हुषार होती. मी घर व नोकरी सांभाळून आनंदात होते. ह्यांना पण आपल्या चार मुलं व बायको यांच्याबरोबर राहण्याचा आनंद मिळत होता.

वर्षा, मेघा, रुपा हया टिळकवाडीतल्या बालिका आदर्श या शाळेत जात होत्या. मेघाला पाचवीतच हायस्कूलला घातलं. वर्षाला ६वीतून घातलं. व रूपाला मात्र ७ वी पास झाल्यावर ८वीत हायस्कूलला घातलं. कारण रुपाला अभ्यास आवडत नसल्याने तिच्याकडे जास्त लक्ष द्यावे लागायचे व तिला ५ वी ते ७ वी पर्यंत सामंतबाई असल्याने मी निश्चिंत होते. बाळुला मात्र ५वी पासूनच टिळकवाडी हायस्कूलला घातले. असो. बाळूचा व माझा एक त्रास वाचला. तो म्हणजे सकाळी ७पासून संध्याकाळी त्याला शाळेत थांबायचे वाचले. व त्याला सांभाळणे व डबे घेवून जाणे माझे काम वाचले. सकाळी १०.३० वाजता सगळी

घरातून बाहेर पडलो की संध्याकाळी घरी. सकाळी १०.३० पर्यंत मात्र घरात नुसती लगीनघाई. स्वयंपाक, आंघोळी, डबे, दप्तरे भरणे वगैरे.

''परवा १८ डिसेंबरला सरकारांची खूप आठवण झाली. ते गेल्यावर मला व माझ्या मुलांना काय काय सोसावे लागले, याचा चित्रपटच मी दिवसभर पहात होते. पण लिहायला मनात तेवढा उत्साह नव्हता. मी ते गेल्यावर झालेले दु:ख..., हाल... व त्यातून काढलेला मार्ग..., नातलगांनी दिलेला त्रास..., इतरांनी केलेली मदत..., मुलांनी दिलेला पाठिंबा... वगैरे. या सर्व गोष्टी मी भोगत असताना झालेला त्रास. आता मी तिऱ्हाईत होवून त्या पहाणार आहे व लिहिणार आहे.

थोडक्यात काय, आपल्याला एखादे स्वप्न पडते ते आपण पाहताना आपण त्यात असतो किंवा नसतो, पण ते सर्व खरे वाटते. तस या खऱ्या घडलेल्या गोष्टी आता मी स्वप्नाच्या रूपात पाहाणार व ती सर्व तुम्हालाही सांगणार आहे. २१ एप्रिल १९८७ हा दिवस मी कधीच विसरणार नाही. कारण आम्हाला तो विसरता येणार नाही व विसरून चालणार नाही. कारण त्या दिवशी माझ्या मुलांचे बाबा व माझे तर सर्वस्वच त्या दिवशी नाहिसे झाले. अचानक म्हणजे २-५ दिवसाचे आजाराने अचानक असा घरचा कर्ता माणूस गेला तर त्या घरावर दु:खाचा जो डोंगर कोसळतो. त्या ढिगाऱ्याखालून बाहेर पडायला काय यातना होतात ते मी अनुभवले आहे. नुसते एकटे बाहेर पडायचे नाही तर चार मुलांना घेवून बाहेर पडायचे हे सोपे का आहे ? पण माणसाचा एक स्वभाव आहे. त्याच्यावर प्रसंग आला की, तो त्यातून धडपडून व मन घट्ट करून बाहेर पडतो. अर्थात सर्वांनाच हे जमते असे नाही. काही माणसं त्या दु:खाने कोसळून जातात व स्वत:चे बरेवाईटही करून घेतात. त्यातून ती बाहेर पडूच शकत नाहीत. पण मी मात्र पहिल्या माणसातली, मनाने घटट्‌ व प्रसंगाला तोंड देणारी, अडचणीतून मार्ग काढणारी. कारण मला असंच वागणे भाग होते. कारण माझाच हट्ट होता की घरात एखाद दुसर मूल नाही तर चार-पाच तरी मुलं हवीत. कारण आम्ही ९ भावंड. आंबुच्या घरातही ८-९ मुलं. त्यामुळे माझ्या घरांत पण ५ तरी मुलं हवीत. आता त्यांना जन्माला घातल्यावर हे गेले म्हणून मला हातपाय गाळून चालणार नव्हतं. मुलांचे बाबा व आई दोन्ही कर्तव्य पार पाडणे माझे कर्तव्य होते.

जानेवारी १९८७ उजाडलं व एक दिवस मला वाटतं मेघा मिरजेहून आली



होती. संकष्टी होती. बाळू काहीतरी हट्ट करून रात्री उपाशी झोपला होता. सकाळी उठून आम्ही चहा घेत होतो. यांना एकदम काय वाटले कुणाला माहित, म्हणाले, ''हे ८७ साल काही आपल्याला चांगले जाणार नाही.'' ''सकाळी उठल्या उठल्या असं कां बोलता'' म्हणून मी रागावले.

पण माझ्या डोक्यातून त्यांचे वाक्य जातच नव्हते. दुसऱ्या दिवशी मी शाळेतल्या टीचरना पण ह्यांचे वाक्य सांगितले. सगळ्या म्हणाल्या, ''वा! देशपांडे भविष्यपण सांगतात का ?''

मलासुद्‌धा एकदा हात बघून त्यांनी सांगितलं होतं. ''तुझ्या हातात मरेपर्यंत पैसा असणार व तू खूप वर्षे छान जगणार.''तेव्हा मी म्हटलं होतं, ''अहो, हे तुम्ही कशाला सांगायला हवं. पेन्शन आहे (मिळणार) म्हणजे मरेपर्यंत पैसा मिळणारच आणि एवढ्या सुखात व आनंदात राहात असल्याने आयुष्य भरपूरच असणार.'' पण त्यांचे भविष्य खरे ठरले. माझे सुख २१ एप्रिल १९८७ लाच संपले, पण पैसे अजूनही मिळतात व भरपूर दु:ख भोगूनसुद्‌धा मी आजतागायत निरोगी जीवन जगत आहे. म्हणजे त्यांना भविष्य सांगता येत असणार किंवा त्यांनी तसे बोलायला व घडायला गाठ पडली असणार. असो. १९८७ साल आम्हा सर्व टीचरना वाईट गेले. त्यात मला खूप वाईट गेले. माझ्या आयुष्यातले सर्वांत वाईट गेलेल्या वर्षांत ह्यांची प्रामुख्यानं गणना करायला हरकत नाही. १८ डिसेंबर १९८६ ला ह्यांना मला वाढदिवसाची शेवटची साडी दिली. कारण दर लग्नाच्या वाढदिवसाला मला सरकार साडी आणायचे. पण १९८७ ला ते राहिले नाहीत. त्या वर्षी पाडवा मला वाटतं, एप्रिलमध्ये आला होता. घरात श्रीखंड-पुरीचा बेत होता. त्याच्याआधी मधे मधे जरा ह्यांची प्रकृतीची तक्रार सुरू होती. थोडा खोकला व मधे मधे थोडा ताप म्हणजे कसर यायची. मार्चमध्ये भरपूर म्हणजे जवळजवळ १५-१६ लाखांचे विम्याचे काम केले होते. मला वाटलं दगदगीने होत असेल. पाडव्याला पारसनीस जेवायला आले होते. टी.व्ही.चा वाढदिवस म्हणून आवारातली मुलं श्रीखंड-पुरी खायला आली होती. हे पण जेवण करून झोपले. उठले. ते त्यांना बैचेन होवू लागले. पोट पण जरा फुगले. बसता येईना, उठता येईना. डॉक्टरांना बोलावले व डॉ. दिक्षितांनी मारुती गल्लीतल्या डॉक्टरांकडे घेवून जायला सांगितले. मी, मेघा ह्यांना घेऊन डॉक्टरांकडे गेलो. त्यांनी घाबरण्याचे कारण नाही. गॅसने झाले असेल. दोन दिवसांनी बरे वाटेल नाहीतर पाहू म्हणाले.

मग आम्ही घरी आलो. पाडव्याची गुढी नाडगौडांनी उतरवली होती कां कोण जाणे? पण मला उगीचच तो अपशकून वाटला. ह्यांनी उभी केलेली गुढी त्यांनी उतरवली. असे कां घडले? असो. सरकारांना जरा बरे वाटले तरी पूर्ण बरे नव्हते. पण तसेच ते कामाला जायचे. मला त्यांची मनस्थिती पण बरी नसावी असे वाटले. जेवण ही नीट करत नव्हते व प्रकृतीपण खालावल्यासारखी वाटू लागली. रणभिसेबाई म्हणाल्यासुद्धा,''मामांची प्रकृती बरी वाटत नाही.'' ते मला रजा घे म्हणत होते पण १० एप्रिलला सुटी पडणारच होती. तरी मी म्हटलं, ''मी रजा घेते पण तुम्ही घरातच थांबायचं'' त्याला मात्र तयारी नाही. त्या वेळी बंद पडलेले विमाचेही काम करायचे खूप होते. शेवटी डॉ. म्हणाले,''मिरजेला डॉ. पुजारींना दाखवून या. अर्थात आमची डॉ.वर खूप श्रद्धा होती. म्हणून जायचे ठरवले. तारीख असेल १५-१६ आठवत नाही. सकाळी हे व मी मिरजेला गेलो. कोल्हापूरहून विलास, नाना, सुमन असे कोण कोण आले. तसे हे हिंडत फिरतच होते. 'सुखनिवास' कडून दवाखान्याला चालतच गेलो. विलासनी रिक्षा आणली तरी बसले नाहीत. मला डॉ. पुजारींचा दवाखाना आवडला नाही. बरोबर बापूपण होता. डॉक्टरनी ॲडमिट केलं. तपासण्या केल्या. स्पेशल रूम मिळाली नव्हती. डॉक्टरनी छोटेसे ऑपरेशन करून काहीतरी तपासायला दिले. २ दिवस जनरल वॉर्डमध्यें होतो. त्यावेळी असेच पोटाच्या ऑपरेशनचे तीन पेशंट दगावले. एक बाई , एक बाळ व एक मुलगा. ते पाहून ह्यांना तिथं रहाणं नको वाटलं. शेवटी दुपारी स्पेशल खोली मिळाली व त्याच्या आधी कुरुंदवाडहून बरेच मित्र येवून भेटून जात होते. बाहेर पोचवायला जायचे. दुपारी राम भावोजी व वहिनी आल्या. आल्या आल्या घराचाच विषय काढला. मला खूप राग आला होता. ह्यांनी मला सांगितलं, ''हे बघ, आपण आपल्या कुरुंदवाडच्या घरातला थोडासा भाग रामला द्यायचा बरं का? मी गप्पच बसले. जणू काय ते वचन घ्यायला आले होते. व ह्यांनीसुद्धा जवळजवळ मला वचनातच अडकवले. आमच्या व मुलापेक्षा तुम्हाला त्यांची काळजी जास्त ना? म्हणून खूप रडले. जरा निर्वाणीचंचं बोलल्यासारखे बोलायचे. स्पेशल खोलीत दुपारी गेलो व त्यानंतर हे कोमात जात असावेत असे मला वाटले. त्याच्या आधी विलास येऊन गेला. मेघाची पहिली टर्म ती पास झाली व ते सांगायला तिच्या मैत्रिणींना घेवून ती येवून गेली. विलासनी मी एकटी नको म्हणून रवीला माझ्यासोबत रहायला पाठवले होते. त्यांना डोळ्याने दिसेना, असे मला वाटले.



कारण त्यांना बाथरुमचे दार दिसेना पण मानायला तयार नाहीत. हात धरायला देईनात. डॉ. पुजारी आपले काम करून कुठंतरी दुसऱ्या देशाला का गावाला गेला. ह्यांना पोटात व अंगात खूप आग व घाम यायचा. बाहेर चांदणं होतं म्हणून मी बाहेर येवून गेले, पण शांतता नाही. मग मी फोन केला की काय आठवत नाही. मेघाला बोलावून घेतलं.

मी व मेघाने ह्यांना मिशनला न्यायचे ठरवले. त्या नर्सेस काही सोडेनात. तिथं दुसरा डॉक्टर नाही. शेवटी रिक्षानी आम्ही रात्री १.३०च्या सुमारास ह्यांना मिशनमध्ये घेवून गेलो. पेपररूममध्येच राहिले. परत रिक्षातून उतरून रवीने पेपर परत जावून २.३० वाजता एकटा दवाखान्यात आला. त्यांनी ह्यांची पाच दिवस खूप सेवा केली. मला जवळ बस म्हणायचे. कपडेसुद्धा रवीच धुवायचा. देवाचं वाचत बसले की राग यायचा.

मला म्हणायचे, ''ते वाचून काही आयुष्य कमीजास्त होत नाही. मिशनमध्ये हे पूर्ण कोमात गेले. ते खूप प्रयत्न करूनही शुद्धीवर आले नाहीत. पूर्ण अंगातलं ब्लड बदलून पण पाहिलं. दुसऱ्या दिवशी रात्री जरा बरे आहे म्हणे, परत सिरीयस झाले व रात्री १.३० ला हे गेले.

मला तर दोनतीन दिवस मी कुठल्या जगात होते ते कळत नव्हते. आय.सी.यू.च्या बाहेर बसून होते. एक एक तास जावून बघून येत होते. विलासची बायको मात्र सकाळी सात ते रात्री सहासात पर्यंत दिवसभर असायची.

हे गेले तेव्हा सगळ्यांना वाईट वाटले. नाडगौडा व नातलगांनी, शरद व जोत्स्नाने मदत केली. नाडगौडा नानासाहेबांना म्हणत होते की, ''तुम्ही यांना कुरुंदवाडला घेवून जा.'' हे जायच्या आधीच चर्चा चालली होती म्हणे. मी मात्र ठाम सांगितले, ''मी कुणाच्याही घरी जाणार नाही. सरळ बेळगावला जाणार.'' मग आम्ही बेळगावला गेलो. एल.आय.सी. ऑफिसचे सर्व लोक व इतर जवळजवळ दोन-तीनशे माणसं घरासमोर होती. विलास मात्र मुंबईहून यायला वेळ लागला. शरद इंदोरला होता. तो नंतर आला. नानासाहेब सुरेशला घेऊन कुरुंदवाडला गेले. सुमन म्हणाली, ''त्यांना त्रास सहन होणार नाही.'' शुभदा, सुमन, नाडगौडा राम, वहिनी सर्व बेळगावंला आले. नंतर माझ्या लक्षात आले की, सुरेश व नानासाहेब कुरुंदवाडला गेले व ह्यांची कागदपत्रांची बॅग नाहीशी केली. त्यात बँकेचे शेअर्स व घराचे खरेदीपत्र होते. ती बॅग माडीतल्या माळ्यावर असायची, मला मात्र हे माहित होते.

आम्ही दहाव्या दिवशी दिवस करायला वाडीला गेलो. अर्थात कुरुंदवाडलाच राहिलो त्या घरात. विलासची आई व राम भाऊजी दोन खोल्यात रहात होते. अर्थात मी नानासाहेबांकडेच राहिले दिवसकार्य संपेपर्यंत. सर्व गप्प होते.

नंतर मात्र एक-दोन महिन्यांनी मला सासरच्या लोकांनी त्रास द्यायला सुरुवात केली. शरद मात्र आपल्या कुटुंबासहित जवळजवळ २०-२२ तारखेपर्यंत राहिला. त्याने ह्यांच्या माघारी माझी कामे करून, व्हेस्पा गाडी विकून मग गेला. त्याच्याएवढी मदत मला कुणीच केली नाही. '' मेघाचे शिक्षण थांबवू नकोस, मी लागली तर मदत करेन, म्हणून सांगून गेला. त्यावेळी त्याने मला खूप धीर दिला. अशा वेळी माणसाला धीर देणाऱ्या शब्दाची गरजच जास्त असते. मी पूर्ण खचले होते. माझी नोकरी व घर सोडले तर माझ्या हातात काही नव्हते. पण ह्यांनी व मी जोडलेली माणसं मात्र भरपूर होती. त्या सर्वांनी मला खूप धीर दिला व म्हणूनच मी चार मुलांना घेऊन संसाराचा गाडा व्यवस्थित हाकू शकले. भावनेच्या भरात विलास बरंच बोलला.'' माझं शिक्षण काकांनी केलंय. आता या मुलांची जबाबदारी मी घेईन.'' खूप रडला. पण मला त्याचा स्वभाव माहित होता. तो प्रेमळ आहे पण दुसऱ्याचे ऐकून वागणारा आहे. वहिनी व नानासाहेबांचे तो ऐकून काहीच करणार नाही. हे शंभर टक्के सत्य होते.

'जन पळभर म्हणतील हाय...हाय, मी जाता राहिल कार्य काय?' भा.रा. तांबे यांनी या कवितेत ही ओळ लिहिताना केवढा विचार व अनुभव घेतला असेल. त्याशिवाय माणूस असे सुंदर काव्य निर्माण करूच शकणार नाही. मला तांबेंच्या बऱ्याच कविता आवडतात, पण ही खूपच आवडते. जाणारा माणूस जातो पण राहाणाऱ्यांना सर्व गोष्टी, जबाबदाऱ्या पार पाडाव्याच लागतात. तुम्ही जास्त दिवस दु:ख करत बसूच शकत नाही. माझेही तसेच झाले. माझ्यावर एवढी जबाबदारी पडली की, मला दु:ख करायला, रडायलासुद्धा वेळ मिळत नव्हता. जर मी ते करत बसले असते तर सरकारांच्या चार मुलांना आज आहेत त्या परिस्थितीत मी किंवा तुम्ही पाहिले नसते.

मेघा मेडीकलला होती. सहा महिन्यांची एकच टर्म पार पडली होती. बाळूने तर आठवी इयत्ता पार केली होती. रूपा बारावीत होती. वर्षाने बी.कॉमची शेवटची परीक्षा दिली होती. एकूण काय सर्वांची (वर्षा सोडून) शिक्षणाची जबाबदारी माझ्यावर होती. त्यातल्या त्यात मेघाची जास्त. कारण तिला मिरजेला पैसे पाठविणे महत्वाचे होते. बाकीचे काय... घरात कमीजास्त चालते. पण दुसऱ्या



गावात हॉस्टेलवर राहिलेल्या मुलीला शक्यतो सर्व गोष्टी पुरवणे भाग होते. त्यातच तिची स्कॉलरशिपची काहीतरी गडबड झाली होती. हे गेल्यावर मोहन शानबाग त्या दिवशी भेटायला आले होते. बाहेर शरदबरोबर गप्पा मारत होते. त्यावरून ते बंगळूरला जाणार हे मला समजले. मी दु:ख करत पडले होते. डोक्यात हजार विचार. मी पटकन उठले व शानबागना बंगळूरला गेल्यावर शिक्षण विभागात जावून मेघाच्या स्कॉलरशिपचं काय झाले ते पाहायला सांगितले. दोन दिवसात शानबाग आले. मेघाचे १२वीचे वर्ष संपले होते व कोणती साईड घेतली हे न कळल्याने त्यांनी तिची फाईल बाजूला केलेली पण शानबागनी त्यांना सर्व सांगून नवीन फॉर्म आणले ते भरून पाठवल्यावर तिची स्कॉलरशिप सुरू होणार होती. त्याच्यावर कुणा कुणाच्या सह्या, शिवाय मेडिकल कॉलेजच्या प्रिन्सिपलची सही घेवून बंगळूरला पाठवायचे होते. शानबाग स्वत:च देतो म्हणाले होते.

सरकारांचे दिवस आम्ही वाडीला जावूनच केले. तिथूनच दहावा दिवस असेल... मी, वर्षा व मेघाला मिरजेला पाठवले. कारण मिरज इथून जवळ होते. तेथे जावून प्रिन्सिपॉलची सही घेवून परत आल्या असत्या म्हणून पण त्यांना यायला जरा वेळ झाला. नमस्कार करण्यासाठी विलास मुलांना बोलावत असताना या दोघी नाहीत म्हणून त्याला व इतरांनाही राग आला. त्यांनी मी मुलींना मिरजेला पाठवले, याबद्दल राग आला. पण मी त्याला फारसे महत्त्व दिले नाही. त्यांच्या वतीने मी न नमस्कार करते म्हटले तोपर्यंत त्या आल्याच. बऱ्याच वेळेला भावना व मन बाजूला ठेवून विचार करून कर्तव्य करावे लागते. भावनेला जागृत करते. मनात कर्तव्याचे विचार जागृत होतात. म्हणून मला वाटते माणसाने भावनेच्या आहारी न जाता कर्तव्याला जास्त महत्त्व द्यावे. ह्यांच्या माघारी मी फक्त भावनेला कवटाळून न बसता कर्तव्य करत राहिले म्हणून सर्व मुलांचे कल्याण करू शकले. मलाही दु:ख, त्रास होत होता. मीही माणूसच होते. पण कर्तव्याचे पालन करताना भावना बाजूला ठेवाव्या लागतात. मी भावनेच्या आहारी गेले असते तर मी नक्की वेडी झाले असते.

परंतु यातून मला कोणी बाहेर काढलं असेल तर ते शरदनी. कारण मला हे गेलेत हेच पटत नव्हते. चालत हॉस्पिटलला गेलो व परत येताना डेडबॉडीच आणली. हे मनाला पटत नव्हतं. घरात सगळीकडे मला हे दिसायचे. गावाहून बॅग घेवून आलेले दारात उभे दिसायचे. मी एकदा रूपाला, ''त्यांना पटकन जेवण दे '' म्हणून मारलं. ते बघून शरदनी मला सांगितले, '' तू रोज दिवसातून २५ वेळा ते नाहीत असे म्हणून मनाला बजावत जा.''

मी खरंच तसे केले. कारण अचानक कुटुंबातून नाहीसा झालेला कर्ता माणूस घरात नाही, हे मनाला पटवणे मला व मुलांना फारच कठीण होते. असेच मनाला पटवत आम्ही या मोठ्या धक्क्यातून सावरण्याचा प्रयत्न करतच होतो. शरदनी मात्र या संकटात मला खूप मदत केली. तो मुलांना घेऊन इथेच राहिला.

सरकारांचे दिवस कार्य संपले. आम्ही बेळगावला परत आलो. रिवाजाप्रमाणे खांदा उतरविण्याचे जेवण दिले. शंभर लोक आले. घरात सर्व सामान भरलेलंच होते. पेपरमधील बातमी वाचून बरेच लोक भेटायला लागले. ह्यांनी बंद पडलेले विमा सुरू करायचे काम सुरू केले होते. कारण ह्यांना कंपनीने एक महिना मुदत दिली होती. ते काम जोरात सुरू होते. त्यामुळे हे गेल्यावर रोज खूप माणसं ह्यांना विचारत यायला लागली. त्यामुळे विलासने 'तरुण भारत' ला फोटो व बातमी दिली. अर्थात बावीस दिवसांनी शरदही गेला. बंद विम्याचे काम वर्षाच्या मदतीने शक्य तो पूर्ण करण्याचा प्रयत्न करत होते. ज्यांचा विमा सुरू करायचा त्यांना वर्षा ऑफिसमध्येच घेवून साहेबांसमोरच त्याचे पैसे भरायची. काही लोकांचे पैसे ह्यांच्याकडे होते. काहींचे ह्यांनी स्वत: भरले होते. सर्व डायरीत खुलासा लिहिला होता. त्यामुळे काम करणे सोपे झाले. ज्यांचे पैसे आमच्याकडे होते. ते भरून विमा सुरू केला, पण ज्यांचे पैसे ह्यांनी पदरचे भरले होते ते मात्र कुणी दिले नाही. एकूण काय... येणे सगळे बुडले. पण विमे सुरू झाले. ज्यांचे आमच्याकडे होते ते भरून विमे सुरू केले. असो.

यातून मला एकच समाधान मिळाले की, ह्यांनी कुणाचे पैसे बुडवले असे त्यांच्या माघारी कुणी म्हणू नये. व तसेच झाले. मला विम्याचे काम करण्यासाठी १५ते २२ दिवस सुटी असल्याचा फायदा झाला. डायरी वाचून वाचून काम करावे लागे. एक मात्र समाधान होतं की, ह्यांनी कोणत्याही तऱ्हेचे कर्ज मात्र अजिबात ठेवलं नव्हतं. उलट जवळ जवळ २०१२ सालापर्यंत त्यांच्या कामाचे कमिशन मला मिळत होते. व्हेस्पा गाडी कंपनीच्या नावावर होती. कारण अर्धे पैसे कंपनीचे होते. ते शरदनी भरून माझ्या नावावर केली. व मग मी गाडी विकून शरदला त्याचे पैसे परत केले. ह्यांना क्लबमेंबरशिप की काय मिळाली होती. त्यामुळे फोन व ऑफीस भाडे मिळणार होते. बाहेरची खोली ऑफिस म्हणून वापरायचे ठरले होते. पण त्याआधीच हे गेले.

ह्यांच्या माघारी गाडी विकली हे वर्षाला आवडले नाही. पण मी गाडी ठेवून काय करणार? वर्षाला चालवायला येत होती, पण माझे मन आता फारच हळूवार झाले होते. त्यामुहे कसलीही काळजी व जोखीम मला नको होती. कारण



आहे ती जबाबदारी भरपूर होती. परत जास्तीची जबाबदारी घेणे मला परवडणारे नव्हते. श्री. शानबाग यांच्यामुळे मेघाची स्कॉलरशिप सुरू झाली आणि शरदनी व पुष्पा लेंगडेंच्या वडिलांनी मला धीर दिला. मेघाचे शिक्षण बंद करू नका. शरद म्हणे, ''आम्ही तुला मदत करू. पुष्पाचे बाबा म्हणाले, ''माझ्या दोन मुली मिरजेत आहेत, असे समजून मी मेघाची काळजी घेईन.''

माझ्या पडत्या काळात मला अशा पाठिंबा देणाऱ्यांची फार गरज होती आणि ती त्या दोघांनी दिली. मधू अर्जुन वाडकर कोणत्याही प्रसंगी हजर व्हायचा. त्याला पैशांनी मदत करणे शक्य नव्हते, पण मुलांना प्रेमाची व आधाराची गरज होती. त्याची कसर त्याने भागविली. रोज मुलांना भेटायचा. काही अडचणी विचारायचा. वर्षाला ऑफिसने विम्याची एजन्सी दिली. मधूपण मदत करायचा. पण एक-दोन महिने झाल्यावर दोघेही कंटाळले व सोडून दिले. वर्षाचा रिझल्ट झाला. फस्टक्लास मध्ये पास झाली. आता पुढे काय? तिला नको म्हटले तरी न ऐकता श्री. भाटियांकडे नोकरी करायला लागली. त्यांचा रॉकेल, सिमेंटचा मोठा बिझनेस होता. हिशेब ठेवायचा. सात-आठ महिने नोकरी केली असेल. चारशे-पाचशे रुपये दयायचे.  त्यावेळी तिने महाराजा मिक्सर घरात आणला.

श्री. भाटियांचा काळ्या पैशांचा व्यवहार लक्षात आल्यावर तिने आपणहून नोकरी सोडून दिली. त्यामुळे मी निर्धास्त झाले. मेघाला दोन-तीनवेळा नानासाहेब मिरजेला जावून, भेटून पैसे देऊन आले.

मेघाने मला फोन करून विचारले, '' पैसे घेवू का?

मी सांगितले, '' घे... त्यांचा अपमान करू नकोस. ते काही कायम देणार नाहीत.'' आणि तसेच झाले. त्यांनी हळूच कुरुंदवाडच्या घराचा प्रश्न उभा केला. ते घर सर्वांचे आहे. असे त्यांचे म्हणणे होते. निदान रामचे नाव लाव म्हणाले, मी म्हटलं, ''माझेच नाव अजून लागायचे आहे, मग बघू.'' पण माझ्या बोलण्याने त्यांनी ओळखले की बाई भोळी वगैरे नाही. आपणाला घर मिळणार नाही. त्या महिन्यानंतर नानासाहेब व विलास एकदासुद्धा मेघाला भेटायला गेले नाही. ह्यांनी राम भाऊजींना मुलीच्या लग्नासाठी पाच हजार रुपये गणेश बँकेतून कर्ज काढून दिले होते. ते लग्न जून-जुलैला झाले. तेव्हा मेघा व वर्षा लग्नाला गेल्या होत्या. त्यावेळी मुद्दाम डिग्रजकर म्हणून ह्यांच्या आत्तेभावाला घेवून दोघींना मिरजेला सोडून, दोन चेक मेघाला दिले. म्हणजे त्यांना वाटावे विलासच सर्व शिक्षण करतोय. अशा नाटकी वागण्याचा मला खूप राग आला.

मेघाला कोणाकडूनही पैसे घेवून शिकायचे नव्हते. मला जमत नसेल तर

ती नोकरी करायला तयार होती. पण मी ह्यांच्या सर्व इच्छा त्यांच्या माघारी पूर्ण करायच्या ठरवल्या होत्या. रहायला घर होते, नोकरी होती आणि मुलं शिक्षणात हुशार होती. व नात्यातली माणसं फारशी मदत करणारी नसली तरी जोडलेली माणसं भरपूर होती. त्यांचे धीराचे शब्द मला बळ देत होते. व मी 'हे' मला न कळत माझ्या पाठीशी आहेत. ते मार्ग दाखवतात, असे मानून वाटचाल करत होते. शक्यतो कुणाकडेही पैशांची मदत न घेताच संसाराचा गाडा हाकत होते. ह्यांचे कमिशनचे पैसे मिळायला सहा महिने गेले. मग त्या पैशाचा मला आधार वाटला. त्याआधी राजन कलखांबकर,वर्षाचा मित्र याने हॉस्टेलवर मुलं त्रास देतात म्हणून माझ्याजवळ पैसे व अंगठ्या दिल्या होत्या. त्याला मी आधीच बजावले होते की, ''पैसे खर्च होतील.'' पण त्याने पैसे खर्च करायची पूर्ण परवानगी दिली होती. त्यामुळे ह्यांचे चेक नाहीत, माझी बदली झाली म्हणून मी रजेवर. त्यामुळे पगार नाही. अशावेळी मला राजनच्या पैशाचा खूप उपयोग झाला. अर्थात नंतर मी त्याला थोडे थोडे लागतील तसे दिले. माझी बदली रद्द झाली. मी नोकरीवर जावू लागले. व शालेत जायला लागल्याने माझेही मन शाळेत रमू लागले. पण घरी येताना रस्त्यात, घरांत सरकार नाहीत हे आठवायचे. मुलांची आठवण येवून जड पावलांनी घर गाठायची. व मुलांमध्ये रमायची.

माणूस गेला म्हणून कोणत्याच गोष्टी थांबत नाहीत. सर्व व्यवहार आपोआपच चालू होतात. डोळ्यातले अश्रू व मनातले दु:ख कमी करायला काळरूपी वाराच उपयोगी पडतो. काळ सुरूच रहातो. दिवस संपत होते. मेघाची नॅशनल स्कॉलरशिप सुरू झाली. बाळूपण शाळेत जात होता.माझी पण नोकरी व्यवस्थित सुरू होती. हळूहळू सर्व जबाबदाऱ्या स्वीकारायची तयारी करत होते. कारण हे असताना मला बँकेत जाणे, पैसे काढणे, सामान आणणे असले काहीच करावे लागत नव्हते. त्याशिवाय मेघाला पैसे पाठवणे, घरचा खर्च चालवणे यातले मला एकही काम बावीस वर्षांत करावे लागले नव्हते. स्वयंपाक, धुणे धुणे, व शाळा या व्यतिरिक्त मी कशातच लक्ष घालत नव्हते. त्या सर्व गोष्टी मला आता करणे भाग होते. यातही मला जास्त मदत रूपाची झाली. रुपाची बारावीची परीक्षा सुरू असतानाच हे गेले. त्यामुळे तिचे खूप नुकसान झाले. तिनं परीक्षा दिली नाही व परत कॉलेजलाही गेली नाही. तिला एकटीला घरांत ठेवून मला दिवसभर शाळेला जावे लागे. मग मी तिला लायब्ररीच्या कोर्सला घातले. कॉमर्स बारावीचा अभ्यास घरात करून परीक्षा द्यायला लावली. अर्थात एकदम कॉलजला न जाता सर्व विषय होणार नव्हते. मग थोडेथोडे असे विषय देवून तिने बारावी आणि लायब्ररीचा



कोर्स पूर्ण केला. नंतर मग क्लासला जावून घरात अभ्यास करत. ती कशीतरी बी.कॉम झाली. अर्थात मला तिच्यामागे खूप लागावे लागायचे. पण ती तरी काय करणार? नाही म्हटलं तरी घराची जबाबदारी तिच्यावर जास्त पडायची. घरातले कामही करावे लागे, पैशाचे व्यवहारही तीच जास्त सांभाळायची. व ह्या सर्वांतून उरलेलं डोकं व मन अभ्यासात घालायचे. मग रडत खडतच अभ्यास होणार ना? सर्वांना वाटायचे मी रूपाला सारखे परीक्षा द्यायला लावून तिच्यावर अन्याय करते व विनाकारण पैसेही खर्च करते. पण माझ्या स्वभावाप्रमाणे मी सर्वांचे ऐकून घेतले. व मनाला पटले तेच केले. म्हणून तर आज पूर्ण घराचा गाडा ती एकटी ओढते. त्यावेळी तिला नुसते घरात ठेवले असते तर आज ती बी.लीबची परीक्षा देवू शकली नसती. कारण त्याला डिग्री लागते.

म्हणता म्हणता १९८७ साल संपलं. ह्यांच्या भविष्याप्रमाणे ८७ साल खूपच वाईट गेलं. २१ एप्रिलला हे गेले. त्यानंतर मी २२ मे ला शाळेत हजर झाले. पाचच दिवसांत बदलीची ऑर्डर आली व तेही कंग्राळीला म्हणजे २-२ बस बदलून जायचे. मुद्दाम तालुक्यातल्या लोकांना सिटीत आणण्यासाठी बदल्या केल्या होत्या. शाळेत ५/६ जणांच्या बदल्या झाल्या व कुणाच्याही रद्द होणार नव्हत्या. बाकीच्या टीचरनी रजा घेतल्या पण मला जास्त रजाही घेवून चालणार नव्हते. कारण रजा म्हणजे पगार बंद. शरद तर म्हणाला, एक महिना वाट बघ, नाहीतर हजर हो. त्यानंतर नाही. पण एक दिवस सकाळी शामराव अर्जुन वाडकर घरी आले. गप्पा मारताना म्हणाले, ''बाई तुम्ही आर.व्ही. देशपांडेंना भेटा. ते तुमची बदली रद्द करतील व दोन दिवसातच ते वेलंगीच्या घरी येणार आहेत. वेलंगीचे ते मामा लागत. वेलंगींच्या मुली वर्षाच्या मैत्रीणी होत्या. वेलंगी मला ओळखत होते. कारण डॉक्टरांच्या बाजूलाच त्यांचे घर होते. देशपांडे आले. मला दोन दिवसांनी शामरावांनी सांगितले. वर्षा लगेच सकाळी उठून त्यांच्या घरी गेली व त्यांना भेटून सर्व हकिकत सांगितली. वर्षावर ते खूपच खूष झाले. त्यांनी माझ्याकडून अर्ज मागवला व तो गेस्टहाऊसमध्ये जावून द्यायला सांगितला. मी अर्ज दिला व वर्षाने नेऊन दिला. त्यात परत काही दुरुस्त्या करून परत लिहून मागितला. लिहून दिला. त्यांनी तो अर्ज स्वत:जवळ ठेवला. कॉपी काढून प्युनकडून आमच्या ऑफिसला पाठवून फोन केला. कुठेही गवगवा न करता माझी बदली रद्द करण्यास सांगितले. ऑफिसने शाळेत प्युनकडून ऑर्डर पाठवली व मला घरात निरोप आला. ही बदली कुणी रद्द केली हे न सांगण्याबद्दल आर.व्ही. नी मात्र ताकीद दिली होती. कारण दोन-तीनशे बदल्या झाल्या होत्या. व कुणाचीही बदली रद्द न करण्याचा वरून

आदेश होता. पण अशा वेळी एकही पैसा न देता माझी बदली रद्द झाली. याचे खूप जणांना अजब वाटले. पण मी मात्र कुणालाही आर.व्ही. देशपांडेंचे नाव सांगितले नाही. ते मला देवासारखेच भेटले.

आज २०१५ साल उजाडलं. नवीन वर्षाचे स्वागत जोरात झालं. आपण नव्या वर्षाच्या निमित्ताने नवे संकल्प करतो व ते पूर्ण करायचा प्रयत्न करतो. मी पण आजपासून एक तरी पान काहीतरी लिहायचं असं ठरवलं आहे. हल्ली जास्त वाचणे जमत नाही. त्यामुळे मनात काही विचार आलेले लिहायचे जास्त सोपे वाटते कारण त्यामुळे मनही हलके होते, वेळ जातो व समाधान मिळते. असो. सरकारांची आठवण प्रत्येक वर्ष संपले की होतेच. त्यांच्यामागे मी एवढी वर्षे जगले. पण त्या जगण्यात खरा आनंद आहे का? असा प्रश्न मी मलाच विचारते व त्याचे उत्तर मला नकारात्मकच मिळते. आनंद मिळणं व आनंद मानणं यात फरक आहे का ? माझं तसचं आहे. मी कशातही आनंद मानते. हा माझा स्वभाव आहे. पण सरकारांच्या बरोबर घालवलेली २२ वर्षे जास्त आनंदाने भरलेली होती. तेव्हा पैसा कमी होता, राबणे होते, मुलं लहान होती. तरीपण त्या सर्वांत एक जिवंतपणा होता व त्यातूनच मला खरा आनंद मिळायचा. ''काय करायची दिराभावांची पालकी, भर्तारावाचून नार दिसते हालकी'' ही ओळ एका भाजीवाल्या बाईने सुमती क्षेत्रमाडे यांना ''कशी आहेस ?'' असे विचारल्यावर सांगितली होती. एक अडाणी बाईसुद्धा आपल्या जोडीदाराच्या जाण्याचे दु:ख किती योग्य शब्दात सांगते ह्याचं आपल्याला नवल वाटतं. त्या बाईने सांगितल्यासारखेच माझे सध्याचे आयुष्य आहे. काही कमी नाही. मुलं छान शिकली, मिळवती झाली. लग्न झाली. त्यांना मुलं झाली म्हणजे मला जावई आले. सून आली. नातवंड झाली. पैशाला काही कमी नाही. स्वत:ला १५ हजार पेन्शन आहे. सर्व आहे. मी प्रवास करते. सर्वांच्याकडे गाड्या आहेत. हे सगळं सुखच आहे. पण ह्यातले प्रत्येक सुख भोगताना पूर्वीच्या दिवसांची आठवण होते. ते असते तर? असे वाटते. त्यांच्याबरोबरचे प्रवास आठवतात. पैसा कमी होता पण सरकारांना फिरण्याची व फिरवण्याची हौस खूप होती. त्यामुळे मी खूप फिरले त्यांच्याबरोबर. आज जरी २०१५ सालं उजाडलं तरी मी मात्र आज १९८८ सालात फेरफटका करणार आहे. ८८ साल उजाडायच्या आदल्या दिवसापर्यंत ८७ सालानी त्रास दिला. २९-३० तारीख असेल. बाळूचा शाळेत लांब उडी मारताना पडून हात मोडला. त्याला प्लॅस्टर घालावे लागले. मला निवडणुकीची ड्युटी आली. महिनाभर फिरावे लागणार होते. घरातच अंजू आपटे, उषा वगैरे मुली मिळून



बाळूला झोपवून ठेवून (हात हालू नये) म्हणून ८७ सालाला निरोप दिला व ८८ साल चांगलं जावं म्हणून मी सर्वांना गोड खाऊ दिला. मला मानसिक त्रासामुळे हल्ली मॅग्रिनचा त्रास वाढला होता. एकही महिना डोकं दुखण व उलट्या याशिवाय जात नव्हता व त्याला काही उपाय नव्हता. अर्थात हा त्रास रूपा लहान असल्यापासून होत होता, पण आता वाढला होता. जानेवारी-फेब्रुवारी महिना इलेक्शन ड्युटीत गेला. मला जवळच्याच गल्ल्या होत्या. पण त्याचाच त्रास मला खूप झाला. कारण ह्यांना सगळेजण ओळखत होते. त्यामुळे काय बाई तुम्ही बाहेर पडलात वाटतं. देशपांड्यांना जावून वर्ष झाले का? असे विचारणारे लोकच खूप भेटले व मला त्याचा त्रास होवू लागला. म्हणून शेवटी शेवटी मी कन्नड टिचरबरोबर वर्षाला पाठवू लागले. कारण बॉर्डर असल्याने दोन्ही भाषेत याद्या कराव्या लागायच्या. असो. काम संपले. शाळा सुरू झाली. निरागस व निष्पाप मुलांना शिकवण्यात वेळ छान जायचा. घरात वर्षा, रूपा, बाळू असायचे. यांची आठवण म्हणून मी ह्यांचा फोन मात्र माझ्या नावावर करून घरात ठेवला. त्यामुळे मेघाला फोन करायला मिळायचे. मार्च-एप्रिल महिना असावा. मेघाची प्रत्येक पेपर संपला की व सुरू झाला की, आम्ही तिला फोन करत होतो. त्याच्या आधी आधी आणखी एक महत्त्वाची घटना घडली. ८७ ऑगस्ट किंवा सप्टेंबर असेल. संजीव बोंडे नावाच्या माणसाची कुठल्यातरी अंकात एक जाहिरात आली होती. ती वाचून वर्षा, पुष्पा, उषा अशा बऱ्याच मुली मिळून त्याला पत्र घातले. अर्थात मलाही दाखवले होते. हुंडा न घेता रजिस्टर लग्न वगैरे असे काहीतरी त्यात होते. मला काही गंभीर वाटले नाही. हुंड्यामुळे पालकांना काय त्रास होतात, ही पद्धत बदलावी असे होते व त्याला पाठिंबा देणारे पत्र ह्यांनी त्याला लिहिले होते. लगेच बोंडेचे टपाल आले, तुमच्या ग्रुपला भेटायला येतो म्हणून. कारण त्या सुमारास ह्या सर्वजणी मिळून 'मुलगी झाली हो' हे नाटक वगैरे करायच्या. मी वर्षाला सांगितलं त्यांना येथे येवू नका म्हणून कळव व आमच्या घरात घडलेली घटना कळव. (हे गेल्याचे) आम्हाला आता कुणाचेही येणे नको आहे. वर्षानी तसे कळवले. तरीपण अशा संकटप्रसंगी तर आम्ही मुद्दाम येतो. आमची राक्रांद नावाची संस्था आहे. काही मदत हवी असेल तर अशा कुटुंबांना मदत करतो. नको म्हणत असतानाही. बोंडे व नागेंद्रा असे दोघेही आले. अर्थात आल्यावर त्यांचे स्वागत करणे भागच होते. सर्व मुली आल्या. निमाताई देशपांडे यांच्याकडे त्यांची मिटींग झाली. त्यांना धारवाड युनिव्हर्सिटी पाहायची होती. मग त्या मुलींना घेवून ते धारवाडला जावून आले व मग सातान्यास गेले. त्यानंतर थोड्या दिवसांनी निमाताई माझ्याकडे आल्या.

त्यांना माझ्याशी बोलायचे होते. पण माझी प्रकृती बरी नव्हती. मॅग्रिनचा त्रास होत होता. सहज भेटायला आले होते म्हणाल्या. परत ८-१५ दिवसांनी त्या परत आल्या व त्यांनी मला संजीव बोंडेचा निरोप सांगितला. त्यांनी वर्षासाठी लग्नाबद्दल विचारले होते. मी सध्या विचार नाही व कोण कुठला त्या माणसाबद्दल काहीच माहिती नसताना मी कसे काय सांगणार? पण त्यांचे भेटणे सुरूच. वर्षा पण त्याच्या विचारांच्या प्रेमात पडत होती. मला मात्र मी अशी मुलांना घेवून राहते व त्यामुळे माझ्या असहाय्यतेचा फायदाच घेण्याचा ह्यांचा विचार आहे असे वाटू लागले. एकूणच ह्या प्रकाराने माझ्या दु:खात आणखीनच भर पडली. मी नोकरी करू ? घर बघू का वर्षाच्या मागे लागू? मला वैतागच आला. जर वर्षा न सांगता लग्न करून गेली तर लोकांना वाटणार ह्या भानगडीमुळेच देशपांडे गेले. हा बट्टा लागू नये म्हणून मी मानसिक त्रास सहन करत जवळजवळ ८-१० महिने घालवले व शेवटी ठरवले की चौकशी करून लग्न करून देवून टाकू. वर्षाने परस्पर शरदलाही हे सांगितले होते. मधुलाही माहित होते. कारण त्यांच्याच घरात वर्षात संजीवला भेटायची. ह्या सर्व त्रासातून मी स्वत:ला सोडवण्यासाठी शरदला साताऱ्याला जावून चौकशी करून वर्षाचे लग्न ठरवले. एप्रिल ८८ उजाडलं. शाळेची गडबड सुरू होती. पेपर तपासा, रिझल्ट तयार करा, एक ना दोन पण मला घरापेक्षा शाळाच बरी वाटू लागली होती. कारण मी तिथं वेगळ्या जगात असायची. मुलं, घर, संसार यापासून लांब. पण मला लांब राहून चालणार होतं का? शेवटी सगळं मलाच निस्तरणं भाग होतं. शरदचा चौकशी करून फोन आला. त्याने तर १० जून लग्नाची तारीखपण ठरवली. मेचा शेवटचा आठवडा असेल. ह्यांचे वर्षश्राद्ध झाले होते. दिवसांना काय उद्योग असतो का ? ते येतात-जातात. वर्ष संपले. पण माझे दु:ख मात्र ताजेच होते. उलट इतर सर्व त्रासांनी मला सरकारांची जास्तच आठवण येत होती. कुरुंदवाडच्या घराचा त्रास, मेघाच्या शिक्षणाची जबाबदारी, वर्षाचे वागणे, बाळूचे १० वीचे वर्ष व रूपाचे अर्धवट राहिलेले व नव्याने सुरू झालेला लायब्ररीचा कोर्स. त्यातल्या त्यात मला पुढच्या आयुष्यात रुपाची मदतच जास्त झाली. लग्नाची तारीख ठरवल्यामुळे मी घर रंगवायचे ठरवले. कारण घर घाणही झाले होते. चौकट व दार (पडल्यामुळे) नवीन करावे लागले होते व नुकतेच श्राद्धही झाले होते. त्यामुळे जे. जे. पाटलांना भेटून रंगारी ठरवला व सामान काढणे, ठेवणे, सर्व व्याप सुरू झाला. तशातच एक दिवस संजीव बोंडे आले व लग्नाची तारीख बदलायला सांगू लागले. मी मात्र त्याला नकार दिला. कारण काय तर १० तारखेला दाभोळकर येणार नाहीत. अर्थात संजीव प्रथमच घरी आला होता.



कारण पहिल्यांदा जो आला होता त्यानंतर आजच प्रथम येत होता व तेही भावी जावई म्हणून. पसारा बराच होता. मग श्रीखंड आणले. जेवण केले. मला साडी घेण्यासाठी त्यांनी आग्रह केला. पण मी घेतली नाही. वर्षा व ते जावून छोटा रेडिओ घेवून आले. आता आमच्या घरात लग्नाची गडबड सुरू झाली. रंग झाला. २२ मेला परत शाळा सुरू झाली. मी कुणाला न सांगतासुद्धा लोकांना कुणकुण लागली होती. घरात फराळ बऱ्यापैकी केला. करंज्या करत होतो. मेघाचा रिझल्ट लागला. आम्हा सर्वांनाच ह्याची खूप आठवण झाली. माणूस गेला तरी सर्व गोष्टी होतच रहातात. १० जूनची तारीख वर्षाच्या लग्नाची ठरवली होती. मी बहुतेक एक आठवडा रजा काढली असावी, आठवत नाही. लग्न जरी रजिस्टर होणार असलं तरी मी मात्र घरात सर्व फराळ केला. सर्वांना द्यायला आहेर घेतला. वर्षा शहापूरला जावून शालू व साड्या घेवून आली. बरोबर पुष्पा लेंगडे व आई मेघा वगैरे होती. जायच्या दिवशी म्हणजे ९ जून १९८८ ला शशीला सकाळी लवकर बोलावून पुरणाचा स्वयंपाक करवून देवाला (भटजीकडून) अभिषेक, नैवेद्य, दाराला तोरण बांधले. फराळ भरून देण्यासाठी नवे चार डबे घेतले. एकूण लग्नाची तयारी झाली. वर्षाला एक चेन व अंगठी दिली. ९ तारखेला १८ रिझर्व्हेशन बेळगाव-नाशिक बसचं केलं. सकाळी ९ वाजता बस होती. संध्याकाळी पोचलो. मी पहाटे उठून ५ ला ५० पोळ्या पिठलं, दहीभात, चटणी असं जेवणं बरोबर घेतलं होतं. मुंबईहून शरद, विजय वगैरे आले. शरदनी मामाची साडी वर्षाला दिली. मला सुटकेस दिली. विशेष आग्रहाचे आमंत्रण न करताही मंगल, बाळासाहेब, मधू व वर्षाच्या मैत्रिणी, शशी व तिची मुलं अशी १८ जण आम्ही निघालो. बापू पण होता. नाडगौडा कंपनीची कथा मग सांगेन. त्यांचे आमचे बोलणे बंद होते. असो साताऱ्यातली सर्व तयारी संजीवने केली होती. रजताद्रीत रहाण्याची सोय होती व लग्न मुक्तांगणात झालं. ७०-८० माणसं लग्नाला होती. सर्वांना अल्पोपहार, चहा होता. आमच्यासाठी ३० लोकांचं जेवण होतं. जेवणात मात्र चपात्या सांगितल्या होत्या. त्या मी रद्द करून पुऱ्या सांगितल्या. जेवण मात्र खूप छान होतं. सर्व खर्च संजीवनेच केला. संध्याकाळी परत बेळगावला निघालो. मला संजीवच्या घरातलं वातावरण आवडलं नव्हतं, कारण कोट्रेश, नागेंद्रा व एक अनाथ मुलगी (नाव आठवत नाही), सर्वजण एकत्रच रहात होते व वागणेपण जरा आचरटासारखे वाटले. मी वर्षाला ९ ता. रात्री अजून विचार कर. लग्न रद्द करू म्हटले. पण जे घडायचे ते घडले. लग्न झाले. मी मात्र वर्षा सासरी जाते म्हणून जरासुद्धा रडले नाही कारण तिने आपल्या आपण ठरवलेले का वाईट वाटून घ्यावे? त्यात माझ्या मनाचा विचार नव्हता.

वर्षाचे लग्न झाले. वर्षा साताऱ्याला गेली. मेघा मिरजेला गेली. माझी शाळा सुरू झाली. बाळूची शाळा सुरू झाली. रूपा मात्र घरी असायची. तिला पण लायब्ररीच्या कोर्सला पाठवून दुपारी १२ वीचा अभ्यास करायची. एकूण काय सरकार गेल्यावर एक वर्षात बऱ्याच घडामोडी झाल्या. बाजूला नाडगौडा होते. ते शरदच्या 'प्रथमेश' बंगल्यात रहायला गेले. ते घर हसबेने घेतले. काही भांडण नसताना त्यांनी बोलणे बंद केले. मी पण का? म्हणून नाही विचारले. त्यांना वाटत होतं, आता आमची जबाबदारी त्यांच्यावर पडेल. ते गेले ते एका अर्थी बरेच झाले, कारण काही न करता मोठेपणा सांगत फिरले असते. शरदला आम्ही भाडे देतो असे टिचरना (गड्डी, नेसरगी) इंदू सांगायची. अर्थात ह्या कुठल्याच गोष्टीत मला लक्ष घालायचे नव्हते व मला सवडही नव्हती. संजीव मुडलगी ८ वी पासूनच त्याच्याकडे रहायचा. आता शिरीषपण आला होता. बहुतेक त्यांनी डबा लावला असावा. मी मात्र मुलं आली तर त्यांना खाणे द्यायची. बाकी कशाशी मला संबंध ठेवायचा नव्हता. माझे मला भरपूर व्याप होते व त्यात सासरच्या माणसांनी आणखी एक व्याप लावला होता, कुरुंदवाडच्या घराचा. ते घर ह्यांच्या नावावर होते. ते सर्वांना हवे होते. हे असतानाच नानासाहेब आपले व रामचे नाव लाव म्हणत होते. पण ह्यांनी लावले नव्हते. त्यावरून विलासच्या घराच्या वास्तूशांतीच्यावेळी रस्त्यात नानासाहेब व ह्यांच्यात वाद झाला होता. तेव्हा नानासाहेब म्हणाले तुझे काही बरे वाईट झाले तर २-३ नावे असावी. मला खूप राग आला. मी कधी न बोलणारी पण नानासाहेबांना फाडकन् म्हटलं, ''चांगलं कार्य करून निघालोय, असं वाईट का बोलता? तुम्ही तरी आता घरी पोचाल का वाटेतच काय होईल? हे कुणालाच माहित नसतं.'' ह्यांना जरा राग आला पण नानासाहेब खूप स्वार्थी होते. त्यांना आम्ही दोघे मिळवतो म्हणजे सर्वांना मदत करावी, घराला सर्वांचे नाव लावावे असे वाटत होते. पण हे नेहमी मला म्हणायचे, हे घर मी तिन्ही मुलांच्यासाठी ठेवले आहे.

हे गेल्यानंतर एकदा नानासाहेब आले. १-२ दिवस राहिले. त्यावेळी मी त्यांना खूप बोलले. मला वाटायचे, नानासाहेब असे बोलले व म्हणूनच हे गेले. मी त्यांना म्हटलं, ''आता तुम्हा सर्वांचं समाधान झालं का ? मोठ्या भावानी लहानाला आशीर्वाद द्यायचा सोडून असं तुम्ही त्यांना का म्हंटलत?'' कारण पुढे ७-८ महिन्यातच हे गेले. त्यामुळे माझं मन खूप हळवे झाले होते. अर्थात हे गेले तेव्हा नानासाहेब व सुरेश मिरजेहून कुरुंदवाडला का गेले हे मला नंतर लक्षात आले.



त्यावेळी सुमन म्हणाली,'त्यांना बेळगावला न्यायचे नाही. त्यांना दु:ख सहन होणार नाही.' राम भाऊजी व वैनी, सुमन, शुभदा वगैरे बरोबर आले. सुमन, शुभदा रात्री गेल्या कारण वैनी कोल्हापूरला एकट्या होत्या. त्यांची प्रकृती बरी नव्हती. मी जेव्हा दिवस करण्यासाठी वाडीला गेले त्यावेळी मी माडीवर कागदपत्रांची बॅग बघते तर त्यात कागदपत्रच नव्हते. मला ह्यांनी घराचे कागद, बँकेचे शेअर्स वगैरे त्यात असतात हे सहजच दाखवून ठेवले होते. ते कुरुंदवाडला जावून सुरेश व नानासाहेब यांनी नाहीसे केले होते. ती छोटी बॅग माडीवरच्या पोटमाळ्यावर असायची. ती शोधून मग कागदपत्रे जाळली का लपवली त्यांनाच माहीत. मी खूप शोधूनही कागद मिळाले नाहीत. मी बेळगावला आल्यावर नानासाहेब आले. पण माझे चिडून बोलणे व अवतार पाहून ते गप्पच बसले व राहून निघून गेले. मग विलास व शुभदा आले. रविवार होता. महाभारत टी.व्ही. वर सुरू होते. दोघेही मला घराला रामचं नाव लावा असे सांगायला आले होते. त्यांना अडचण आहे व शोभाचे लग्न ठरवले आहे, त्यांना पैसे हवेत, मी विलासला म्हटले, ''अजून घर माझ्या नावावरच झाले नाही तर मी त्यांचे नाव कसे लावणार?'' मग म्हणाला, ''रामला एक पत्र द्या की घर माझ्या नावावर झाले की तुझे नाव लावते ?'' मी त्याला म्हटलं, ''मी तुझ्याएवढी शिकले नाही. पण कायदा मलाही कळतो. एवढं प्रेम आहे तर तूच त्यांना दोन खोल्या बांधून दे. मला जेव्हा वाटेल तेव्हा जे द्यायचे ते मी देईन. तुझ्या मध्यस्थीची जरूरी नाही. हवे तर लग्नासाठी सोसायटीतून लोन देईन.''

ह्याच घराच्या काळात वर्षाचा पण त्रास सुरूच होता.मला तर वाटले जाताना घर पण भावांना देवून गेले असते तर बरे झाले असते. घरांनी मला घरघर लागायची वेळ आली. मी ह्यांचे डेथ सर्टिफिकेट वगैरे आणून वारस ठरवण्यासाठी सरकारी वकील सुमती पाटील यांना भेटले. त्यांनी मला खूप मदत केली व मुख्य म्हणजे मला रजेशिवाय सर्व कामे करून दिली. मी रात्री हिंदवाडीत त्यांच्या बंगल्यावर जायची. पण त्यांनी कधी मला बंगल्यावर येवू नका म्हटले नाही. उलट तुम्ही येण्यापेक्षा मुलीला सही देवून कागद पाठवत चला म्हणायच्या. त्यामुळे रूपा, वर्षा कुणीही गेल्यातरी त्या माझे काम करायच्या. माझ्याकडून नॉमिनल सही करायला १५ रु. घ्यायच्या. माझे वारसा सर्टिफिकेट तयार झाले. ते मी कुरुंदवाडच्या सिटी सर्व्हे ऑफिसला पाठवले. त्यामुळे ऑफिसच्या बाहेर नोटीस लावली गेली व रामभाऊजी व वैनी यांचे डोके फिरले. त्यातच त्या ऑफिसमध्ये काम करणारी बाई त्यांच्या ओळखीची व जवळ राहणारी. ती सर्व बातम्या

पुरवायची. घराच्या कामासाठी मला व वर्षाला खूप त्रास झाला. भर उन्हापावसात शिरोळ कोर्टाच्या आवारातही बसावं लागलं. आता आमचे नाव लागणार म्हणून रामभाऊजींनी नोटीसच्या विरुद्ध तक्रारी अर्ज दिला. त्यामुळे आमचे नाव लावण्यात बाधा आली. वर्षा मुंबईला गेली होती. तिला मी कुरुंदवाडला जावून चौकशी करून यायला सांगितले तेव्हा समजले की, असा अर्ज आला आहे. त्यामुळे जबानीला यावे लागेल. वर्षानी मिरजेहून फोन केला. मी व काही टीचरनी मुलींची ट्रीप ठरवली होती. मग मी रात्री जावून कोष्टी मास्तरांना चार्ज व रजा चिठ्ठी, किल्ल्या देवून पहाटे कुरुंदवाडला गेले. वर्षा व मेघा पण आल्या. त्यांनी माझी जबानी घेवून लेखी अर्ज घेतला की, घराला मी व माझी मुले सोडून कुणीही वारस नाही. हे घर फक्त लक्ष्मणरावांचे नावे आहे व आम्ही पाच जण वारस आहोत.

रामभाऊजींनी अर्जात म्हटले होते की हे घर आम्ही दोघा भावांनी मिळून घेतले आहे व पुरावा म्हणून ह्यांच्या मराठीत सही असलेले पत्र जोडले होते. त्यातला मजकूर असा की,  तू गावात (बेळगावात, कारण घराचे काम इथे झाले होते.) नसल्याने मी माझ्या नावावर घर घेतले. पण त्यात तुझा अर्धा वाटा आहे व ऑफिसला अर्ज व पत्र पहायला मागितले. पण त्यांनी अर्ज न देता पत्र दाखवले. ते अक्षर शोभाचे होते. सही मात्र बहुतेक रामनी केली असावी. मी जबानीत त्यांना सांगितले की सही ह्यांची नाही. मग माझे व मुलांचे वारस म्हणून नावं लागले व म्युनसिपलमध्ये पण ह्यांचे नाव कमी करून माझे नाव लावण्यात आले. वारस म्हणून मुलंपण होती. रामला सिटी सर्वे ऑफिसने कळवले की, आम्ही त्यांचे नाव लावले आहे. तुमची तक्रार घेवून तुम्ही कोर्टात जावू शकता. अर्थात कुरुंदवाडात ही बातमी पसरायला वेळ लागला नाही. मी सहज बँकेत गेले तर तिथंही मला मॅनेजरनी विचारलं. मी म्हंटलं मला कुणाचही नाव घ्यायचं नाही. ज्यांनी सही खोटी केली आहे हे त्यांना माहित असेल. मी कुणाचंही नाव घेतले नाही. पण बँकेला रामभाऊजींचा संशय आला असावा व याचा परिणाम काय झाला तर ८-१५ दिवसातच रामभाऊजींना बँकेतून व नोकरीवरून काढून टाकण्यात आलं व हे जेव्हा मला समजलं तेव्हा खूपच वाईट वाटलं. कारण ते घर त्यांच्याच पगारावर चालायचं. खरं म्हणजे रामभाऊजी खूप गरीब व शांत स्वभावाचे. ते असले काही करणारे नव्हतेच. पण त्यांना नानासाहेब, विलास व रामची बायको ह्यांनी असे करायला लावले कारण ते नानासाहेबांचे ऐकायचे. पण नानासाहेबांचे ऐकल्यामुळे



रामभाऊजींना नोकरी मात्र गमवावी लागली. माझे मात्र घर माझ्या नावावर झाले. अर्थात घरात रामभाऊजीचं रहायचे. मी माडीला कुलूप घातले की ते तोडायचे.

ह्या ज्या घराच्या घडामोडी घडत होत्या तेव्हा वर्षांचे लग्न झाले नव्हते. त्यामुळे बऱ्यापैकी सर्व कामे ती निभावून न्यायची. घर नावावर झाले. पण त्याचा पुरावा माझ्याकडे नव्हता. म्हणजे मेन घराचे खरेदी पत्रच नव्हते, करारपत्र, पावत्या काहीच नव्हते. घराचे खरेदीपत्र हरवले आहे म्हणून अर्ज करून त्याची ट्रू कॉपी मागून घेतली. खलाटे यांचे मित्र त्यांनी मला करारपत्र दिले व जरूर पडल्यास मी साक्ष देतो म्हणाले; कारण गावात राहात असल्याने, गरीब असल्याने व रामभाऊजींच्या बायकोच्या बऱ्याच ओळखी असल्याने कुणी साक्षीला येत नव्हते. ह्यांचा पाटुकले नावाचा मित्र सिटी सर्व्हे ऑफिसरला मी देशपांड्यांची बायको व मुलं त्यांची आहेत अशी साक्ष द्यायला मी बोलावले तर त्यांनी तुम्ही रामला घर देतो म्हणा मग मी साक्ष देतो  म्हणाला. मी त्याच्या साक्षीची गरज नाही म्हणून सांगून निघून आले. मग खलाटे पोस्टमन व महावीर कुसनाळे यांनी साक्ष दिली. मी कुरुंदवाडला गेले की, महावीरच्या घरीच रहायची. कारण अंकलेची मुलगी देवून त्याचे लग्न सरकारनी केले होते. घराचे कागदपत्र सर्व मिळाले. मग मी घराची परिस्थिती काय आहे, घर किती वर्षे चांगले राहील व विकले तर किती रक्कम मिळेल हे पाहण्यासाठी वर्षा एकदोनदा नागेंद्राला घेवून घर दाखवायला गेली. कारण नागेंद्रा व कोट्रेश आमच्याकडे संजीव कसा चांगला आहे वगैरे सांगायला अधेमधे यायचे. त्यामुळे त्यांची चांगली ओळख झाली होती. कुरुंदवाडमध्ये मी घर विकणार म्हणून बातमी पसरली. बातम्या पसरवण्यात कुरुंदवाड एक नंबर. मग एक दिवस विलास बेळगावला आला. मला वाटले, भेटायला आला. कारण त्याची सासूरवाडी तिथेच होती ना? मला म्हणाला, काकू काय चालवलंय हे तुम्ही? कुरुंदवाड गावात वर्षा एका मुलाला घेवून फिरते. शोभाचे लग्न ठरत आहे. उद्या तुमच्या मुलीमुळे लग्न मोडेल व लखू काकाची व आमची बदनामी पण होईल ती वेगळीच. तुम्ही तिला आवरा.

योगायोग म्हणा पण जेव्हा विलास घरी आला होता तेव्हा नागेंद्राही आला होता. तो तिपटुरला जाता येता आमच्याकडे एखादा दिवस यायचा. तो अंघोळीला गेला होता. विलासचे बोलणे तो ऐकत होता. तो बाहेर आल्यावर मी विलासला सांगितले हाच तो मुलगा. हा माझ्या मैत्रिणीचा मुलगा आहे. सिव्हील इंजिनिअर आहे व मीच त्याला वर्षासोबत जायला सांगितलं. तुम्ही कुणीही मला विचारत नाही. उलट त्रास देता हे गेले म्हणून तुम्हाला माझी नाही तर रामची काळजी. संकट

कुणावर कोसळेल माझ्यावर की रामवर व तुमची कुणाची मदत न घेता मी ह्यांची मदत घेते. तो कुणी लोफर माणूस नाही आणि लोफर माणसाबरोबर वर्षाला पाठवायला मी मूर्ख नाही व वर्षाही मूर्ख नाही व घराची काय दुरुस्ती करावी ते पहायला गेले होते. त्याचवेळी बोंडे नावाच्या माणसाशी वर्षाचे लग्न करायचा विचार असल्याचेही सांगून टाकले. नागेंद्राब रोबर मग शांतपणाने विलासनी गप्पा मारल्या व जाताना मलाही नेहमीप्रमाणे नमस्कार केला. म्हणाला शुभदाची आत्या वर्ध्याला रहाते. मी बोंडेंची चौकशी करून तुम्हाला मदत करतो व कळवतो. तो पायरी उतरला तेव्हाच मला माहित होतं, हा काही करणार नाही व तसेच झाले. कोल्हापूरातून त्यांनी दोन दिवसांनी मला फोन केला. नन्नी व नानासाहेबांना हे पटत नसल्याने मी या भानगडीत पडणार नाही. वर्षाच्या लग्नालासुद्धा मी त्याला कोल्हापूरला फोन केला. तो म्हणाला, फॅक्टरीला सुट्टी नाही, नाहीतर आलो असतो. मी पण सांगितले, तू नाही आलास तर काही अडत नाही. कर्तव्यात चूकू नये म्हणून तुला फोन केला. मी मुलांच्या सुखाव्यतिरिक्त कुणाचाही कसलाही विचार करत नाही. अशातऱ्हेने वर्षाचे लग्नसुद्धा कुणाच्याही न येण्याने अडले नाही. यात मला माझ्या भावांनी मात्र खूप मदत केली व पाठिंबाही दिला.

कुरुंदवाडचे खरेदीचे कागदपत्र मिळाल्यानंतर मी परत म्युनिसिपल ऑफिसला जावून नक्की नाव लागले का ते पाहून आले, कारण जे खोटी सही करू शकतात ते पैसे देवून आपले नांव लावायला कमी करणार नाहीत. असो ह्यांचे नाव कमी करून माझे नाव लावले होते. मग मी बँकेचे शेअर्सही माझ्या नावे नवीन करवून घेतले. कारण ते पैसे नाहीसे केले होते. त्यानंतर मी बँकेकडे त्या घरावर कर्ज मागितले. त्यावेळी मी जामीनदार म्हणून खलाटे, पराडकरांचे वडील व महावीर यांच्या सह्या दिल्या होत्या. ही बातमी नानासाहेब व विलासला समजली असणार. त्यांनी ह्यांच्यात काड्या घालून मला कर्ज मिळू नये म्हणून खटपट केली असणार. बँकेने लेटर पाठविले की, विलासचा जामीन द्या. त्याला मी तयार नव्हते. मी पण लेटर पाठवले की, जामीनदार आहेत, ते नालायक आहेत का ? व विलासला ५० हजार मागितले तर तोच मला देईल, त्याचे असे पैसे मला नको आहेत. मला हक्काचे पैसे हवेत. मग अर्जुन वाडकर बँकेचे वकील म्हणाले, तुमच्या मुलांनी शेअर्स घ्यायला हवेत, तर कर्ज मंजूर होईल. मी तेही करायला तयार झाले. मग म्हणाले, शेअर्स शिल्लक नाहीत. मग म्हणाले, तुमच्या नोकरीचे पे बिल आणून द्या. मी म्हंटलं, मी पगारावर कर्ज काढत नाही. घरावर काढते व घराचे कागदपत्र



देते. वकिलाला वाटत होतं मी मुद्दाम कर्ज काढून हप्ता न भरता काहीतरी गडबड करणार. मला खरं म्हणजे कर्जाची गरज नव्हती. पण त्या घराच्या सुरक्षिततेसाठी मला त्याच्यावर कर्ज हवे होते. अर्थात मला कर्ज मिळाले नाही. कारण नानासाहेबांचे मी काय करते ह्यावर पूर्ण लक्ष होते. ते कुरुंदवाडात सांगत होते. लक्ष्मणची बायको मस्तवाल आहे ती आमच्याकडे मदत मागत नाही. फार दुराभिमानी आहे. मी सर्वांना एवढचं सांगितलं की, कुणी आपण होवून मदत केली तर नाकारणार नाही. पण लाचार होऊन मदत मागणार नाही. मी स्वाभिमानी आहे.

काल एक गाणं ऐकलं. त्याचं ध्रुपद होतं, 'आठवणींनो उघडा डोळे'. मला जरा विचित्रचं वाटलं. त्या ओळीचा मी विचार करू लागले तेव्हा माझ्या लक्षात आलं, कवी म्हणतो ते बरोबर आहे. नुसते आपले डोळे उघडे असून चालत नाही. आपल्या निद्रिस्त झालेल्या आठवणींनी आधी डोळे उघडलेच तर आपणाला आठवणी आठवणार. मग आपण त्या कल्पनेने पाहाणार किंवा माझ्यासारखं कागदावर उतरवणार. जर आठवणी जाग्याच झाल्या नाहीत, त्यांनी डोळेच उघडले नाहीत तर आपणाला काहीच आठवणार नाही व त्या परत अनुभवण्याचे वा त्यांना कागदावर उतरवण्याचे समाधान आपल्याला मिळणार नाही. नुसते आपले डोळे उघडे असून काय उपयोग? असो. ह्याबाबतीत मी खूप लकी आहे. कारण मला अगदी लहानपणापासूनच्या जवळजवळ सगळ्या आठवणी आठवतात व त्या काळात जावून माझ्या मनाला एक प्रकारचा विरंगुळा जवळजवळ मिळतो. आता त्या आठवणी कुणाला सांगाव्या तर श्रोता कुठला आणायचा. आजच्या या धकाधकीच्या जगात कुणाला एकमेकांशी बोलायला सवड नाही. थोडी सवड मिळाली तर त्यांना मोबाईल, टी.व्ही. तसेच लॅपटॉप वगैरे हाताळणेच जास्त आवडते. हल्ली माणसं माणसांशी बोलण्यापेक्षा निर्जीव मशीनशी बोलणे जास्त पसंत करतात. मग माझ्या सारख्यांच्या आठवणी कोण ऐकणार. त्यामुळे मी आपला हा सोपा उपाय काढलाय. जे आठवतं, ज्या आठवणी जाग्या होतात त्यांना कागदावर उतरवायचे. ते सुद्धा कुणासाठी किंवा कुणी वाचावे म्हणून नव्हे तर आपल्या मनाचा कोंडमारा होवू नये व आपले मन मोकळे व्हावे यासाठी. कारण मनाच्या कोंडमाऱ्यामुळे हल्ली बऱ्याच लोकांना ब्रेनचे आजार उद्भवत आहेत. तसे मला होवू नये. कारण माझ्या आईला आम्ही १० मुलं असूनसुद्धा काही न आठवताच तिचा शेवट झाला. मला मात्र मरतानासुद्धा सर्व आठवणी व या सुंदर जीवनात जगलेले क्षण आठवत मरायचे आहे व म्हणायचे,'हे जीवन सुंदर आहे.'

आज काही कामाकरता म्हणून शीला गांगोटकरला फोन केला होता. तिथं

शेखरही होता. दोघांच्या बरोबर गप्पा झाल्या. आवारातल्या जुन्या आठवणी, जुनी माणसं वगैरे आठवलं. अर्धा तास केव्हा संपला कळलं नाही. पण फोनवर किती बोलणार ? असो, जुन्या माणसांबरोबर गप्पा मारल्यामुळे जुन्या आठवणी जाग्या झाल्या व मला बाळूचे लहानपण आठवले. बाळू लहानपणी सर्वांचा खूप लाडका होता. कारण आवारात लहान बाळ व त्यात बाईंचा मुलींच्या पाठीवर चौथ्यांदा झालेला मुलगा. त्यामुळे मी जरी नोकरीवर त्याला सोडून जात असले तरी आवारात सर्वच त्याचे लाड करायचे, काळजी घ्यायचे. त्यात शानबाग मामी, मीराताई (मम्मा), निलू व शीला यांचा वाटा जास्त असायचा. ३-४ महिन्याच्या बाळूला झोपेतूनच पाळण्यातून आपल्या घरी घेवून जायच्या. त्याला घेण्यासाठी दोघी व मम्मा ह्यांच्यामध्ये चढाओढ असायची. संध्याकाळी तर तुळशीकट्ट्यावर आम्ही सर्व जमायचो व मम्मा छोट्या बाळूला 'नाच  नाच तुका भोवे देता पांच' असं काही काही गाणं म्हणून नाचवायच्या. तो पण त्या गाण्याच्या तालावर एक पाय उंचावून नाचायचा. बाळू म्हणजे आवारातल्या सर्वांचं खेळणचं होता. मम्मा तर त्याच्यावर खूप प्रेम करायच्या. बाळूमुळे त्या आपल्या २ वर्षांच्या मुलाच्या जाण्याचे दु:ख विसरायच्या व बाळूत रमायच्या. काहींना वाटायचे त्यांचे मन स्थिर नसते. अशावेळी मी बाळूला त्यांच्याकडे देवू नये. पण मी असा वाईट विचार त्यांच्याबाबतीत कधी केला नाही. बाळू आमच्या घरापेक्षा गांगोटकरांकडेच जास्त वाढला. जेवणं खाणं सगळं त्यांच्याचकडे, त्या हौसेने करायच्या. ७-८ महिन्यानंतर अंघोळ पण त्या मुलीच घालायच्या व सगळं खूप प्रेमाने करायच्या. मी बाहेर जात असले तरी माझ्यापेक्षा जास्त प्रेम देणारी माणसं बाळूला आबा व मम्मा बेळगाव सोडेपर्यंत मिळाली हे काय कमी होतं ?

मानसिक त्रासामुळे आबांना बेळगांव सोडून जाण्याआधीच टी.बी. ची सुरूवात झाली होती. त्यांचेही डॉक्टर दीक्षितच होते. आमच्या आवारातल्या सर्वच मुलांवर आबा व मम्मा खूप प्रेम करायचे. त्यात आता दोन्ही मुली व व षोम्या या लग्न होऊन सासरी गेलेल्या. त्यामुळे मुले रात्री झोपायला त्यांच्याचकडे जायची. मग रात्री झोपताना सर्वांना खावू असायचा. हे डॉक्टरांना समजल्यावर त्यांनी ह्यांना आबांच्या आजाराची कल्पना दिली व म्हणाले की, मुलांना लवकर संसर्ग होतो. एक पाठवू नको किंवा बी.सी.जी. की काय ह्याची हॉस्पिटलला जावून इंजेक्शन सर्व मुलांना देवून टाक. मग ह्यांनी मला हे सर्व सांगितले व म्हणाले, मुलांना पाठवणे बंद केले तर त्या दोघांनाही दु:ख होईल व त्यांचे मुंबईला घर घेवून तिकडेच जायचे ठरत होते. तेव्हा त्यांना दुखवण्यापेक्षा मुलांना इंजेक्शन देवून



टाकू. मग आवारात कुणालाही म्हणजे शानबागना जास्त काही न सांगता हॉस्पिटलला जावून सर्वच मुलांना लस टोचून आणण्याचे ठरले. त्याप्रमाणे हे मुलांना घेवून जावून आले. मुलांचे पण त्यांच्यावर खूप प्रेम होते. त्यामुळे त्यांना एकमेकांपासून तोडणे खूप कठीण गेले असते. असो पुढे काही महिने ते राहिले व जायच्या आधीच त्यांनी सर्व घर व बंगला विकलाच होता. त्यावेळी त्यांना २-३ लाख मिळाले असावेत. नक्की माहीत नाही. आमचे घर आम्ही १६ हजार कागदासकट १७ हजाराला घेतले. नाडगौडाचे ९ हजार. शानबाग मामांची परिस्थिती नसल्याने ते घर सोडून जायला निघाले. मग मामी ह्यांच्याकडे येऊन खूप रडल्या. मग आबांनीच सारस्वत बँकेत ८ हजार कर्ज मंजूर करून दिलं व आम्हीपण आम्हाला थोडे जास्त घ्या व त्यांना स्वस्तात घर द्या असे सांगितले. त्याप्रमाणे ८ ते ८।। हजाराला शानबागला घर दिले. (पुष्पाचे बाबा). दुसऱ्या शानबागना रितसर दराप्रमाणे दिले. एकूण आबांनी आपल्या सर्व भाडेकरूंना न दुखवता गाव सोडून गेले. आम्हीपण त्यांना शेवटपर्यंत प्रेम दिले.

आता आमच्या घरात मी, बाळू  व रूपा असे तिघेच रहायचो. कारण वर्षा साताऱ्यात. मेघा मिरजेला. त्यामुळे घरात खूप माणसे कमी असल्यासारखे वाटायचे. कारण मला नेहमी घरात ६-७ माणसे असण्याची सवय. या आधी कुणी ना कुणी शिकायला म्हणजे रवी, प्रेमा, मंगल कुणी ना कुणी असायचे. त्यांची पण लग्ने झाली. मुलं मोठी झाल्याने शिरपाची मुलगी पण नव्हती. असे करून घरात खूपच मोकळे वाटायचे. बाळूची शाळा, कॉलेज सुरू झाले होते. आमच्या रूपाबाईंची गाडीपण हळूहळू शिक्षण पूर्ण करण्याच्या मार्गावरून जात होती. तिच्या लायब्ररीचा कोर्स व बीकॉमचे जमतील तसे विषय संपवायचे चालले होते. तिच्यावर घराची जबाबदारीपण बऱ्यापैकी पडायची. वर्षा मात्र १५-२० दिवसात किंवा महिन्यातून एकदा येवून जायची. त्यामुळे बाहेरची कामे काही असली तर ती करून जायची. हे जावून २-३ वर्षे झाली. आता मला पण असे एकट्यानी जबाबदारी घेवून काम करायची सवय होत होती. बँकेत जाणे, पैशाचे हिशोब पाहाणे या गोष्टी रूपाच करायची. रूपा शिक्षणात जरी मागे असली तरी समाजात वावरणे व व्यवहारज्ञान यात मात्र तिचा हात कुणी धरणार नाही. सर्वांना लावून घेवून रहाण्याची तिची सवय खूपच चांगली आहे. ती सहसा कुणालाही तोडत नाही. म्हणूनच तिचे व माझे जास्त पटते. असो. आता आमच्या कुरुंदवाडच्या घराचा प्रश्न संपत आला म्हणण्यापेक्षा मी संपवून टाकला. सरकारांच्या मनात रामला काहीतरी द्यायचे होते. त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांना मी एक

तृतीयांश घर द्यायचे ठरवले. त्यासाठी पण त्यांनी भांडण काढले. मला पुढचाच भाग दे, मला खरेदी पत्र करून दे, पण मी मात्र माझ्या मुद्द्यावर ठाम होते. खरेदी पत्र हवे असले तर तुम्ही भरा. कारण देणे घेणे नसताना खरेदी पत्र का करू ? पुढचा भाग मला विकायचा आहे. तेव्हा मागचाच घ्यायचा नाहीतर काहीच देणार नाही.

कुरुंदवाडच्या एका प्रतिष्ठित माणसाच्या घरात मिटींग घेण्यात आली. रामभाऊंनी नानासाहेबांना बोलावतो म्हणाले. मी कुठले नाना म्हटल्यावर त्यांना राग आला व तू सुद्धा कोण मला माहीत नाही असे रागाने म्हणाले. मग मी म्हंटलं बरं झालं तुम्हाला काही द्यायचा प्रश्नच नाही. मग जरा लोकांनी समजवल्यावर ते खालच्या स्वरात आले. मी म्हंटलं माझे कुणी भाऊ इथे आलेत का? मग तुमचा भाऊ तरी कशाला? मी देणार तुम्ही घेणार. ह्यात खरं तर कुणाची गरज नाही आणि मी कुणाचे ऐकून घेणारी नाही तेव्हा मी जे ठरवलंय व जे देईन तेच घ्यायचे. नाहीतर मी स्टॅम्पपेपर फाडून टाकून बेळगावला जाते. एवढे कडक बोलल्यावर रामभाऊजींनी दिलेले घर बक्षिसपत्र करून घेतले. म्हणजे एका गोष्टीवर पूर्ण पडदा पडला. बरोबर एकदा संजीवला व वर्षाला घेवून जाऊन मोजणी करून १० हजार रु. खर्च करून मधे भिंत घालून विषय संपवला. १० हजार मलाच खर्च करावा लागला. ह्यामुळे मला एक गोष्ट समजली. राम गावात रहात असल्याने गावच्या लोकांना माझ्यापेक्षा त्यांचीच कीव जास्त यायची. मी रामभाऊजींना घर दिल्यामुळे एक गोष्ट चांगली घडली ती म्हणजे कुरुंदवाडच्या लोकांना माझ्याविषयी आदर वाटला. लोकांनी मला तोंडावर सांगितले. लक्ष्मणच्या मागे तुम्हीसुद्धा त्याच्याप्रमाणे वागलात. तुम्ही ह्या गावचा चांगुलपणा मिळवलात आणि खरं सांगू का त्यांनी कुठल्यातरी झोपडीत रहावे असे मलाही वाटत नव्हते. कारण त्यांना आता नोकरी नव्हती. पदरात मुले, वहिनीचं काही पापड, शेवया, शिवण करून पैसे मिळवायच्या. त्या हुषार होत्या व रामही मनाने वाईट नव्हते. पण कुणी शिकवले की, तसे वागायचे. एकूण काय गावाला, नानासाहेबांना, विलास, सुमन ह्या सर्वांनाच माझा कुरुंदवाडच्या घराचा निर्णय पसंत पडला असावा कारण कुणीही त्याबद्दल तक्रार केली नाही. अशातऱ्हेने सरकारांच्या मागे एकेक तिढा सोडवण्याचे काम मी करू लागले.

हल्ली मला खूपच विसरायला होतं. म्हणजे पूर्वीचे आठवते पण आत्ताची गोष्ट आठवत नाही. असे थोडे थोडे विस्मरण होवू लागले आहे. अर्थात आता ८० वर्षाला एवढे होणारच. पण लिहितानासुद्धा अक्षर विसरले जाते असे मला वाटू लागले आहे म्हणजे डोक्यात जे लिहायचे नसते पण मी प्रत्यक्षातच लिहून टाकते.



असे का होते कळत नाही. आता हे मेघाला विचारावे म्हणते पण ती इतकी कामात असते की तिच्याबरोबर बोलायलाही वेळ नसतो.

आता माझ्या संसाराची घडी नीट बसत चालली होती. वर्षाचे लग्न झाले तरी ती माझ्या घराची पूर्ण जबाबदारीने काही कामे करत होती. महिन्यातून एकदा यायची. वर्षाचे लग्नानंतर मी घरातच छोटिशी पार्टी दिली होती. तरी १०० लोक असावेत. मी वर्षाचे लग्न आपण होवून करून दिलं. ह्याचं काहींना कौतुक वाटलं व काही लोकांनी नावं पण ठेवली. अर्थात लोक काय म्हणतात याची फिकीर मी कधीच केली नाही, करत नाही व करणारही नाही. माणसाने आपल्या बुद्धिला व मनाला जे पटेल ते करावे असे मला वाटते आणि मी स्वत: तसेच करते. मग ते वर्षाचे लग्न असो वा कुरुंदवाडचे घर असो, मेघाचे शिक्षण असो, रुपाचे शिक्षण असो व बाळूला वाढवणे असो मी कुणाच्याही विचाराने वागले नाही. माझ्या स्वत:च्या विचाराने वागले. त्यामुळे माझ्या कुठल्याही निर्णयाबद्दल मी कुणालाही दोष देत नाही. कारण दोष, चूक, बरोबर काय निर्णय असेल ता सर्वस्वी माझा एकटीचा असतो आणि मी खूप शिकले नसले तरी मला नोकरीमुळे व समाजात वावरल्यामुळे माझ्यात तेवढे धाडस व आत्मविश्वास आहे, म्हणून तर मी कुणाचीही मदत, सल्ला न घेता मुलांचे निर्णय घेवू शकले ना?

आता वर्षाचे व्यवस्थित चालू होतं. मेघाचे शिक्षणही बिन अडथळ्यांनी चाललं होतं. रूपाचंही रडत रखडत का असेना कॉलेजला न जाताच एखादा क्लास लावून बीकॉम पर्यंतच शिक्षण करायचं मी ठरवलं होतं. तिचा लायब्ररीचा २ वर्षांचा कोर्स व १२ वी एकदमच संपली. अर्थाच घराचा सर्व चार्ज जवळजवळ तिच्याकडेच होता. पैशांचे व्यवहार, बँकेत जाणे, घरातली इतर जबाबदारी तिच्यावर होती. मी माझी शाळा, स्वयंपाक, धुणं वगैरे कामे करतच होते व सर्वांच्या काळज्या करण्याचे मोठे काम तर मलाच करावे लागे. असो. म्हणता म्हणता ९० साल संपत आलं असावं. आता आठवत नाही. पण बाळूला चांगले मार्क पडून तो १० वी चांगल्या तऱ्हेने पास झाला. त्याची उंची व प्रकृतीपण चांगली असल्यामुळे माझ्या मनात त्याला हुबळीला की काय चांगला कोर्स होता ३ वर्षांचा, त्याला पाठवायचा विचार होता. पण सरकारनी एकदा म्हटले होते, बाळूला आय.ए. एस. किंवा इंजिनिअर करायचे व वर्षा, मेघा पण म्हणाल्या आम्ही मुली असून आम्हाला कॉलेजला घातला मग तो का नाही. एकूण काय बाळूला सायन्स कॉलेजला घातलं. मी, बाळू व रूपा घरात. रूपाचे परीक्षा देणं व बाळूचं कॉलेज सुरू होतं व माझं पाचवीला पूजलेलं स्वयंपाक, धुणे व नोकरी. मला वाटतं ९१ सालं

असावं,  बाळू १२ वी झाला. मार्कही बरे होते. मी त्याला बेळगावच्या इंजिनिअरिंग कॉलेजला घालायचा प्रयत्न केला. पण डोनेशन द्यावे लागणार होते व डोनेशनच्या सीटला फी पण जास्त होती. त्यामुळे बाळू नको म्हणाला व मी बी.एस्.सी. होईन म्हणाला. पण सरकारांची जबरदस्त इच्छा त्यांनी आपल्या माघारी पण पूर्ण करून घेतली. बाळूला बॉर्डर सीट पुण्याला मिळाली. मी ज्या डिप्लोमा कोर्सला घालणार होते,  त्याच लाईनची मेकॅनिकल साईड मिळून तो पुण्याला गेला. रूपा व मी दोघीच घरात होतो. साल असावं १९९१.

आज बाळू बेळगावला लग्नाला गेला होता. तिथं त्याला नेसरगी भेटली. बाळूने फोन लावून दिल्यामुळे नेसरगीबरोबर थोड्या गप्पा झाल्या व त्यामुळे दिवसभर अनगोळची शाळा, टीचर ह्यांच्या विचारातच रमले होते. इतकी की रात्री स्वप्नात पण जुनी शाळा ती प्रथम कशी होती, ती आम्ही कशी दुरुस्त केली हे कुणालातरी सांगत होते.

असो, आमच्या शाळेतले वातावरण खूपच छान होतं व ते तसं ठेवायचं काम सौ. नाडकर्णी यांच्यामुळेच जमत होतं. आम्ही ८-१० टीचर होतो. पण कुणी कुणाला नावं ठेवणे किंवा लागेल असे बोलणे कधीच करत नव्हतो. नेसरगी सर्वात लहान टीचर. तिची नेमणूक कन्नड टीचर म्हणून शाळेत झाली. कन्नड मराठी वाद अजूनही चालूच आहे. पण आम्ही नेसरगीला लहान बहीणच समजत होतो. ती मुसलमान, पाटील (रणभिसे) बाई ख्रिश्चन, गड्डी लिंगायत, नाडकर्णी सारस्वत. पण आमच्या मनात जात कधीच येत नव्हती व आमच्या प्रेमात अगर कामात जात कुठेच आडवी आली नाही. नुस्तीच जातीयता नष्ट करा म्हणून लोक ओरडतात. पण प्रत्येक फॉर्म भरताना सगळ्यांना जात लागतेच. पण आम्ही मात्र शाळेत जात दूर ठेवली होती व तसचं माझ्या संसारातही मी जातीला दूरच ठेवले. सुधीर, संजीव यांची जात मला अजून माहीत नाही आणि हे बाळकडू  मला आण्णांच्यामुळे मिळाले होते. ते कधीच जात मानत नव्हते. अगदी त्यांच्या जवळचे मित्र मुसलमान होते. घरात सर्व म्हणजे महारसुद्धा यायचे. जेवणे, खाणे सर्व काही एकत्र घ्यायचे. मात्र मांसाहार व देवाजवळ जाणे याबाबतीत ते स्वत: तरी कडक होते. गुरूचरित्र वाचताना ते या सर्व गोष्टी कटाक्षाने पाळत. आमच्या शाळेतील लहान असूनही पाटील व यार्दी लवकर वारल्या. यार्दी मानसिक त्रासाने गेल्या.

आता बाळू पुण्याला हॉस्टेलवर रहात होता. त्यामुळे घरात मी व रूपा दोघीच असायचो. पूर्वी नेहमी ६-७ माणसं घरात असायची. त्यामुळे घरात माणसं एकदमच कमी झाली. घरात वेळ जात नसे व खाणे पिणे करायला कंटाळा यायचा.



मला स्वयंपाक करायला व दुसऱ्यांना गरम गरम करून घालायला खूप आवडते. पण खाणारी माणसं व त्यात आवडीने खाणारी माणसे असली तर करणाऱ्याला उत्साह येतो. आता मी स्वयंपाक चांगला व आवडीने करते हे माझ्या सुनेला व नातीला खरेच वाटत नाही. कारण बाळूचे लग्न झाल्यावर मी घरातले, स्वयंपाकातले लक्ष पुर्ण काढून टाकले. ८ व्या वर्षापासून ६८ वर्षापर्यंतच्या स्वयंपाकाच्या कामातून पूर्ण रिटायर झाले व ठरवले कुणाच्याही कोणत्याही गोष्टीत लक्ष न घालता स्वत:साठी जपायचे. कारण प्रथम भावंड, नंतर माझा संसार व ८२ नंतर तर पूर्ण घर व ४ मुलांच्या जबाबदारीतून मी आता मुक्त झाले होते. एवढी वर्षे मी दुसऱ्यांसाठी म्हणजे भावंड, मुलं, नवरा यांच्यासाठी व त्यांच्यात मग्न होवून जगत होते. कुणी कसे वागावे, कसे वागू नये? पैसा कसा खर्च करावा ? कसा वाचवावा ह्याबद्दल उपदेश नकळत का असेना करत होते. पण आता या सर्वांतून पूर्ण लक्ष काढून आरामात व मनासारखे शांत जगायचे ठरवले आहे व अगदी तसेच मला जगता येत आहे. कुणाची जबाबदारी नाही, कुणाची काळजी नाही, काय खायला करू याची चिंता नाही. समोर आयते येईल ते खायचे, कुठल्याही गोष्टीत लक्ष न घालता अगदी शांत व आनंदाने जगायचे ठरवले तर ते कुणाही वयस्कर माणसाला अवघड आहे असे मला वाटत नाही. माझा वेळ अगदी छान जातो. नाही, वेळ पुरत नाही. मला देवाने मोठी देणगी दिली आहे. उत्तम प्रकृती. आता पाय दुखतो. पाय म्हणजे गुडघा पण त्याची मला आता सवय झाली आहे.

बाळूचे दुसरे वर्ष असावे बहुतेक. मेघाचे एम.बी.बी. एस. संपले असावे. साल १९९२. ८ एप्रिल बुधवार या दिवशी आमच्या कुटुंबात तिसऱ्या पिढीचा जन्म झाला. वर्षाला मुलगी झाली. मला आईचा मान देणाऱ्या वर्षानीच मुलीला जन्म देवून मला प्रथमच आजीचासुद्धा पहिला मान मिळवून दिला. शाळेला सुट्टी पडायला दोन दिवस असताना मला मेघाचा फोन आला. माझी जरा कुचंबणाच झाली. पण शाळेनी मला जायला परवानगी दिली. कुंभारसर हेड होते. त्यादिवशी बेळगावात मोठी दंगल झाल्यामुळे कर्फ्यू होता. त्यामुळे मला स्टॅण्डला जायला रिक्षा मिळेना. शेवटी १५०/- रु. देवून एक रिक्षा केली व हसबे मामा नको म्हणत असताना पोचवायला आले. रूपा व मी संध्याकाळी साताऱ्यात आलो. मेघा तिथचं होती. कारण एंट्रनस्‌शीप सातारा हॉस्पिटलला करत होती. असो. वर्षा लग्नानंतर थोडे दिवस नर्मदा स्कूलमध्ये नोकरी करत होती. ७-८ महिने केली असेल. आमच्या कुरुंदवाडच्या घराच्या बाबतीतले अर्जुन वाडकर वकिलांचे वागणे बघून तिला

वकील व्हावेसे वाटले व लगेच अभ्यास, कॉलेज सुरु. दुसऱ्या वर्षाला दिवस गेले व तिला खूप त्रास व्हायचा. ती बेळगावला आली व अक्षरश: झपाटल्यासारखा लॉ चा अभ्यास केला. खूप उलट्या व्हायच्या पण म्हणाली आता जर मी लॉ केलं नाही तर परत कधीच होणार नाही. ती खूपच जिद्दी व हट्टी. त्यामुळे मनू व्हायच्या आधी प्रथम लॉ ची परीक्षा देवून पासही झाली. मलापण कौतुक वाटले. एक महिना साताऱ्यात राहून मग वर्षाला घेवून बेळगावला आले. सुट्टी होतीच व रूपा घरात असायची. त्यामुळे २-३ महिने बाळंतपण झाले. महिन्यादिवशी खूप थाटात बारसे झाले. मला रमा नाव ठेवायचे होते व वर्षाला मनू. त्यामुळे मी मनोरमा नांव ठेवले.



# मी माझी मुलं, सून व नातवंड











# २९ मे आईचा वाढदिवस

दर वाढदिवसाला प्रश्न पडतो काय द्यावं हिला भेट ? सतत आयुष्यभर दुसऱ्याला भरभरुन देत आलेली शांता, लग्नानंतर लक्ष्मणाची लाडकी उर्मिला. तिने तिच्या आठवणी सुरेख नोंदवल्या आहेत. त्या काळात सामान्य माणसांच्या, लेकरांच्या, मुलींच्या आयुष्यात काय घडतं होतं ते नोंदवलं आहे.

खुप खोलवर नाही, पण तरी त्या काळातील राजकीय, सामाजिक, कौटुंबिक जीवन ती उलगडते. मानवी जीवनातील नाते संबंध, सुख दु:खांवर भाष्य करत स्वत:च असं सुंदर जगण्याचं लॉजीक ती मांडते. म्हणून वाटल की हे छापून तिला भेट द्यावं आणि साहित्य क्षेत्रातही त्या आठवणींच्या माध्यमातून एक शांत अशांततेचे आत्मवृत्त म्हणून भर टाकावी, यासाठी हा प्रयत्न.

८२ वर्षाच्या आमच्या आईची एक लेखिका म्हणून जगाला नवीन ओळख होईल. त्यामुळे तिचा ८२ व्या वर्षी लिखाणाचा उत्साह तुम्हा वाचकांमुळे वाढेल ही आशा.... !



